म. ग्रं. सं. ठाणें
विषय
क्र.
काव्य

# नवनीत

## (भाग २ रा)

आद्यकर्ते

**परशुराम बल्लाळ गोडबोले**

शतसांवत्सरिक (द्वितीय) आवृत्ति

संपादक

**अनंत काकबा प्रियोळकर**

REFBK-0013489

व्हीनस प्रकाशन : पुणें

५७०११
१७.६.६४
म.शा.
काव्य
१६२६

# नवनीत भाग दोन

## कवितासार संग्रह

मराठी ग्रंथ
९३४८९

# नवनीत भाग २

# कवितासार संग्रह

लोकहिताकरितां

**परशुरामपंत गोडबोले**

यांनीं इसवी सन १८६३ सालीं
प्रथम तयार केला.

त्याची प्रस्तुत
शतसांवत्सरिक (द्वितीय) आवृत्ति

**अनंत काकबा प्रियोळकर**

यांनीं इसवी सन १९६३ सालीं
प्रसिद्ध करण्याकरितां
संपादिली

REFBK-0013489
REFBK-0013489

व्हीनस प्रकाशन : पुणें

पहिली आवृत्ति, १८६३; दुसरी आवृत्ति, ऑगस्ट १९६४

मूल्य तीन रुपये

प्रकाशक : स. कृ. पाध्ये

व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या, ३८१ क, शनिवार : पुणें २

मुद्रक : वि. पु. भागवत

मौज प्रिन्टिंग ब्यूरो, खटाववाडी : मुंबई ४

# प्रस्तावना

मोरोपंताच्या आर्यांच्या अनेकार्थत्वासंबंधीं विवेचन करतांना मालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं 'नवनीता'चा उल्लेख केला आहे. या संदर्भांत 'नवनीता'संबंधीं ते लिहितात,

"'नवनीता'चे दोन भाग घ्या. पहिला भाग तर प्रसिद्धच आहे; दुसरा कदाचित् सर्वांस माहीत नसेल, यास्तव त्याविषयीं इतकेंच सांगणें अवश्य दिसतें कीं, तो कै. परशुरामपंत तात्या यांनींच केलेला आहे. हा भाग पहिल्याच्या सरासरी तिसरा हिस्सा असेल नसेल, तरी **एकंदरीनें पाहातां यांतील वेंचे पहिल्यांतल्यापेक्षां सरस आहेत.** आतां हे जे दोन भाग आहेत यांत साऱ्या महाराष्ट्रकवींचें स्वरूप बऱ्याच अंशीं प्रतिबिंबित झालेलें असेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. कां कीं, साऱ्या महाराष्ट्रकवितेचें आलोडन करून जें सार निघालें तें वरील ग्रंथकर्त्यानें दोनदा रसिकजनांस अर्पण केलेलें आहे." (निबंधमाला, अं. ५८, १८७८, पृ० १०–११)

'नवनीत' हा ग्रंथ सर्वांना माहीत आहे. परंतु तो प्रथमभागात्मक आहे; आणि त्याचा दुसरा भाग निघाला होता हें ज्यांना ठाऊक आहे, किंवा हा दुसरा भाग प्रत्यक्ष ज्यांनीं पाहिला असेल, अशा फारच थोड्या व्यक्ति असतील. 'नवनीता'च्या माझ्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध झालेल्या १८ व्या (शतसांवत्सरिक) आवृत्तीच्या प्रस्तावनेंत 'नवनीता'च्या दुसऱ्या भागाचा उल्लेख वाचून पुष्कळांनीं कुतूहल व्यक्त केलें व हा दुसरा भागही प्रसिद्ध करण्याची व्यवस्था व्हावी, अशी मला सूचना केली.

महाराष्ट्रांत ज्यावेळीं इंग्रजी राज्य सुरू झालें, त्यावेळीं नव्या पिढीचें लक्ष केवळ राजकर्त्यांची भाषा जी इंग्रजी तिच्याकडे होतें. स्वतःच्या मराठी भाषेकडे लोक दुर्लक्ष करूं लागले. तरुणांनीं इंग्रजी भाषा अवश्य शिकावी; परंतु त्यांतील ज्ञान जनतेमध्यें त्यांच्या मातृभाषेच्या द्वारा प्रसृत झालें पाहिजे, असें इंग्रजांचें मत होतें. तें ज्ञान प्रसृत होण्यास मराठी भाषेची शक्ति वाढणें आवश्यक होतें, व त्याकरितां ज्यांस 'प्राकृत' असें त्या काळीं नांव होतें, त्या जुन्या मराठी ग्रंथकारांचा अभ्यास झाला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. डॉ. स्टीव्हन्सन लिहितो,

"The study of these authors would improve the style of Marathi composition, which is in danger at present from an almost exclusive attention to foreign literature. To a learned native the English is needful to open up to him a store house of ideas; but the Prakrit must be studied in order that he may be able to diffuse beneficially among his countrymen, the knowledge he has acquired." (Journal of the Bombay Branch Royal Asiatic Society, Vol. I, No. 1, July 1841, pp. 1–2)

बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष जॉन वार्डेन हे ता. २८ जून १८५३ रोजीं पुणें पाठशाळेंतील विद्यार्थ्यांना उपदेश करतांना म्हणाले,

"इंग्रेजी भाषा शिकण्याविषयीं तुम्हांला भर देत असतांना, तुमच्या स्वतःच्या भाषेवर तुम्हीं दुर्लक्ष करावें असें यत्किंचितहि मी तुम्हांला उत्तेजन देत आहें असें समजूं नका; पण माझा उलटा असा अभिप्राय आहे कीं, तुम्ही मराठी भाषेचा मजबूत पाया घातल्याविना—आणि तुमच्या स्वभाषेची श्रीमत्ता वाढविण्यास ज्या संस्कृत भाषेचा फार उपयोग आहे, तिचें येथें रक्षण केलें आहे सबब तुम्हांला तसा पाया घालण्यास उत्तम सोयी आहेत—त्यावरील तुमच्या इंग्रजी भाषेच्या इमारतीपासून तुम्हांला कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. युरोपियन लोकांच्या खाणीमध्यें तुम्ही सदोदित श्रम करून खणीत राहा, पण तुमची दौलत तुमच्या स्वदेशीय लोकांप्रत नेऊन पोहचविण्याचें साधन जरकरितां तुम्हांजवळ नसलें तर बाजारांत तिला कांहींच मोल येणार नाहीं आणि सरकारचाकरींत कोण मोठ्या त्वरेनें वाढत जातात इकडेस जर तुम्हीं चित्त देऊन पाहात जाल तर जे मराठी आणि इंग्रेजी या उभय भाषांत निपुण आहेत तेच मोठ्या त्वरेनें वाढतात असें तुमच्या लक्षांत येईल."

(ज्ञानोदय — जुलै ता. १५, १८५३, पृ. २२०)

मराठी भाषेचा पाया मजबूत घालण्याकरितां जुन्या कवींचा अभ्यास अवश्य आहे, ही गोष्ट त्या काळीं राज्यकर्त्यांनाही पटली होती. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची शाळांत मराठी काव्य शिकवावें, अशी सूचना होती. ती लक्षांत घेऊन पुणें कॉलेजचे प्रिंसिपाल मेजर तोमस कँडी यांनीं आपल्या हाताखालील पंडित परशुरामतात्या गोडबोले यांना जुन्या मराठी कवींच्या 'सुरस वेंच्या'चें एक पुस्तक तयार करण्यास सांगितलें. १८५४ सालीं 'नवनीत' नांवानें प्रसिद्ध झालेला ग्रंथ तो हाच होय. यासंबंधीं सविस्तर माहिती 'नवनीता'च्या अठराव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत सांपडेल.

दहा वर्षांच्या आंत १८५४, १८५७, १८५९ व १८६२ अशा 'नवनीता'च्या चार आवृत्त्या निघाल्या. 'नवनीता'ची ही लोकप्रियता पाहून परशुरामतात्यांना 'कविता-सारसंग्रह' या नांवानें "नवनीत भाग २" प्रसिद्ध करण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणें त्यांनीं एक लहानसें पुस्तक १८६३ सालीं स्वतःच छापून प्रसिद्ध केलें. या पुस्तकाला आश्रय देण्याबद्दल तात्यांनीं डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांना जो अर्ज पाठविला तो पुढीलप्रमाणें:—

अर्ज करितों ऐसाजे. पूर्वीं नवनीत किंवा प्राकृत कवितांचे वेंचे या नांवाचें बुक जालें आहे, त्यांत ग्रंथसंग्रह पुष्कळ असल्यामुळें त्याची किंमत देण्याचें गरीब लोकांस सामर्थ्य नसल्यामुळें तें पुस्तक त्यांच्यानें विकत घेववत नाहीं. तेणेंकरून कविताग्रंथ वाचण्याची त्यांची हौस पूर्ण होत नाहीं. यासाठीं त्याच मासल्याचें थोड्या किंमतींत लहानसें एकादें बुक असावें अशी बहुतांची इच्छा समजण्यांत आल्यावरून मी एक नवनीताच्या मासल्याचें लहान बुक तयार केलें आहे. त्यामध्यें नवनीतांतील कविता न घेतां दुसरे वेंचे वेऊन घातले आहेत. बहुतकरून मराठी सर्व कवींच्या कवितांचे

थोडथोडे वेंचे नमुने यांत आहेत, व जे चांगले मनोरंजकसे वाटले तेच घेतले आहेत. हें बुक गरीब लोकांस घेण्यास सोयीवार पडावें म्हणोन याची किंमत आठ आणे ठेविली आहे. नफ्याकडे विशेष दृष्टि दिली नाहीं. हें बुक मी स्वतःच्या खर्चावर छापविणार आहें. परंतु या कामास सरकारचा आश्रय मिळेल तर फार चांगलें होईल असें मनांत आणून खावंदांस अर्ज केला आहे. तर या बुकाच्या दोन हजार प्रती सरकारनें घ्याव्या, अशी माझी विनंति आहे. याहून जास्ती घेतल्या तरी सरकारचें नुकसान नाहीं असें मला वाटतें. कदाचित् इतक्या प्रती घेण्यास सरकारची मर्जी नसेल तर निदान पंधराशें प्रती तरी घेण्याचा हुकूम व्हावा. याविषयीं जसा हुकूम होईल तशा प्रती छापविण्याचा बेत धरतां येईल. केलेलें बुक पाहाण्यास हुजूरांस पाठविलें आहे. हें पाहाण्यांत येऊन परत पाठविण्याचा हुकूम व्हावा. ज्यादा अर्ज करण्यास ताकद नाहीं. तारीख [दिली नाहीं] माहे आगस्ट सन १८६२ इ. मु. पुणें."

(Director of Public Instruction, Book-Depot, Vol. 16, 1862-63, p. 198).

या पुस्तकावर "I have looked at the book and find that it is quite of the same character as Navanit. I doubt not that it will be popular," असा कँडीनीं अभिप्राय दिल्यावर डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मि. हावर्ड यानें, दहा टक्के कमिशन दिल्यास दोन हजार प्रति सरकारनें घ्याव्या, अशी मंजुरी दिली. अर्जांत आठ आणे किंमत ठेवण्याचें ग्रंथकारानें कबूल केलें होतें तरी पुस्तकावर किंमत नऊ आणे छापलेली दिसते.

या भागाच्या शेवटीं,

जरि याचा जन आदर करतिल घेतील हा पहायास ।
तरि उत्तेजन होइल मज **तिसरा भाग** तो करायास ॥

अशी आर्या आढळते. तिला उद्देशून निबंधमालाकार लिहितात, "ही आशा कितपत सफल झाली हें सांगायला नकोच. तिसऱ्याची गोष्ट तर दूरच, पण दुसरा भागहि करण्याची विशेष जरूर नव्हती असें सदरील ग्रंथकारास बहुधा लवकरच वाटलें असावें!"

सरकारनें दोन हजार प्रति विकत घेतल्या होत्या, ही गोष्ट मालाकारांना माहीत नसावी. केवळ लोकाश्रयावर परशुरामपंत अवलंबून नव्हते. सरकारकडून पुनः असा आश्रय मिळण्याचा संभव न दिसल्यामुळें तिसरा भाग तयार करण्याच्या फंदांत ते पडले नसावे असें वाटतें.

परशुरामतात्या १८७४ सालीं निधन पावले. त्यांच्या हयातींत 'नवनीता'च्या (पहिला भाग) आठ आवृत्त्या निघाल्या. पुढें १८७८ सालीं नववी आवृत्ति तयार करण्याचें काम विद्याखात्याचे डायरेक्टर मि. चाटफिल्ड यांनीं श्रीकृष्णशास्त्री तळेकर व रावजीशास्त्री गोडबोले यांच्याकडे दिलें. या वेळीं सरकारच्या सूचनेवरून वेदांतसंबंधीं वेंचे दुर्बोध म्हणून मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांच्या कविता गाळण्यांत आल्या; "त्यांच्या

बदला दुसरे कवि घातले आहेत," असें त्या आवृत्तींत मोघम म्हटलें आहे. त्यांत मुक्तेश्वराची नारदनीति, मोरोपंती कृष्णार्जुनयुद्ध, प्रभाकराचा लक्ष्मी-पार्वतीसंवाद, ध्रुवाख्यान दिंड्या, असे कांहीं वेंचे 'नवनीता'च्या प्रस्तुत दुसऱ्या भागांतील आहेत. पहिल्या भागांत घातलेल्या या कविता दुसऱ्या भागाच्या या आवृत्तींतून कमी कराव्या व त्याजागीं नवे वेंचे निवडून घालावे, असा प्रथम माझा विचार होता, परंतु आमच्या कांहीं मित्रांनीं त्याला जोराचा विरोध केला. मूळ स्वरूपांतच ही आवृत्ति प्रसिद्ध करावी, असें त्यांचें मत पडलें. फक्त 'हिंदुस्थानी पदें' कमी करून बाकी शक्यतोंवर मूळ स्वरूपांतच, मुद्रणदोष सुधारून, ही दुसऱ्या भागाची शतसांवत्सरिक आवृत्ति म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे. सरकारनें प्रसिद्ध केलेली पहिल्या भागाची शतसांवत्सरिक आवृत्ति संपलेली आहे. ज्यांच्याजवळ 'नवनीता'चा तो पहिला भाग असेल, ते हा नवनीताचा दुसरा भाग संग्रहीं ठेवतीलच; परंतु ज्यांच्याजवळ तो नसेल त्यांनींही हा दुसरा भाग अवश्य जवळ ठेवण्यासारखा आहे.

एक फार दुर्मिळ व उपयुक्त पुस्तक लोकांना उपलब्ध करून द्यावें या बुद्धीनें व्हीनस प्रकाशनचे उत्साही चालक रा. स. कृ. पाध्ये प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करीत आहेत; त्याला महाराष्ट्रांतील रसिक व गुणग्राहक वाचकांकडून योग्य तो आश्रय मिळेल, अशी मी आशा बाळगतों.

सरस्वती बिल्डिंग,
केनेडी ब्रिज, मुंबई ४

अ. का. प्रियोळकर

[प्रथमावृत्तीचें मुखपृष्ठ]

नवनीत भाग २.

# कवितासार संग्रह

लोक हिता करितां

परशुरामपंत गोडबोले.

ह्यांनी केला,

तो

पुणें येथें,

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिला.

इसवी सन १८६३


शके १७८४

इसवी सन १८४७ च्या विसाव्या आक्टा प्रमाणें ग्रंथकर्त्यांनीं

ह्या ग्रंथावर आपली मालकी ठेविली आहे.

किंमत नऊआणे.





परशुरामपंत गोडबोले (मधले)

ज्येष्ठ पुत्र बळवंत

व त्यांची स्वाक्षरी

एक नोकर

# परशुराम बल्लाळ गोडबोले

## (अल्प परिचय)

परशुरामतात्या गोडबोले यांचें घराणें मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील पावस-गोळप हें गांव. येथून त्यांचे पणजोबा बळवंतराव, रास्त्यांच्या कारकीर्दींत वाई येथें गेले आणि तेथेंच स्थायिक झाले. या बळवंतरावांचे चिरंजीव परशुरामपंत आणि त्यांचे मुलगे बळवंत ऊर्फ बल्लाळ. यांचेच पुत्र 'नवनीत' कार परशुरामतात्या.

तात्यांचें शिक्षण वाईलाच झालें. संस्कृत भाषेचा अभ्यास त्यांनीं नारायणशास्त्री देव यांच्याजवळ केला. 'नामार्थदीपिका' या आपल्या ग्रंथांत आणि प्रस्तुत 'नवनीता'च्या दुसऱ्या भागांत स्वरचित कवितांमध्यें त्यांनीं स्वतःचा 'नारायणसुत' असा निर्देश केला आहे, तो या आपल्या गुरुविषयींच्या आदराचा द्योतक दिसतो. वाईला आपलें शिक्षण पुरें केल्यावर परशुरामतात्या पुण्याला जोग नांवाचे त्यांचे एक मामा होते, त्यांच्या पेढीवर कारकून म्हणून नोकरीस राहिले. पुढें मुंबई शिक्षामंडळीनें 'महाराष्ट्र भाषेचा कोश' तयार करण्याकरितां जी सहा पंडितांची योजना केली त्यांपैकीं परशुरामतात्या एक होते. हा कोश दोन खंडांत १८२९ सालीं निघाला व त्याची पुरवणी १८३१ सालीं प्रसिद्ध झाली. मोल्स्वर्थ यांना मराठी–इंग्रजी कोशांच्या कामांत तात्यांची मदत होती. तशीच डॉ. स्टीव्हन्सन यांनाही त्यांचें मराठी ग्रामर तयार करण्यांत तात्यांचें साहाय्य झालें. कँडीनाही त्यांच्या इंग्रजीमराठी कोशाच्या रचनेंत तात्यांचें पुष्कळ साहाय्य झालें असलें पाहिजे.

मुंबईच्या शिक्षणमंडळीकडे तीन वर्षें नोकरी केल्यावर ते पुण्याच्या कलेक्टरच्या कचेरींत कारकून म्हणून राहिले. तेथून पुणें पाठशाळेच्या छापखान्याचे व्यवस्थापक म्हणून त्यांनीं आठ वर्षें चार महिने काम केलें. पुढें १८४७ सालीं पुणें पाठशाळेचे प्रमुख मे. कँडी यांच्याकडे मराठी ट्रान्स्लेटर व रेफरी हें काम आल्यावर त्यांनीं आपले पंडित म्हणून तात्यांना ता. २५ नवंबर १८४७ रोजीं नेमून घेतलें. येथेंच नोकरीला असतांना त्यांनीं मराठी भाषेची बहुविध सेवा केली. मराठी भाषेचा त्यांचा व्यासंग जाडा होता. जुन्या मराठी काव्यांतील एखाद्या कठीण स्थळाचा अर्थ नीट लागला नाहीं, म्हणजे कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखे विद्वानदेखील त्यांच्याकडे धांव घेत. माधव चंद्रोबा डुकले यांना त्यांच्या 'सर्वसंग्रहाच्या' कामांत तात्यांचें मोठें साहाय्य असे व तें त्यांनीं कृतज्ञतेनें ठिकठिकाणीं नमूद करून ठेवलेंही आहे. परशुरामतात्यांच्या पुढील ग्रंथांवरून त्यांच्या वाङ्मयकार्याची कल्पना होईलः—

१. **महाराष्ट्रभाषेचा कोश** : भा० १–२ (सहांपैकीं एक कर्ते) मुंबई १८२९. पुरवणी १८३१.

२. **नवनीत** : पुणें १८५४. शेवटची अठरावी आवृत्ति १९५७.

३. **वेणीसंहार** : (मराठी भाषांतर) पुणें १८५७, १८६१, १८८१, १९२३.


४. **उत्तररामचरित्र** : (मराठी भाषांतर) मुंबई १८५९, १८८१, १९२६.
५. **वृत्तदर्पण** : पुणें १८६०. शेवटची २९ वी आवृत्ति १९५०.
६. **शाकुंतल** : (मराठी भाषांतर) पुणें १८६१, १८९०.
७. **मृच्छकटिक** : (मराठी भाषांतर) मुंबई १८६२, १८८१, १९३५.
८. **नवनीत भाग २** : (कवितासार संग्रह) पुणें १८६३, १९६४.
९. **पंचागदर्शन किंवा पंचांग समजण्याची रीत** : पुणें १८६४.
१०. **मराठ्यांच्या इतिहासावर लहान मुलांकरितां सोपी कविता** : पुणें १८६४.
११. **नागानंद** : (मराठी भाषांतर) मुंबई १८६५.
१२. **संक्षिप्त भूगोलवर्णन** : मुंबई १८६५. चौथी आवृत्ति १८६९.
१३. **नामार्थदीपिका** : (विष्णुसहस्रनामावर आर्याबद्ध टीका) मुंबई १८६६.
१४. **केकादर्श** : (केकावलीवर गद्य टीका) मुंबई १८६७, १८७३, १८८२, १९१७.
१५. **कादंबरीसार** : (पूर्वार्ध) मुंबई १८७२. (उत्तरार्ध अप्रकाशित).
१६. **पार्वतीपरिणय नाटक** : (मराठी भाषांतर) मुंबई १८७२.
१७. **बालबोधामृत** : (कविता) पुणें १८७४.
१८. **श्रीमच्छंकराचार्यकृत श्रीपांडुरंगस्तोत्राची टीका** : (मराठी गद्यात्मक टीका) मुंबई १८७५.
१९. **श्रीगंगामाहात्म्य** : (काव्य) मुंबई १९६४.

## संस्कृत ग्रंथ

१. **संस्कृत पाठावलि** : (संस्कृत भाषेचें प्रथम पुस्तक) १८५४.
२. **संस्कृत पाठावलि** : भा. २, १८६२.
३. **संस्कृत पाठावलि प्रकाश** : १८६४.

या स्वतःच्या ग्रंथांखेरीज त्यांनीं अनेक लेखकांना त्यांच्या लेखनकार्यांत मदत केली आणि त्यांचीं पुस्तकें सुधारून दिलीं. त्यांच्या नांवाप्रमाणें त्यांचा स्वभावही अत्यंत गोड असल्यामुळें ते सर्वांना प्रिय होते. श्रावण वद्य अष्टमी (गोकुळाष्टमी) शके १७९६ या दिवशीं म्हणजे ता. ३ सप्टेंबर १८७४ गुरुवार रोजीं त्यांनीं इहलोकाचा त्याग केला.

## कै. परशुरामतात्या गोडबोले यांची वंशावळि




[वरील माहिती पुरविल्याबद्दल तात्यांचे विद्यमान नातु प्रा. सदाशिव रामचंद्र गोडबोले (पुणें शेतकी कॉलेजांतील सेवानिवृत्त प्राध्यापक) यांचा मी फार आभारी आहें. तसेंच मोरोपंतांच्या वेच्यांचीं प्रुफें तपासल्याबद्दल रा. दा. वि. जोशी यांचा आणि पुस्तक छापण्याच्या बाबतींत चांगलें सहकार्य दिल्याबद्दल मौज प्रेसचे मालक रा. भागवत यांचाही मी ऋणी आहें.—संपादक]

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| प्रस्तावना | | पांच |
| प्रथमावृत्तीचें मुखपृष्ठ | | आठ पृष्ठासमोर |
| परशुरामतात्याचें छायाचित्र व स्वाक्षरी | | नऊ पृष्ठासमोर |
| परशुराम बल्लाळ गोडबोले (अल्प परिचय) | | नऊ |
| परशुरामतात्या गोडबोले यांची वंशावळी | | अकरा |
| काव्यप्रशंसा श्लोक | | १ |
| मंगलश्लोक | | १ |
| ईश्वरास प्रार्थना व त्याची स्तुति | | २ |
| रामचंद्रप्रार्थना | | ५ |
| स्थूळदेहाची उत्पत्ति | मुकुंदराज | ६ |
| अर्जुनास कृष्णाचा बोध | ज्ञानेश्वर | ९ |
| अभंग (बाळक्रीडा) | नामदेव | ११ |
| अभंग | तुकाराम | १५ |
| श्लोक वेणुसुधेंतील | वामनपंडित | २३ |
| श्लोक राधाभुजंगांतील | वामनपंडित | २४ |
| वामनचरित्र | वामनपंडित | २६ |
| गाऱ्हाणीं | वामनपंडित | २६ |
| शबरीआख्यानांतील श्लोक | आनंदतनय | २६ |
| नामसुधाप्रकरणीं श्लोक | वामनपंडित | २७ |
| सुभाषित श्लोक | वामनपंडित | २९ |
| अभंग | रामदास | ३१ |
| ओव्या नारदनीतींतील | मुक्तेश्वर | ३४ |
| नारदाचा ध्रुवास उपदेश | अमृतराय | ३७ |
| आर्या स्फुट | मोरोपंत | ३८ |
| आर्या नामाच्या | मोरोपंत | ४० |
| आर्या कंसवधप्रकरणीं | मोरोपंत | ४१ |
| गोपीशोकसांत्वन | मोरोपंत | ४५ |

| | | |
|---|---|---|
| गोपीप्रेमोद्वार—आर्या | मोरोपंत | ४७ |
| आर्या मंत्ररामायणांतील | मोरोपंत | ४८ |
| धेनुहरणाच्या आर्या | मोरोपंत | ५१ |
| रुक्मिणीहरणाच्या आर्या | मोरोपंत | ५४ |
| कर्णपर्वांतील दुःशासनवधाच्या आर्या | मोरोपंत | ५७ |
| लघ्वक्षर-रामायणांतील आर्या | मोरोपंत | ५९ |
| कर्णार्जुनयुद्धाच्या आर्या | मोरोपंत | ६० |
| अक्रूरागमन आर्या-गीति | मोरोपंत | ७८ |
| आर्या परंतु–रामायणांतील | मोरोपंत | ८० |
| श्लोक स्यमंतकोपाख्यान | मोरोपंत | ८१ |
| सीतास्वयंवरांतील श्लोक | आनंदतनय | ८२ |
| लवकुशाख्यानांतील श्लोक | आनंदतनय | ८९ |
| लावणी | रामजोशी | ९४ |
| कितीएक कवींचीं पदें | | ९७ |
| ध्रुवाख्यानांतील दिंड्या | उद्धवचिद्धन | १०८ |
| प्रबंध | नाना उंडे | ११० |
| कितीएक कवींची सुभाषित कविता | | ११२ |
| अन्योक्ति श्लोक | | ११५ |
| लक्ष्मी-पार्वती-संवाद | प्रभाकर | ११८ |
| कालियामर्दन | प्रभाकर | १२१ |
| चर्पटपंजर | | १२३ |
| ग्रंथकर्त्याची रसिकजनांस प्रार्थना | | |

नवनीत भाग दोन

कवितासार संग्रह

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
...३८०११...... वि: ...काव्य...
...२६२५... नो दि १८/५/८४

# काव्यप्रशंसा श्लोक

सच्चेतःकैरवांतें विकच करि, जगत्ताप संपूर्ण टाळी ।
अज्ञानध्वांत सारें हरि, रसिकचकोरांसि अत्यंत पाळी ॥
नाना वस्तु प्रकाशी, कविहृदयपयोराशिसंतोषहेतू ।
काव्येंदु स्वोदयानें, खळविरहिजनां होतसे धूमकेतू ॥ १ ॥

## मंगलश्लोक

आखुवाहन सर्पभूषण कुंजरानन वागवी ।
गौरिनंदन स्फूर्तिकारण विघ्ननाशन लाघवी ॥
सिद्धिदायक बुद्धिनायक चित्तमंदिरिं सांठवा ।
ग्रंथकारण दुःखवारण आदिं मानसिं आठवा ॥ १ ॥

ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३८८

कृपापारावारा विमळतुळजापूरसदना ।
तुकाई जे ध्याती सदयहृदया चंद्रवदना ॥
न बाधों दे त्यांला किमपि सहसा काळकलना ।
भजावी सद्भावें हिमगिरिसुता शंभुललना ॥ १ ॥

अंबे महात्रिपुरभैरवि आदिमाये । दारिद्र्यदुःखभय वारुनि दाविं पाये ॥
तूझा अगाधमहिमा वदती पुराणीं । श्रीरेणुके भगवती वरदे भवानी ॥ १ ॥

कर्दळीवनमंडपीं, कपि अंजनीसुत शोभतो ।
जानकीप्रिय रामसुंदरपादपंकज ध्याय तो ॥
सिंधु लंघुनि शोधिली जनकात्मजा भुमिनंदिनी ।
ध्यायिजे हनुमंत अंतरिं भक्तराजशिरोमणी ॥ १ ॥

## मंगलश्लोक

हरिचरणसरोजीं चित्सुधासारपानें । भ्रमरपरमयोगी गुंजती नामगानें ॥
हरि ति सकलदुःखा हीं सुखाचीं निधानें । वद वद वद जिव्हे वासुदेवाभिधानें ॥१॥

इंद्राचें पद दैत्यराज बळि तो विप्रप्रसादें हरी ।
तेव्हां कश्यपमंदिरीं अदितिच्या दिव्यव्रतें श्रीहरी ॥
झाला वामन मौंजि तेंचि समयीं होतांचि भिक्षाछळें ।
सर्वस्व त्रिपदें हरी स्मर मना त्याचीं पदें कोमळें ॥ १ ॥

जो ब्रह्मरूप अवतार बहू धरीतो । नानारुपें स्वजनसेवक उद्धरीतो ॥
भूभारवारण दशांतिल आठवा हो । नंदालयीं प्रगट तो हरि आठवा हो ॥ १ ॥

माळाकार परस्परें कर गळां घालोनि गोपांगना ।
गाती नाचति पाहती अवधिया एका जगज्जीवना ॥
सोन्याचे मणि ओंविले भुजगुणीं गोऱ्या शशांकानना ।
पाचूचे पदकस्थळीं स्मर मना श्रीदेवकीनंदना ॥ १ ॥

## ईश्वरास प्रार्थना व त्याची स्तुति

### श्लोक

स्तुती करावी परमेश्वराची । करूं नये व्यर्थ कधीं नराची ।
स्तुतीस कीं ईश्वर पात्र होतो । तसा तिला मानव काय हो तो ॥ १ ॥

डोळ्यांनीं बघतों, ध्वनी परिसतों कानीं, पदीं चालतों ।
जिव्हेनें रस चाखितों मधुरही, वाचे अम्ही बोलतों ॥
हातांनीं बहुसाळ काम करितों विश्रांतिही घ्यावया ।
घेतों झोंप सुखें फिरोनि उठतों, ही ईश्वराची दया ॥ २ ॥+

+ ईश्वराचे आज्ञेवांचून सृष्टिव्यवहार चालत नाहीं हें तात्पर्य.

सत्तेनें प्रभुच्याच सूर्य उगवे त्याच्याचि सत्ताबळें ।
वारा वाहतसे नभीं तरुलता देतात पुष्पें फळें ॥
पाण्याचा करितात मेघ समयीं वर्षाव भूमीवरी ।
देते धान्य समृद्धि भूमि अवघी त्याचीच सत्ता खरी ॥ ३ ॥

## कामदा छंद

आस ही तुझी फार लागली । दे दयानिधे बुद्धि चांगली ॥
देउं तूं नको दुष्ट वासना । तूंच आंवरीं माझिया मना ॥ ४ ॥
देह देउनी तूंच रक्षिसी । अन्न देउनी तूंच पोसिसी ॥
बुद्धि देउनी काम सांगसी । ज्ञान देउनी तूंच तारिसी ॥ ५ ॥
वागवावया सर्व सृष्टिला । शक्ति बा असे एक तूजला ॥
सर्वशक्ति तूं सर्वदेखणा[1] । कोण जाणिजे त्या तुझ्या गुणां ॥ ६ ॥
नामरूप हें तूजला नसे । त्या तुला मुखें वर्णवे कसें ॥
आदि अंत ना मध्यही तुला । तूंचि दाविशी मार्ग आपुला ॥ ७ ॥
माणसें अम्ही सर्व लेंकरें । मायबाप तूं हें असे खरें ॥
तूझिया कृपेवीण ईश्वरा । आसरा अम्हां नाहिं दूसरा ॥ ८ ॥
तूंच आहसी आमुची गती । देइं आमुतें उत्तमा मती ॥
प्रार्थितों तुला जोडुनी करां । हे दयानिधे कीं कृपा करा ॥ ९ ॥

## ओंव्या

जय जय जी परमपुरुषा । जगज्जीवना जगदीशा ॥
विश्ववंद्या विश्वेशा । परात्परेशा कृपानिधी ॥ १ ॥
तूं भक्तकामकल्पद्रुम । संहारीं माझा भवभ्रम ॥
कष्टलों करितां संसारकाम । सदा सकाम विषयार्थी ॥ २ ॥
काम क्रोध लोभ मोहो । मद मत्सर शत्रुसमूहो ॥
यांनीं गांजिलें केला द्रोहो । झालों सावयव घाबरा ॥ ३ ॥

---

१ सर्व पाहणारा. सर्वत्र दृष्टि ज्याची असा ईश्वर.

तुज हृदयस्था विसरलों । विषयाच्या संगतीं लागलों ॥
स्वहितालागीं मी नाडलों । बहुत पावलों खेदातें ॥ ४ ॥
ज्यांची धरूनियां ममता । नाश केला आपुल्या हिता ॥
तीं सर्व अंतरलीं आतां । म्हणोनि आलों शरण तुज ॥ ५ ॥
बाळपण गेलें खेळतां । तारुण्य गेलें विषय भोगितां ॥
वृद्धत्वीं पावली चिंता । आयुष्य तत्वता वेंचलें ॥ ६ ॥
आतां तूंचि बापमाय । तूंचि सखा सुहृद होय ॥
तुजचि मोकलितों धाय । पाव लवलाहीं माउलिये ॥ ७ ॥
झडकरी येऊनि घालीं उडी । बंधन माझें निःशेष तोडीं ॥
मोहांधकूपांतूनि मज काढीं । करीं ताडातोडी खेदाची ॥ ८ ॥
आतां न लावीं उशिरू । मजला न धरवे धीरू ॥
तूंचि जगदात्मा जगद्गुरू । जाणसी विचारू हृदयींचा ॥ ९ ॥
आतां न होईं उदास । धांवूनि पुरवीं माझी आस ॥
म्यां धरली असे तुझी कास । वसवीं हृदयास माझिया ॥ १० ॥

## श्लोक

सर्वज्ञा परमेश्वरा सकरुणा बापा दयासागरा ।
आम्ही अज्ञ तुझीं मुलें सकल हीं तूं बाप होशी खरा ॥
केला कां इतका अम्हांवरि तुवां देवा असा कोप हा ।
हे आम्ही करुणस्वरें विनवितों आम्हांकडे तूं पहा ॥ १ ॥

## पद

त्राता तूंच हरी ॥ अम्हांला त्राता तूंच हरी ॥ ध्रुवपद ॥
अंत नको बघुं अमुचा आतां ॥ धांव घेइं लवकरी ॥ अम्हां० ॥ १ ॥
जगत्कार्यसंहारकारका ॥ अम्हां नको धरुं दुरी ॥ अम्हां० ॥ २ ॥
सर्व संकटांपासुनि देवा ॥ मुक्त करीं झडकरी ॥ अम्हां० ॥ ३ ॥
कामक्रोधादिक हे शत्रू ॥ पीडिति बहु अंतरीं ॥ अम्हां० ॥ ४ ॥
नारायणसुत विनवितसे कीं ॥ दास अम्हांतें करीं ॥ अम्हां० ॥ ५ ॥

## रामचंद्रप्रार्थना

### अनुष्टुप् श्लोक

श्रीरामा नीरदश्यामा सुखधामा रघूत्तमा ।
त्वत्पादनखचंद्राची ज्योत्स्ना माझ्या हरू तमा ॥ १ ॥
यास्तव स्मरतों नित्य स्वामी तुज दयाकरा ।
तापापासूनि हा दीन मुक्त होय असें करा ॥ २ ॥
सेवा करावया लावा देवा हा योग्य चाकर ।
या तप्ताच्या शिरीं आतपत्र[1] हो तुमचा कर ॥ ३ ॥
शरणागतसंत्राणीं रामा तूं बहु सादर ।
ऐसें असोनियां दीन पावतो हा कसा दर[2] ॥ ४ ॥
मायानदींत श्रीरामा तुझे चरण सांगडी[3] ।
बहु आवडले हेचि साधूंच्या मानसां गडी ॥ ५ ॥
मीनाचें जीवनजळ दीनांचें तूंचि केवळ ।
मी नाथा तापलों यत्नहीनाचें मुख्य तूं बळ ॥ ६ ॥
झालों शरण्या तुजला शरणागत पातकी ।
न होसी तूं दीनबंधो शरणागतघातकी ॥ ७ ॥
विश्वास[4] विश्वास तुझा कीं तूं दीनासि रक्षिसी ।
कशाही संकटीं धांव म्हणतां न उपेक्षिसी ॥ ८ ॥
गाय पंकांत रुतली राय तो तीस उद्धरी ।
पाय दीनासि रक्षीना काय श्रेष्ठत्व त्या तरी ॥ ९ ॥

### सवाई

राम रघूत्तम कामरिपुप्रिय लोकशोकहर या परिभावें ।
दाशरथे तुज होउनियां पदिं लीन दीनजनबंधुसि गावें ॥
आमरण स्मृति हेच असो वय याच साच सुपथांत सरावें ।
दे वरदा वर या शरणाप्रति पापतापजलधीस तरावें ॥ १० ॥

---

१ छत्र. २ भय. ३ भोपळ्यांचें पेटें. ४ सर्वजनास.

## विवेकसिंधु, अध्याय सहावा

### ओंव्या

स्थूळदेहाची उत्पत्ति

अनादि अज्ञानें भ्रमला । जीव लिंगदेहें[1] आंवरिला ॥
शुभाशुभकर्मीं बांधिला । मग जाहला परवश ॥ १ ॥
पुण्यपापाचें फळ । सुखदुःख पावे केवळ ॥
स्वर्ग नरक अचळ । भोगीतसे कर्मवशें ॥ २ ॥
मनुष्यदेह पावोनी । सत्-असत् कर्में आचरोनी ॥
संसार[2] पावे नानायोनीं । श्वानसूकरादिक ॥ ३ ॥
पुण्याचेनि अधिकपणें । आधीं स्वर्गसुख भोगणें ॥
पाप अधिक तरी जाणें । निरयासि[3] पैं ॥ ४ ॥
ऐसें कर्मफळ भोगितां । पापपुण्यें समतोल होतां ॥
मनुष्ययोनी पावे तत्वतां । जननीगर्भीं ॥ ५ ॥
पंचभूतांचें अन्न निपजे । अन्नापासाव रस बोलिजे ॥
अन्नरसाचें शुक्र[4] शोणित[5] जें । तें पंचभूतात्मक ॥ ६ ॥
पितयाचें रेत । आणि मातेचें शोणित ॥
ऋतुकाळीं[6] होय मिश्रित । जननीगर्भीं ॥ ७ ॥
जरी अधिक पुरुषाचें रेत । उणें होय स्त्रीशोणित ॥
तरी पुत्र होय निभ्रांत । गर्भाशयीं ॥ ८ ॥
स्त्रीरक्ताचेनि आगळेपणें[7] । कुमारीसी उपजणें ॥
शुक्रशोणिताचेनि समपणें । होय नपुंसकु ॥ ९ ॥
पितयाचिया रेताचिया । तीन धातू सारखिया ॥
अस्थी नाडी मज्जा हीं नावें तिया । निपजती पैं ॥ १० ॥

---

१ अंतःकरणवृत्ति आणि इंद्रियें यांचा संघात तो लिंगदेह. २ जन्ममरण. ३ नरकास.
४ पुरुषाचें रेत. ५ स्त्रियांचें रक्त. ६ गर्भधारणसमयीं. ७ आधिक्यानें.

मातेचिया शोणिताचिया । धातू तीन सारखिया ॥
त्वचा केश मांस ऐशिया । निपजती पैं ॥ ११ ॥
ऐसें स्थूळ देह जिवाचें । निपजे षड्धातूचें ॥
षट्कोशिक हें नांव तयाचें । येणेंकारणें ॥ १२ ॥
असो हा शुक्लशोणिताचा मेळ[१] । एकरात्रीं होय निश्चळ[२] ॥
पंचरात्रीं होय सुढाळ[३] । बुद्बुदाकार[४] ॥ १३ ॥
पक्षदिवशीं अंडाकार । मासीं निपजे शरीर ॥
भ्रू[५] वक्षस्थळ[६] आकार । होय दोन मासांनीं ॥ १४ ॥
तीं मासां उदर कर पुष्टी । चौथिया मासा समग्र पादपुष्टी ॥
पांचव्यांत अस्थिशिरांची दाटी । गर्भासि होय ॥ १५ ॥
सहामासांत त्वचा[७] रोम[८] । सातवे मासीं नखें उत्तम ॥
तेंवि प्रगटती चिद्धर्म[९] । स्मरणादिक ॥ १६ ॥
वरील दोन मास तत्वतां । जातील तयासी शोचितां[१०] ॥
मग उठे गर्भासि प्रसूतिव्यथा । बाहेर पडे ॥ १७ ॥
व्यथेचेनि अतिभरें[११] । जातिस्मरत्व[१२] विसरे ॥
कोहंकोहं[१३] दीर्घस्वरें । रुदन करी ॥ १८ ॥
ऐसें पंचीकृत[१४] पंचमहाभूतांचें[१५] । स्थूळदेह जीवेश्वराचें[१६] ॥
कवण अंश कवणाचे । तें पुढती ऐक पां ॥ १९ ॥
रोम आणि त्वचा । मांस अस्थी नाडी ह्या पांचा ॥
कठिन अंश पृथ्वीचा । जाणावा पैं ॥ २० ॥
लाळ मूत्र शोणित । मज्जा आणि पांचवें रेत ॥
हे द्रव आपाचे सात । स्थूळ शरीरीं ॥ २१ ॥
क्षुधा तृषा आणि निद्रा । आलस्य मैथुन गा शिष्येंद्रा ॥
हे उष्णांश पांच ऐशी मुद्रा । बुझें[१७] तेजाचे ॥ २२ ॥

---

१ मिश्रण. २ स्थिर. ३ वर्तुळ. ४ बुडबुडा. ५ भुवया. ६ ऊर. ७ कातडी. ८ केश. ९ चैतन्याचे गुण. १० शोक करितां. ११ अतिशयानें. १२ पूर्वजन्माची आठवण. १३ मी कोण मी कोण. १४ पांचाचे अंश घेऊन झालेलीं. १५ पृथ्वी, पाणी, तेज, वायु, आकाश. १६ जीवात्म्याचें. १७ समज.

धावन[1] चळन[2] आकुंचन[3] । प्रसरण[4] आणि निरोधन[5] ॥
हे सकळ अंश जाण । पंचीकृत वायूचे ॥ २३ ॥

काम क्रोध शोक मोह भय । हे व्यापक अंश उद्भय[6] ॥
पंचीकृत नभाचे निश्चय । जाण स्थूळदेहीं ॥ २४ ॥

ऐसें हें स्थूळ शरीर । लिंगदेहाचें बिढार[7] ॥
तेथें असती षड्विकार । ते ऐक तूं ॥ २५ ॥

प्रथम विकार जायते । दुसरा अस्ति तिसरा विवर्धते ॥
चौथा विपरिणमते पांचवा क्षीयते । सहावा विनश्यति ॥ २६ ॥

जायते म्हणजे न होऊनि होणें । अस्ति म्हणजे नसोनि असणें ॥
विवर्धते म्हणजे पावणें । अभिवृद्धीतें ॥ २७ ॥

विपरिणमते म्हणजे तरुणपण । अपक्षीयते म्हणजे वृद्धपण ॥
विनश्यति म्हणजे मरण । हे षड्विकार जाणिजे ॥ २८ ॥

निरोपिले षड्विकार । तिहीं युक्तीं स्थूळ शरीर ॥
तेथें जागृती निरंतर । अवस्था वर्ते ॥ २९ ॥

स्थूळदेह जागृति अवस्था । दोहींचा अभिमानी विश्वनिरुता[8] ॥
ते तीन्ही आकार ऐशी व्यवस्था । पुढें जाणावी ॥ ३० ॥

एवं स्थूळलिंग कारण । हें जिवाचें देहत्रय जाण ॥
जागृति सुषुप्ति स्वप्न । हें अवस्थात्रय जाणिजे ॥ ३१ ॥

जीवासि अविद्या[9] साधारण । तेचि संसारासि कारण ॥
नानायोनींत संचरण । तें गुणांचेनि[10] योगें ॥ ३२ ॥

ऐसें हें गुणत्रयबंधन । जीवासि पडलें गहन ॥
तंववरी न चुके जन्ममरण । कल्पकोटी ॥ ३३ ॥

---

१ धांवणें. २ हालणें. ३ संकोचित होणें. ४ पसरणें. ५ कुंठित होणें. ६ बळवंत. ७ घर. ८ विश्व, तेजस, प्राज्ञ, ह्या देवता क्रमानें स्थूळदेह, लिंगदेह, कारणदेह यांच्या अभिमानी आहेत. तशाच जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्थांच्या क्रमानें साक्षी आहेत. ९ अविद्या म्हणजे ईश्वरी माया किंवा निजस्वरूपाचें अज्ञान. १० सत्व, रज, तम हे तीन गुण.

## ज्ञानेश्वरीटीका गीतेची, अध्याय दुसरा

### ओंव्या

स्वजनवधाच्या दुःखानें विषाद पावून शस्त्र टाकून युद्धपराङ्मुख झालेल्या अर्जुनास पाहून कृष्ण म्हणतो :

मग आपुलेनि चित्तीं म्हणे । येथें हें काय आदरिलें येणें ॥
अर्जुन सर्वथा कांहीं नेणे । काय कीजे ॥ १ ॥
हा उमजे कवणेपरी । कैसेनी धीर स्वीकारी ॥
जैसा ग्रहातें पंचाक्षरी । अनुमानी[1] कां ॥ २ ॥
नातरी[2] असाध्य देखोनि व्याधी । अमृतासम औषधी ॥
वैद्य सूची[3] निरवधी । निदानींची ॥ ३ ॥
तैसें विवरीत[4] असे श्रीअनंत । तया दोहीं सैन्याआंत ॥
जयापरी पार्थ । भ्रांती सांडी ॥ ४ ॥
तें कारण मनीं धरिलें । मग सरोष बोलों आदरिलें ॥
जैसें मातेच्या कोपीं थोकलें[5] । स्नेह आर्थी[6] ॥ ५ ॥
कीं औषधाच्या कडवटपणीं । जैसी अमृताची पुरवणी ॥
ते आहाचि[7] न दिसे परी गुणीं । प्रकट होय ॥ ६ ॥
तैशीं वरिवरि पाहतां उदासें । अंतरीं अति सुरसें ॥
तियें[8] वाक्यें हृषीकेशें । बोलों आदरिलीं ॥ ७ ॥
मग अर्जुनातें म्हणितलें । आम्हीं आजि हें नवल देखिलें ॥
जें तुवां येथ आदरिलें । माझारींची[9] ॥ ८ ॥
तूं जाणता जरी म्हणविशी । तरी नेणिवेतें[10] न सांडिशी ॥
आणि शिकवूं म्हणों तरी बोलशी । बहुसाळ नीति ॥ ९ ॥
जात्यंधा लागे पिसें[11] । मग तें सैरा[12] धांवे जैसें ॥
तुझें शहाणपण तैसें । दिसतसे मज ॥ १० ॥
तूं आपणातें तरी नेणसी । परि या कौरवातें शोचूं[13] पाहसी ॥
हा बहु विस्मय आम्हांसी । पुढती पुढती ॥ ११ ॥

---

१ काढूं पाहे. २ किंवा. ३ आठवी. ४ विचार करीत. ५ राहिलें. ६ आर्थी. ७ असून. ८ तीं. ९ युद्धामध्यें किंवा मध्येंच. १० अज्ञानातें. ११ वेड. १२ स्वछंद. १३ शोकविषय करूं पाहसी.

तरीं सांग पां अर्जुना । तुजपासुनि स्थिती या त्रिभुवना ॥
हे अनादिसिद्ध विश्वरचना । तें लटिकें काई ॥ १२ ॥
हो कां जें सांप्रत ऐसें जालें । हें जन्ममरण तुवां स्रजिलें[१] ॥
आणि नाश पावे नाशिलें । तुझेनि काई ॥ १३ ॥
तूं भ्रमलेपणें अहंकृती । यांसि घात न धरिशी चित्तीं ॥
तरी सांग काई हे होती । चिरंतनू[२] ॥ १४ ॥
कीं तूं येक वधिता । आणि सकळ लोक हा मरता ॥
ऐशी भ्रांती क्षणीं चित्ता । येवों देशी ॥ १५ ॥
हें अनादिसिद्ध आघवें । होत जात असे स्वभावें ॥
तरी तुवां कां शोचावें । सांगें मज ॥ १६ ॥
परि मूर्खपणें नेणसी । न चिंतावें तें चिंतिशी ॥
आणि तूंचि नीती सांगसी । आम्हांप्रती ॥ १७ ॥
देखें विवेकी जे होती । ते दोहींतेंही[३] न शोचिती ॥
कीं होय जाय हे भ्रांती । म्हणऊनियां ॥ १८ ॥
हें[४] उपजे आणि नासे । तें मायावशें दिसे ॥
येऱ्हवीं तत्वतां वस्तू[५] जें असे । तें अविनाशची ॥ १९ ॥
जैसें पवनें तोय हलिवलें । आणि तरंगाकार जाहलें ॥
तरीं कवण कें जन्मलें । म्हणों येथें ॥ २० ॥
तेंचि वायूचें स्फुरण ठेलें[६] । आणि उदक सहज सपाटलें ॥
तरी आतां काय निमालें[७] । विचारीं पां ॥ २१ ॥
आइकें शरीर तरी एक । परी वयसा[८] भेद अनेक ॥
हें प्रत्यक्षचि देख । प्रमाण तूं ॥ २२ ॥
येथें कुमारत्व दिसे । मग तारुण्यीं तें भ्रंशे ॥
परी तो देह न नासे । एकेका सवें ॥ २३ ॥
तैशीं चैतन्याचे ठायीं । इयें शरीरें होती जाती पाहीं ॥
ऐसें जाणे तया नाहीं । व्यामोहदुःख ॥ २४ ॥

---

१ उत्पन्न केलें.　२ चिरंजीव.　३ मेल्यातें आणि जित्यातें.　४ जग किंवा शरीर.
५ आत्मस्वरूप.　६ स्तब्ध झालें.　७ नाश पावलें.　८ वयःकृत.

हा लोकत्रयाकार । तो जयाचा विस्तार ॥
जेथें नाम वर्ण आकार । चिन्ह नाहीं ॥ २५ ॥
जो[1] सर्वदा सर्वगत । जो[1] जन्मक्षयातीत ॥
तया केलियाही घात । कदा नोहे ॥ २६ ॥
आणि शरीरजात आघवें । हें नाशिवंत स्वभावें ॥
म्हणोनि तुवां झुंजावें[2] । पांडुकुमरा ॥ २७ ॥
तूं धरोनि देहाभिमानातें । दिठीतूनि[3] शरीरातें ॥
मी मारिता हे मरते । म्हणत आहसी[4] ॥ २८ ॥
तरी अर्जुना तूं हें नेणसी । जरी तत्वतां विचारिसी ॥
तरी वधिता तूं नव्हसी । ते वध्य नव्हती ॥ २९ ॥
जैसें स्वप्नामाजि देखिजे । तें स्वप्नींच साच[5] असिजे ॥
मग चेऊनियां[6] पाहिजे । तंव कांहीं नाहीं ॥ ३० ॥
तैशी हे माया । तूं भ्रमत अससी वांया ॥
शस्त्रें हाणितलीया छाया । आंगीं जैशी न रुपे ॥ ३१ ॥
कीं पूर्ण कुंभ उलंडिला । तेथ बिंबाकार दिसे भ्रंशला[7] ॥
परि भानू नाहीं नासला । तयासवें ॥ ३२ ॥
नातरी मठीं आकाश जैसें । मठाकृती अवतरलें असे ॥
तो भंगलिया आपैसें । स्वरूपचि ॥ ३३ ॥
तैसें शरीराच्या लोपीं । नाश नाहीं स्वरूपीं ॥
म्हणऊनि हे नारोपीं[8] । भ्रांति बापा ॥ ३४ ॥
अर्जुना हा ऐसा जाणावा । सकलात्मक देखावा ॥
मग सहजें शोक आघवा । हरेल तुझा ॥ ३५ ॥

## नामदेव

### बालक्रीडा–अभंग

१

देवा आदिदेवा सर्वत्राच्या जीवा । ऐक वासुदेवा दयानिधे ॥ १ ॥

---

१ आत्मा. यावत् शरीर. २ लढावें. ३. लक्षून. ४ असशील. ५ खरें. ६ जागृत होऊन. ७ नष्ट झाला. ८ घेऊं नको.

योगियांचे ध्यानीं नातुडसी[1] देवा । ऐक वासुदेवा दयानिधे ॥ २ ॥
निर्गुण निराकार नाहीं तुज माया । ऐक कृष्णराया कानडीया ॥ ३ ॥
करुणा पर्जन्याच्या शिंपीं मावरि[2] तोया । ऐक कृष्णराया गोजरीया ॥ ४ ॥
नामा म्हणे जरी दाखवीशी पाया । तरी वदावया स्फूर्ती चाले ॥ ५ ॥

२

क्षीरसागरांत अससी बैसला । धांवोनि मजला भेटी देई ॥ १ ॥
शेषावरी जरी अससी नीजला । धांवोनि मजला भेटी देई ॥ २ ॥
कैलाशींचा शिव पूजितो तुजला । धांवोनि मजला भेटी देई ॥ ३ ॥
गहिंवरोनी नामा बाहत विठ्ठला । धांवोनि मजला भेटी देई ॥ ४ ॥

३

काय माझा आतां पहातोसी अंत । येई बा धांवत देवराया ॥ १ ॥
माझ्या जीवा होय तुजविण आकांत । येई बा धांवत देवराया ॥ २ ॥
जरी असे काम भेटूनि जाय मातें । येई बा धांवत देवराया ॥ ३ ॥
रुणझुण रुणझुण वाजताती वाळे । दावीं तीं पाउलें दयानिधे ॥ ४ ॥
अडखळोनि पडसी घालूं नको जोडा । धांवत दुडदुडां येई आतां ॥ ५ ॥
येरे येरे देवा देईन तुज पेढा । त्याला बाहे वेडा नामदेव ॥ ६ ॥
येरे येरे देवा नामा तुज बाहत । येई बा धांवत देवराया ॥ ७ ॥

४

विश्वाचा जो बाप हातीं ज्याच्या सूत्र । म्हणवितो पुत्र नंदजीचा ॥ १ ॥
तीर्थे ज्याच्या चरणीं करिताती न्हाणीं । यशोदा जननी म्हणवीतो ॥ २ ॥
वेडावला शेष शिणले वेद चारी । निजे मांडीवरी यशोदेच्या ॥ ३ ॥
शरणागता देत क्षीरसिंधु दान । चोखीतसे स्तन गोपिकेचे ॥ ४ ॥
त्रैलोक्याचा राजा वर्णू काय रंक । ऐकावें कौतुक नामा म्हणे ॥ ५ ॥

५

श्रीकृष्ण जन्मला वार्ता ही ऐकूनी । चिंता कंसमनीं प्रवर्तली ॥ १ ॥
उद्विग्न मानसीं कंस तो बैसला । सन्मुख देखिला महाबळ ॥ २ ॥
गौरवूनी त्यासी सांगे वर्तमान । शत्रूसी जाऊन कोण मारी ॥ ३ ॥

१ न प्राप्त होशी. २ मजवरी.

महाबळ दैत्य प्रतिज्ञा बोलत । शत्रूसी त्वरित मारीन मी ॥ ४ ॥
नामा म्हणे ऐसें बोलनी निघाला । वेष धरियेला कपटाचा ॥ ५ ॥

६

कंसें पाठविली मायावी पूतना । देवोनिया स्तना बाळें मारी ॥ १ ॥
दीन दुर्बळांचीं मारीत बाळकें । करीताति शोक मायबापें ॥ २ ॥
गहिंवरोनि तेव्हां पुसे परीक्षीती । भगवंताची मूर्ती बालरूप ॥ ३ ॥
अभय दे शूक बापा नको रडूं । तें काय धुंगरूडूं मारूं शके ॥ ४ ॥
नामा म्हणे आली नंदाचिये घरीं । स्वरूपें सुंदरी देवांगना ॥ ५ ॥

७

कृष्णा लावितसे स्तनीं । तीस मारी चक्रपाणी ॥ १ ॥
भयभीत पहातां प्रेत । जन विस्मय करीत ॥ २ ॥
रडे तेव्हां कृष्णमाया । वांचलासी बा तान्हया ॥ ३ ॥
सख्या मिळोनी समस्त । भाळीं आंगारा लावीत ॥ ४ ॥
तईं कुऱ्हाडी आणिती । शस्त्रें करूनी तोडिती ॥ ५ ॥
नामा म्हणे दिला अग्नि । वास न माय गगनीं ॥ ६ ॥

८

मिळवोनि सौंगडे सांगतो तयांसी । चला गोरसासी देतों तुम्हां ॥ १ ॥
गेली असे एक गौळण जळाला । सांगे गोपाळांला तेथें जाऊं ॥ २ ॥
न पुरेचि हात दूध शिंक्यावरी । करावें मुरारी कैसें येथें ॥ ३ ॥
पिळ्यावरी पेंढें रची वनमाळी । पाडीत डुंडुळी[1] मोहरीनें[2] ॥ ४ ॥
बडवोनी टीरी नाचतसे पेंदा । भली ले गोविंदा युक्ती केली ॥ ५ ॥
उगे लाले बेते कल नका गलबला । सांभाली ले गोला लोणीयाचा ॥ ६ ॥
कोणी पीती दूध कोणी खाती दहीं । आली लवलाहीं गौळणी ते ॥ ७ ॥
अहर्निशीं धराया जपतसें तुज । जाशी कैसा आज चोरटीया ॥ ८ ॥
मुखांतील पय टाकी तीच्या डोळां । नामा म्हणे पळा सांगतसे ॥ ९ ॥

९

गाऱ्हाणें सांगाया । आल्या गोकुळींच्या स्त्रिया ॥ १ ॥
यशोदा ऐकत । पळे बाहेरी भगवंत ॥ २ ॥

१ भोंक. २ मुरलीनें.

एक म्हणे लोणी । माझें भक्षी चक्रपाणी ॥ ३ ॥
फोडीतसे भांडें । वर्जिलीया म्हणे रांडे ॥ ४ ॥
गाई वांसुरें सोडितो । येउनि आम्हांसी सांगतो ॥ ५ ॥
घेत असे वरखडे । शिव्या देवोनियां रडे ॥ ६ ॥
देखोनियां गरोदर । म्हणे केवढें उदर ॥ ७ ॥
तुला येईल राग । आपल्या पोरा कांहीं सांग ॥ ८ ॥
अनंत गाऱ्हाणीं । नामा म्हणे कोण वर्णी ॥ ९ ॥

## १०

यशोदेभोंवत्या मिळाल्या गौळणी । सांगती गाऱ्हाणीं नानापरी ॥ १ ॥
गोरस चोरूनी फोडीतो भाजन । गोकूळ सोडून जाऊं आतां ॥ २ ॥
येक गोपी म्हणे माझ्या घरा येशी । बांधीन खांबाशी तुजलागीं ॥ ३ ॥
नामा म्हणे गोपी बोलिली बांधीन । तिजवरी विघ्न करी देव ॥ ४ ॥
निशी प्राप्त होतां भ्रताराचे शेजे । गोपिका ती निजे आनंदानें ॥ ५ ॥
संधी पाहोनीयां प्रवेशला देव । करीत लाघव काय तेव्हां ॥ ६ ॥
भ्रताराची दाढी कांतेची ती वेणी । एकत्र करोनी ग्रंथी देत ॥ ७ ॥
करोनी कौतुक निघोनीयां गेला । अरुणोदय झाला तयेवेळीं ॥ ८ ॥
गोदोहनालागीं गोपिका उठत । वेणी आंसडत दाढीसंगें । ९ ॥
भ्रतारासी तेव्हां बोले ते कामिनी । न[1] धाये[1] अझूनी मन कैसें ॥ १० ॥
भ्रताराची दाढी ओढितांची जाण । सक्रोध होऊन बोलतसे ॥ ११ ॥
मस्त होवोनीया माजली धांगडी[2] । करिशी ओढाओढी मजलागीं ॥ १२ ॥
नामा म्हणे तेव्हां उठोनि बैसती । आश्चर्य करिती मनामाजी ॥ १३ ॥
गोपी गोप तेथं पातले त्वरित । हांसती समस्त देखोनीयां ॥ १४ ॥
कृष्ण म्हणे कैशी बांधीशी मजला । बांधिलें तुजला भगवंतें ॥ १५ ॥
पाया पडताती रडोन बोलती । सोडवा म्हणती आम्हांलागीं ॥ १६ ॥
पाहोनीयां कींव तया आली चित्ता । कृपेनें पाहतां मुक्त झालीं ॥ १७ ॥
नामा म्हणे तेव्हां वंदोनी देवासी । गेली निजधामासी आनंदानें ॥ १८ ॥

१ तृप्त नाहीं काय ? २ दांडगी.

# तुकाराम–अभंग

## अभंग दोनचरणी

१

गणराया लौकरि येईं । भेटी सकळांसि देईं ॥ १ ॥
अंगीं सिंदुराची उटी । केशर कस्तुरी ललाटीं ॥ २ ॥
पायीं घागऱ्या वाजती । नाचत आला गणपती ॥ ३ ॥
तुका म्हणे पाहीं । विठ्ठल गणपति दुजा नाहीं ॥ ४ ॥

२

सुख पंढरीसी आलें । पुंडलीकें सांठवीलें ॥ १ ॥
प्रेम साखर जोखिती । न घे त्याचे मुखीं माती ॥ २ ॥
पंढरीचा सुखसोहळा । न घेई तो प्रेतकळा ॥ ३ ॥
तुका म्हणे धरा भावो । अभक्ताचें मढें जावो ॥ ४ ॥

३

शरण आलों नारायणा । मज अंगीकारीं दीना ॥ १ ॥
हरी आलों लोटांगणीं । लोळें तुमच्या चरणीं ॥ २ ॥
सांडियेली काया । वरी ओंवाळूनि पायां ॥ ३ ॥
तुका म्हणे शिर । ठेवियेलें पायांवर ॥ ४ ॥

४

हेंचि दान दे गा देवा । तुझा वीसर न व्हावा ॥ १ ॥
गुण गाईन आवडी । हेंचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥
नलगे मुक्ति धनसंपदा । संतसंग देईं सदा ॥ ३ ॥
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥ ४ ॥

५

तरिच जन्मा यावें । दास विठोबाचें व्हावें ॥ १ ॥
नाहींतरी काय थोडीं । श्वानसूकरें बापुडीं ॥ २ ॥
जन्मा आलियाचें फळ । आंगा लागों नेदी मळ ॥ ३ ॥
तुका म्हणे भले । ज्यांनीं देवा ओळखिलें ॥ ४ ॥

६

हेंचि देवाचें दर्शन । सदा राहे समाधान ॥ १ ॥
मानापमानाचे गोंवे । अवघे गुंडाळुनि ठेवावे ॥ २ ॥

सदा शांती राहे वस्ती । तेथें खुंटे काळगती ॥ ३ ॥
तुका म्हणे थोडें आहे । आली ऊर्मी साहुनि राहें ॥ ४ ॥

७

उठाउठी अभिमान । जाय ऐसें स्थळ कोण ॥ १ ॥
तें या पंढरिसी घडे । खळ पाझरती रोकडे ॥ २ ॥
नेत्रीं अश्रुचिया धारा । कोटि रोमांच शरीरा ॥ ३ ॥
तुका म्हणे काला । कोठें अभेद देखीला ॥ ४ ॥

८

विठ्ठलमात्रा जेणें घ्यावी । तेणें पथ्यें संभाळावीं ॥ १ ॥
काम क्रोध मीठ मिरची । यांची घेऊं नये रुची ॥ २ ॥
आशा मनसा तेलकट । यांचा येऊं द्यावा वीट ॥ ३ ॥
मद अहंकार ताक दहीं । यांतें सेवूं नये कांहीं ॥ ४ ॥
क्षमा दया तूप पोळी । सावध राहूनियां गिळीं ॥ ५ ॥
तुका स्वीकारी हरिकथा । सांडी भवरोगाची व्यथा ॥ ६ ॥

९

नाम घेतां उठाउठी[१] । पडे संसाराशी तुटी ॥ १ ॥
ऐसा लाभ व्हावा गांठी । विठ्ठलपायीं पडो मिठी ॥ २ ॥
नामापरतें साधन नाहीं । जें जें करिशील कांहीं ॥ ३ ॥
हाकारूनि[२] सांगे तुका । नाम घेतां राहूं नका ॥ ४ ॥

१०

नाम पावन पावन । याहुनि पवित्र आहे कोण ॥ १ ॥
शिव हळाहळें[३] तापला । तोही नामें शांत झाला ॥ २ ॥
पुराणाच्या कोटी । नाहीं नामावीण गोष्टी ॥ ३ ॥
मरण झालें काशीपुरीं । तेथें नामाचि उद्धरी ॥ ४ ॥
तुका म्हणे अवघीं[४] चेरें । एक हरिनाम सोयरें[५] ॥ ५ ॥

## अभंग चौचरणी

११

आम्ही नामाचे धारक । नेणों प्रकार आणीक ॥
सर्वभावें एक । विठ्ठलचि प्रमाण ॥ १ ॥

---

१ लागेहात. २ हाका मारून. ३ विषानें. ४ क्षणस्थायी शाळुसोबती. ५ हित करणारें.

... ३६०११ ... १२२६ ... १५/५८

नलगे जाणीवनेणिवे[1] । गावें आनंदें नाचावें ॥
प्रेमसुख घ्यावें । या वैष्णवांसंगतीं ॥ २ ॥
भावबळें घालूं कास । लज्जा चिंता दवडूं आस ॥
देवापायीं निजध्यास । दास म्हणवूं विष्णूचे ॥ ३ ॥
भय नाहीं जन्म घेतां । मोक्षपदा हाणूं लाता ॥
तुका म्हणे सत्ता । निकट करूं सेवेची ॥ ४ ॥

१२

सत्य साचें खरें । नाम विठोबाचें बरें ॥ १ ॥
येणें तूटती बंधनें । उभयलोकीं कीर्ती जेणें ॥ २ ॥
भाबड्याचे गांठीं । त्यासि लाभ उठाउठी ॥ ३ ॥
तुका म्हणे भोळी । विठाई कृपेची कोंवळी[2] ॥ ४ ॥

१३

हाकेसरशीं उडी । घालूनियां स्तंभ फोडी[3] ॥ १ ॥
ऐशी कृपावंत कोण । माझे विठाईवांचून ॥ २ ॥
करितां आठव । धांवोनियां घाली कव[4] ॥ ३ ॥
तुका म्हणे भक्तकाजा । उडी घाली स्वामी माझा ॥ ४ ॥

१४

हेंचि माजी आस । जन्मोजन्मीं तुझा दास ॥ १ ॥
पंढरीचा वारकरी । वारी चुकों न दे हरी ॥ २ ॥
संतसंग सर्वकाळ । सदा प्रेमाचा कवळ ॥ ३ ॥
चंद्रभागे स्नान । तुका मागे हेंचि दान ॥ ४ ॥

१५

आजी पुरले नवस । धन्य केला हा दीवस ॥ १ ॥
पहा पहा हो सकळ । पुण्यवंत तुम्हां काळ ॥ २ ॥
उजळोनी आरती । चक्रपाणी ओंवाळिती ॥ ३ ॥
तुका वाहे टाळी । होता संनिध जवळी ॥ ४ ॥

---

१ ज्ञान-अज्ञान. २ कोमल मनाची. ३ प्रल्हादाकरितां स्तंभीं अवतार. ४ मिठी.

१६

सांडुनि सुखाचा हा वांटा । मुक्ति मागे तो करंटा ॥ १ ॥
कां रे न ध्यावें हें जन्म । काय वैकुंठा जाऊन ॥ २ ॥
येथें मिळतो दहींभात । नाहीं वैकुंठीं ते मात ॥ ३ ॥
तुका म्हणे मुक्ती नलगे । राहेन संताचिये संगें ॥ ४ ॥

१७

आम्ही तरी आस । झालों टाकोनी उदास ॥ १ ॥
आतां कोण भय धरी । पुढें मरणाचें हरी ॥ २ ॥
भलते ठायीं पडो । देह तुरंगीं[1] हा चढो ॥ ३ ॥
तुमचें तुम्हांपाशीं । आम्ही आहों जैशींतैशीं ॥ ४ ॥
तुका म्हणे चित्तीं । नाहीं वागवीत खंती ॥ ५ ॥

१८

हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥ १ ॥
तोचि मोला पावे खरा । करणीचा होय चुरा ॥ २ ॥
मोहरा तोचि आंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥ ३ ॥
तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥ ४ ॥

१९

भोगें घडे त्याग । त्यागें आंगा येती भोग ॥ १ ॥
ऐसें उफराटें वर्म । धर्माचेचि आंगीं धर्म ॥ २ ॥
देव अंतरे तें पाप । खोटें वाउगा संकल्प ॥ ३ ॥
तुका म्हणे भीड खोटी । लाभ विचाराच्या पोटीं ॥ ४ ॥

## अभंग मोठे चार चरणी

१

कां माझा विसर पडला मायबापा । कोणें गुणें कृपा सांडीयेली ॥ १ ॥
कैसा कंठूनीयां राहूं या संसारीं । काय धीर तरी देऊं मना ॥ २ ॥
नाहीं निरोपाची पावली वारता । करावी ते चिंता ऐशी कांहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे येक वेंचूनी वचन । नाहीं समाधान केलें माझें ॥ ४ ॥

१ अश्व.

२

कोणा मूखीं ऐशी आयकेन मात । चाल पंढरीनाथ बोलावीतो ॥ १ ॥
न धरीन आस मागील बोभाट । वेगीं धरिन वाट माहेराची ॥ २ ॥
उबगलें चित्त करी तळमळ । केव्हां देखें मूळ आलें डोळां ॥ ३ ॥
तुका म्हणे कई भाग्याची उजरी[1] । होईल पंढरी देखावया ॥ ४ ॥

३

कां माझे पंढरी न देखती डोळे । काय हें न कळे पाप यांचें ॥ १ ॥
पाय पंथ कां हे न चालती वाट । कोण हें अदृष्ट कर्मबळी ॥ २ ॥
कां हें पायावरी न पडे मस्तक । क्षेम[2] हे हस्तक न पावती ॥ ३ ॥
काय इंद्रियांची न पुरे वासना । पवित्र होईना तुका म्हणे ॥ ४ ॥

४

लौकीकापूरती नव्हे माझी सेवा । अनन्य केशवा दास तुझा ॥ १ ॥
म्हणूनीयां देईं पायांपाशीं थारा । आणीक दूसरा नेणों आम्ही ॥ २ ॥
एकविध आम्ही स्वामीसेवेसाठीं । धरीतोंची पोटीं येकभाव ॥ ३ ॥
तुका म्हणे करीं सांगीतलें काम । तुम्हां धर्माधर्म ठावे देवा ॥ ४ ॥

५

पिंड पोसावे हें अधमाचें ज्ञान । विलास मिष्टान्न सेवूनीयां ॥ १ ॥
शरीर रक्षावें हा धर्म बोलती । काय असे हातीं तयांचिये ॥ २ ॥
क्षणभंगूर हें जाय न कळतां । ग्रास गिळी सत्ता नाहीं ऐशी ॥ ३ ॥
कर्वतीनें देहा कापीयेलें मांसा । गेले वनवासा शुकादिक ॥ ४ ॥
तुका म्हणे राज्य करितां जनक । अग्नीमाजी एक पाय जळे ॥ ५ ॥

६

भीत नाहीं आम्ही आपुल्या मरणा । दुःखी होतां जना न देखवे ॥ १ ॥
आमची हे जाती ऐशी परंपरा । कां तुम्ही दातारा नेणा ऐसें ॥ २ ॥
भजनीं विक्षेप तेंचि पैं मरण । न वजावा क्षण एक वायां ॥ ३ ॥
तुका म्हणे नलगे आघाताचा वारा । ते स्थळीं दातारा ठेवा मज ॥ ४ ॥

---

१ सफलता. २ आलिंगन.

७

काय करूं मज नाडिलें आळसें । बहुत या सोसें पीडा केली ॥ १ ॥
हिरोनीयां नेला मुखींचा उच्चार । पडीलें अंतर जवळीच ॥ २ ॥
द्वैताचीये कैसा सांपडलों हातीं । बहुत करीती ओढाओढी ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां आपुलीया सवा[1] । न्यावें मज देवा सोडवूनी ॥ ४ ॥

८

ऐसें भाग्य कई लाहता[2] होईन । सर्व मी देखेन ब्रह्मरूप ॥ १ ॥
मग तया सुखा नाहीं अंतपार । आनंदसागर हेलावेल ॥ २ ॥
शांती दया क्षमा मूर्तीमंत आंगीं । परावर्ते संगीं कामादिक ॥ ३ ॥
विवेकासहित वैराग्याचें बळ । धगधगीत ज्वाळ अग्नी तैसा ॥ ४ ॥
तुका म्हणे माझी पुरवी वासना । कोण नारायणा तुजवीण ॥ ५ ॥

९

न करावी स्तुती माझी संतजनीं । होईल वचनीं अभिमान ॥ १ ॥
भारें भवनदी न तरवे पार । दुरावती फार पाय तूझे ॥ २ ॥
स्तुती वाटे गोड अमृतापरीस । परि आहे वीष तीच्या पोटीं ॥ ३ ॥
तुका म्हणे गर्वे पुरविली पाठी । होय माझ्या तुटी विठोबाची ॥ ४ ॥

१०

मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ १ ॥
भोळे तरी देऊं गांडीची लंगोटी । खट्याळाच्या काठी देऊं माथां ॥ २ ॥
अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥ ३ ॥
मायबापाहूनी आम्ही दयावंत । करूं घातपात शत्रूहूनी ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही निजोनियां जागे । जो जो जैसें मागे देऊं तया ॥ ५ ॥

११

संकल्पा विकल्पा द्यावी तिळांजुळी । सुखें वनमाळी आठवावा ॥ १ ॥
आणिक तूं कांहीं न धरीं विचार । राहें निरंतर समाधानें ॥ २ ॥
मनासी विक्षेप उठे जरी नाना । भाकावी करूणा जिवेंभावें ॥ ३ ॥
तुका म्हणे पडे स्वरूपासी मिठी । मग पोटीं पाठीं आत्माराम ॥ ४ ॥

---

१ जवळ.  २ पावणारा.

१२

काय तुझें कैसें जाणावें तें देवा । आणावें अनुभवा कैशा परी ॥ १ ॥
सगुण निर्गुण स्थूल कीं ल्हान । न कळे अनुमान मज तुझें ॥ २ ॥
कोण तो निर्धार करूं हा विचार । भवसिंधू पार तरावया ॥ ३ ॥
तुका म्हणे कैसे पाय आंतूडती[1] । न पडे श्रीपती वर्म ठावें ॥ ४ ॥

१३

जड शोधोनियां चैतन्य काढिलें । जड काय झालें सांग मज ॥ १ ॥
पटांतील तंतू वेगळे काढिले । पट काय झाला सांग मज ॥ २ ॥
गारेंतील पाणी वेगळें काढिलें । गार काय झाली सांग मज ॥ ३ ॥
तुका म्हणे ब्रह्म वेगळें काढिलें । विश्व काय झालें सांग मज ॥ ४ ॥

१४

ब्रह्मज्ञान नव्हे लेंकरांच्या गोष्टी । तेथें व्हावा पोटीं अनुताप ॥ १ ॥
दगडाहूनी जीव करावा कठीण । अंतरींचा शीण तेव्हां जाय ॥ २ ॥
मेल्या मनुष्याची न धरीती आस । तैसा हो उदास संसारासी ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें कराराचें काम । मग आहे राम जवळीच ॥ ४ ॥

१५

आतां तरी पुढें हाची उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥
सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥
हित तें करावें देवाचें चिंतन । करूनीयां मन शुद्ध भावें ॥ ३ ॥
तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥ ४ ॥

१६

कवणाचें घर कवणाचें दार । सोडोनी संसार जाणे लागे ॥ १ ॥
जाणे लागे अंतीं येकला येकट । व्यर्थ खटपट जन्मवरी ॥ २ ॥
जन्मवरी जाण संसारीं गोविलें । नाहीं कांहीं केलें आत्महित ॥ ३ ॥
आत्महित गेलें संसाराचे ओढी । अंतीं कोण सोडी रामावीण ॥ ४ ॥
घातकाचि आहे लोकांचा तो संग । म्हणोनी निःसंग तुका राहे ॥ ५ ॥

---

१ मिळती.

१७

न ये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥ १ ॥
तयावीण नाहीं भुकेला विठ्ठल । येती तैसे बोल राम कृष्ण ॥ २ ॥
देवापाशीं मागों आवडीची भक्ती । विश्वासेंसी प्रीति भावबळें ॥ ३ ॥
तुका म्हणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिवसेंदिवस ॥ ४ ॥

१८

आपुलीया हिता जो होय जागता । धन्य मातापिता तयाचीं हो ॥ १ ।
कुळीं कन्यापुत्र होती जीं सात्विक । तयांचा हरिख वाटे देवा ॥ २ ॥
गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे मज घडे त्यांची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥ ४ ॥

१९

सदा माझ्या डोळां जडो तुझी मूर्ती । रुक्मिणीच्या पती सोयरीया ॥ १ ।
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्वकाळ ॥ २ ॥
विठो माउलिये हाचि वर देईं । येउनियां राहीं हृदयामाजी ॥ ३ ॥
तुका म्हणे कांहीं न मागें आणीक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥

२०

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥ १ ॥
आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ॥ २ ॥
कोण्याही जिवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ॥ ४ ॥

२१

निंबाचिया झाडा साखरेचें आळें । आपलीं तीं फळें न संडीच । १ ॥
तैसें अधमाचें अमंगळ चित्त । वमन तें हित करुनी सांडी ॥ २ ॥
परिसाचे आंगीं लाविलें खापर । पालट अंतर न घे त्याचें ॥ ३ ॥
तुका म्हणे वेळू चंदनासंगतीं । काय ते असती जवळीका ॥ ४ ॥

२२

रुसलों या आम्ही आपुल्या संसारा । येथें जनाचारा कोण पाड ॥ १ ॥
आम्हां इष्ट मित्र स्वजन सोयरे । नाहीं या दुसरे देवावीण ॥ २ ॥
दुरावले बंधु सखे सहोदर । आणीक विचार काय तेथें ॥ ३ ॥

उपाधि वचन नाईकती कान । त्रासलें हें मन बहु माझें ॥ ४ ॥
तुका म्हणे करा ठाकेल ते दया । सुख दुःख वायां न धरावें ॥ ५ ॥

२३

परावीया नारी माउलीसमान । मानिलीया धन काय वेंचे ॥ १ ॥
न करितां परनिंदा अभिलाष । काय तुमचें यास वेंचे सांगा ॥ २ ॥
बैसलिया ठायीं म्हणतां राम राम । काय होय श्रम तुम्हां सांगा ॥ ३ ॥
संतांचे वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेंचे सांगा ॥ ४ ॥
खरें बोलतां न लागती सायास । काय वेंचे यास तुमचें सांगा ॥ ५ ॥
तुका म्हणे देव जोडे याजसाठीं । आणीक ते आटी नलगे कांहीं ॥ ६ ॥

२४

संसाराच्या तापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥
म्हणऊनी तुझे आठविले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥ २ ॥
बहुतां जन्मांचा झालों भारवाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥ ३ ॥
वेढियेलें चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां धांव घाली वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीननाथा ॥ ५ ॥

## कवि वामनपंडित

### श्लोक वेणुसुधेंतील

मधुरवेणुरवें मन मोहरी[1] । मधुवनीं[2] मधुशत्रु[3] नमो हरी ॥
करुनि वंदन तत्पदसारसीं[4] । कथिन वेणुसुधारस सारसा ॥ १ ॥
वनीं वाजवी वेणु जेव्हां मुरारी । व्रजीं चित्त कामें स्त्रियांचें थरारी ॥
तया वर्णिती प्राण ठेवूनि कंठीं । वधूवृंद तो संकटें दीस कंठी ॥ २ ॥
अंग वक्त्र अधरीं धरि पांवा[5] । गोपवेष हरि तोचि जपावा ॥
वाम-बाहुवरि[6] गालहि डावा । तो ठसा स्वहृदयांत पडावा ॥ ३ ॥
अधरिं वेणु धरी जइं तो हरी । विरहिणीजनचित्तहि मोहरी[1] ॥
व्रजवधूसिं खुणा व्रजराज तो । मुरलिमाजि वदोनि विराजतो ॥ ४ ॥

---

१ मोहित करी. २ गोकुळांत. ३ कृष्ण. ४ पदकमळा. ५ वेणू. ६ डाव्या बाहूवर.

मोहती व्रजपशू मृगगाई । आमुचें नवल काय अगाई ॥
स्तब्ध होति लिखितें जशिं चित्रें । वेणुच्या ध्वनिरसेंचि विचित्रें ॥ ५ ॥
मातृस्तनींचा रस आननांत । तों होय वेणुध्वनि काननांत ॥
गळे गिळेना पय वांसुरांतें । आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें ॥ ६ ॥
पशु जसे ध्वनिनें स्थिर राहती । तशिं जळें न नद्यांतिल वाहती ॥
व्रजवधूसम होति नद्या[1] सये । सुकृत अल्प विकल्प न यांस ये ॥ ७ ॥
गुंजारवें भ्रमर गुंजति त्यांत देवें । वेणुध्वनी मिसळला मृदु वासुदेवें ॥
आपादकंठ वनमाळ अशी विराजे । ते सेविती मधुप[2] होउनि देवराजे ॥ ८ ॥
वनीं राजहंसीं पिकांनीं शुकांनीं । ध्वनी गोड तो आयकोनी सुकानीं ॥
त्वरें येउनी सेविलें श्रीहरीतें । महापापही नाम ज्याचें हरीतें ॥ ९ ॥
हळुहळू घन गर्जतसे नभीं । मुरलिहूनि चढेल म्हणोन भी ॥
श्रवणभक्ति–अतिक्रम वर्जतो । करित कीर्तनही घन गर्जतो ॥ १० ॥

## श्लोक राधाभुजंग

हरीचा वियोगाग्निसंताप राधा । न सोसूनियां आठवी स्वापराधा ॥
सखी एक दूती प्रिया फार तीची । बहु शाहणी मूर्ति जे भारतीची ॥ १ ॥
करी तीस काकूळती सारसाक्षी । म्हणे भेटवीं सर्वसंसारसाक्षी ॥
हरीवीण झालें बहू दीन माये । त्रिलोकीं सये दुःख माझें न माये ॥ २ ॥
सदानंद जो सर्वदा मोदराशी[3] । तया भेटवीं आजि दामोदराशी ॥
जयावीण कोणीच खेदा न वारी । त्वरें आणि वो तो सखे दानवारी[4] ॥ ३ ॥
वियोगाग्नि जाळी मला केशवाचा । न बोलों शकें ते स्वयें क्लेश वाचा ॥
न तें सांगवे दुःख तें काम दे हा । त्वरें आणि वो त्या घनश्यामदेहा ॥ ४ ॥
अशी राधिका बोलतां दीन वाणी । भरे कंठ झाली पराधीनवाणी ॥
धरूनी तिला पोटिशीं दूतिकाही । रडे आणि सांगे तिला नीति कांहीं ॥ ५ ॥
म्हणे खोडि खोटी तुम्हा मानिनींची । पुढें तूं तरी मानि हे बुद्धि नीची ॥
हरी दुःख त्या नागनक्रोद्धराशी । नको दाखवूं साजणी क्रोधराशी ॥ ६ ॥

१ नद्या; नई = नदी, याचे अनेक० सं० २ भ्रमर. ३ आनंदाची रास. ४ दानवशत्रु.

करी मच्छकूर्मादि रूपें दहा हा । तयाहीवरी कोप केला अहाहा ॥
धरी पाठिशीं सागरीं मंदराशी । हरी तोचि कीं हा निजानंदराशी ॥ ७ ॥
जगन्नाथ जो कृष्ण नानावतारी । स्वयें होउनीयां जना नाव तारी ॥
हरी कामकोपादिका साजणासी । नको कोप त्या तारका साजणासी ॥ ८ ॥
तऱ्ही खेद तूं टाकिं वो सापराधे । करीना हरी तूजशी कोप राधे ॥
स्वयें जातसें मीच आजी वनातें । त्वरें आणितें त्या जगज्जीवनातें ॥ ९ ॥
म्हणे दूतिका टाकिं या काळजीला । सये आणितें आजि गोपाळजीला ॥
वदोनी अशी चालली काननातें । वनीं देखिलें त्या मृगांकाननातें ॥ १० ॥
शिरीं पाय त्या गोपकांतापतीचे । नमूनी वदे शोक संताप तीचे ॥
म्हणे चूक तीची क्षमा देवराया । करूनी पुन्हा पाय हे दे वराया ॥ ११ ॥
वियोगें जिणें वर्जिलें अन्नपाणी । मुखातें सदा वाहते खिन्न पाणी ॥
करें पूर्ण तारापती अर्ध जाला । घना दाटि त्या ही वरी मूर्धजांला ॥ १२ ॥
जऱ्ही चूक झाली तरी राधिकेला । नव्हे योग्य हा जो तुम्ही आधि[1] केला ॥
तुम्हांला म्हणों काय मी लोकपाळा । असा बोल आम्हा स्त्रियांच्या कपाळा ॥१३॥
मुखीं गुंतला सर्वदा येक पाणी । दुजा तर्जनीनें हरी शोक–पाणी ॥
तरी काय सांगों तिच्या मी कराची । प्रभा ते हरी दीप्ति चामीकराची ॥ १४ ॥
असा प्रार्थुनीयां हृषीकेश वाचे । धरी पाय सप्रेम त्या केशवाचे ॥
घरा भक्तिभावें सखा चालवीला । न अन्या नरासारिखा चाळवीला ॥ १५ ॥
करूनि क्षमा सर्व राधाघराशी । हराया तिची कामबाधा घराशी ॥
तिच्या चालिला दूतिकाहस्त हस्तीं । धरूनी जसा चालतो मत्त हस्ती ॥ १६ ॥
प्रतीक्षा करी मंदिरीं कंबुकंठी । घडीतें युगाहूनिही थोर कंठी ॥
शुभें सूचती तो अकस्मात तीला । म्हणे आणिते गोपिका श्रीपतीला ॥ १७ ॥
असा हर्ष मानूनि गोपाळदारा । उठे जाय तत्काळ बाहेरदारा ॥
पहाते हळू चालुनी दूरदृष्टी । म्हणे लाभ आहे नवा हा अदृष्टीं ॥ १८ ॥
अकस्मात तों मूर्ति गोविंदजीची । दिसे पुत्रता मानितो नंदजीची ॥
पहातां प्रियेला प्रियेच्या मुखाशीं । त्रिलोकीमधें दाटि झाली सुखाशी ॥ १९ ॥

---
१ दुःख.

भुजा कंचुकी फाटताहे तडाडां । करी कंकणें फूटतीही कडाडां ॥
पुढें होउनी तत्करांभोरुहातें । उरोजीं धरी गाढ रंभोरु हातें ॥ २० ॥
घरामाजि नेऊनियां ये रितीनें । मुकुंदासि आलिंगिलें गाढ तीनें ॥
वियोगें तुझ्या दीन मी चक्रपाणी । म्हणे तों भरे लोचनामाजि पाणी ॥ २१ ॥
पुशी चक्रपाणी करें अश्रु तीचे । जया वर्णिती वृंद वेदश्रुतींचे ॥
करी जो स्वदासाचिया ध्वस्त काळा । जळें कज्जळें तो तिच्या हस्त काळा ॥ २२ ॥

## वामनचरित्र

करिं कमंडलु दंड मृगाजिन । त्रिजगमाप करी बटु वामन ॥
सकळवेदविशारद चांगला । कटितटीं अतिसुंदर मेखला ॥ १ ॥
बहुपटूवचनें चिमणा बटू । करि उदारकथा भल्या लटू ॥
करिं कमंडलु त्या जगजीवनें । त्रिजग उद्धरिलें पदजीवनें ॥ २ ॥
पदयुगें भुवनत्रय मोजिलें । पद तिजें बळिच्या शिरीं योजिलें ॥
पदनखें विधि-अंड विदारिलें । पदजळें भुवनत्रय तारिलें ॥ ३ ॥

## गाऱ्हाणीं

कडे घेउनी कृष्णनाथा उदारा । गृहद्वारदेशीं उभी नंददारा ॥
मिळे बायको मात्र तेथें व्रजाची । ह्मणे पुत्र तूझा अवो तीव्र जाची ॥ १ ॥
कडे दिसतो तूझिया साधु हा गे । मुते आमुच्या उंबरां आणि हागे ।
पडे नेणतां पाय वो त्याचमाजी । करी हास्य तेव्हां मुलांच्या समाजीं ॥ २ ॥
बरें गोड तें सर्व चोरूनि खातो । कळे ठाव तो नाकळे आणिका तो ॥
दहीं दूध भक्षूनि दे मर्कटांतें । करूनी तयां तृप्ति फोडी घटांतें ॥ ३ ॥
निद्रितासि चरणीं तुडवीतो । लेंकुरें उठवुनी रडवीतो ॥
थुंकुनी भरवितो वदनातें । आग लावुनि म्हणे सदनातें ॥ ४ ॥

## शबराआख्यानांतील श्लोक.

ज्याच्या मस्तकिं दीर्घ नूतन जटा फेटा दिसे टोप तो ॥
माजीं वेष्टित वल्कलें झळकती दूजा म्हणे कोण तो ॥
आश्चर्या अति पावली बघुनियां तूणीर[1] पाठीवरी ॥
राजीवाक्ष[2] असा विलोकुनि वधू[3] धांवे जशी बावरी ॥ १ ॥

१ भाता. २ कमलनेत्र राम. ३ शबरी.

देखोनि डोळां हृदयाभिरामा । रामापुढें धांवतसे सुकामा ॥
पुष्टांग झाली स्वसुखें भजाया । साष्टांग वंदी रघुराजपायां ॥ २ ॥
बहू दीससी राघवा तूं भुकेला । तुवां पाहिजे वा फळाहार केला ॥
तुझ्या कारणें म्या फळें गोड रामा । पहा आणिलीं सेविं सीताभिरामा ॥ ३ ॥
सारीं क्षतांकितफळें निरखोनि डोळां । कां हो अशीं तिस पुसे रघुराज भोळा ॥
चंचूपुटेंचि बहु चोखिलिं पांखरांनीं । नेणो दिला प्रतिफळास नखांक रानीं ॥ ४ ॥
चंचूक्षतें हीं नव्हती दयाळा । मी कां तशीं आणिन हा कपाळा ॥
म्यां आपुल्या चावुनि शुद्ध दांतें । चाखोनि घे मीच करें तुह्मातें ॥ ५ ॥
मधुरतर फळांची पूर्ण घेऊनि गोडी । मग मज रघुनाथा ठेविता होय खोडी ॥
निरखुनि रघुरायें भाव त्या भिल्लिणीचा । परम मनिं सुखावे नाथ तो जानकीचा ॥६॥
भिल्ली बोलुनि बोल सुंदर असे रामा करीं तीं फळें ॥
घाली नेणुनि शास्त्रषिद्ध[1] पुरुषां उच्छिष्ट देतां बळें ॥
प्रेमें प्रेमभरें प्रसन्नहृदयें भक्ता जनाचा पिता ॥
आत्माराम रमापती निजमुखीं झाला फळें अर्पिता ॥ ७ ॥
भिल्लिच्या वनफळें मन धालें । लोकनायक म्हणे सुख झालें ॥
प्रेम रामहृदयीं बहु आलें । बाप्पतोय नयनांत निघालें ॥ ८ ॥
रामचंद्रविभुच्या चरणासी । लक्षुनी विनटली शरणासी ॥
वंदितां बहुसुखेंचि वधू[2] ते । अश्रुनें चरणपल्लव धूते ॥ ९ ॥
माझें मनोगत वियोग तुझा नसावा । रूपीं तुझ्या दृढ असेन महानुभावा ॥
स्वामी म्हणे तुज वियोग कधीं न वाटे । जा शेवटीं मिळसि चिन्मयराजवाटे ॥ १० ॥

## नामसुधाप्रकरणीं श्लोक

निगमहि हरिनामीं गर्जती वर्णवर्णीं । पतित तरति नामें आश्रमी आणि वर्णी ॥
हरिपदिं हरिनामीं जेंवि मुद्रा सुवर्णीं । जगिं कवण असा जो नाममाहात्म्य वर्णी ॥ १ ॥
न करुं पातक निश्चय हा घडे । मन तथापिहि पापपथीं पडे ॥
जरि धरी हरिनामक वित्त हें । अशुभही शुभ होइल चित्त हें ॥ २ ॥

१ निषिद्ध. २ भिल्ली. ३ हें आख्यान आनंदतनयकवीचें आहे. सं०

जन न इच्छुनि शुद्धि अशी जरी । न कळतां हरि आठविती तरी ॥
जळति पापकुळें अनळें जशीं । न कळतांहि तृणें जळती तशीं ॥ ३ ॥
येथें म्हणाल जळती जरि सर्व पापें । मूळें न कां जळति नाममहाप्रतापें ॥
नेणोनि नाम म्हणतां दुरितासि जैसें । जाळी न कां सकळपातकमूळ तैसें ॥ ४ ॥
धातूवरी अनळ नेणत बाळ घाली । तो अग्नि धातुमळ तो अतिशीघ्र जाळी ॥
ताम्रादि भस्महि तया अनळेंचि जेव्हां । कर्ता अभिज्ञ बहु जाळिल धातु तेव्हां ॥५॥

न जाणतहि ये मुखा हरि तथापि पापें हरी ।
स्मरोनि महिमा स्मरे वदनिं तींच नामें जरी ॥
प्रवृत्तिविषयीं जरी असति त्या जनांचीं मनें ।
विरक्त करितो हरी स्वगुणनामकीर्तनें ॥ ६ ॥

जगत्कार्य तो कारण श्रीमुरारी । स्वयें तोचि तेथें वसे निर्विकारी ॥
स्वरूपें स्फुरद्रूप सर्वत्र आहे । मुखीं नाम ज्याचें तयालागिं पाहे ॥ ७ ॥

सुवर्ण म्हणतां जसें कनककुंडलीं तें दिसे ।
मुकुंद म्हणतां तसा जनसुतादिकीं तो असे ॥
सुतादि सकळात्मतेकरुनि वर्ततो जो हरी ।
अशेषजनपातकें करुण तो स्वनामें हरी ॥ ८ ॥

अजितनाम असें भलत्या मिसें । करि कृतार्थ अमोघ सुधारसें ।
करुनि शाकहि भक्षिलि औषधी । न करि ते गुण हें न घडे कधीं ॥ ९ ॥
हरी आठवीला जरी दुष्टचित्तीं । हरी पापमूळ कुमार्गप्रवृत्ती ॥
कळोनी जरी आठवीजे मुरारी । हरी पातकें तीं अशीं याप्रकारीं ॥ १० ॥
न ठावा हरी आणि ठावीं न नावें । अशाच्या मुखा नाम आलें स्वभावें ॥
अनिच्छेकरूनी मुखा नाम आलें । हरी मानितो कीं मला आठवीलें ॥ ११ ॥

आयासाविणही कथा परिसतां गोडी हरीच्या गुणीं ।
ज्या चित्ता उपजे निघे सहज तो त्याच्या पदीं तत्क्षणीं ॥
ऐसें ये रिति अर्पिती सहजही जें येक दात्या मना ।
ते स्वप्नीं नयनीं न देखति यमा कैंच्या तयां यातना ॥ १२ ॥

हरुनि सकळ पापें गोड होतील नामें । मग मनिं अभिरामें सूचती विष्णुधामें ॥
हरि सकळहि पापें तत्फळें दुःखवृंदें । हरि हरि म्हणवीलें यास्तव श्रीमुकुंदें ॥ १३ ॥
सहजही हरिकीर्तन जो करी । सुमति देइल त्यासहि तो हरी ॥
परमशुद्धिहि जे जन इच्छिती । सुगति दे हरि तोचि रमापती ॥ १४ ॥
हरिकथा उदरार्थ जरी करी । स्वगुणनाम धरी भलत्या परी ॥
विकितसे उदरार्थ फुलें जरी । शुभ सुगंध चुके न कधींतरी ॥ १५ ॥
कोण्यामिसें करुनि यो हरिनाम वाचे । जे पापराशि अवघे जळतील त्याचे ॥
वाचे जरी सुतनिमित्तक नाम आलें । सांकेत्यकीर्तनमिसें[1] अघ तें जळालें ॥ १६ ॥
वाचाच ते सार्थक मानवाची । वाची कथा आवडि राघवाची ॥
दानादिकें अर्चन हो कराया । या दीधलें श्रीहरिनें कराया ॥ १७ ॥

## सुभाषित श्लोक

१

काळचोर घिरट्या घरिं घाली । पामरा निज कशी तुज आली ॥
जाग तूं निजरुपीं त्वलाहें । जातसे वय अमोलिक पाहें ॥ १ ॥
माझा मित्र सखा म्हणोनि हृदयीं विश्वासला जो असा ।
अंकीं ठेउनि मस्तकासहि निजे त्याला वधी जो तसा ॥
निःपापा यमधर्मराज नरकीं घालूं म्हणे जेधवां ।
विश्वासोनि अशास शुद्धजन हे होती कसे तेधवां ॥ २ ॥
जे मायबापजन शासनदंडधर्ते । जे साधु सर्व सम जे नयनीतिकर्ते ॥
ऐशांसही विषमता उपजेल जेव्हां । कोणास हे शरण जातिल लोक तेव्हां ॥३॥
अन्याय आचरति संत समर्थ जेथें । तैसेच सर्वजनही करितील तेथें ॥
तेव्हां बुडेल जग भाव धरूनि ऐसा । हा श्लोक यावरि पहा वदतील कैसा ॥ ४ ॥
जसा वर्ततो लोक कल्याणकारी । जगीं वर्तती लोकही त्या प्रकारीं ॥
वदे तो सदाचार शास्त्रार्थ जैसे । जगीं वर्तती लोकही सर्व तैसे ॥ ५ ॥
भिन्ना नसोनि दिसती जळभिन्न गारा । वर्तूळ शुभ्र कठिणा मृदु थंडगारा ॥
तैशाच ब्रह्मउदधींतिल विश्वगारा । वाजे असा निगमभूपतिचा नगारा ॥ ६ ॥

१ पुत्रादिकांस ठेवलेलं नांव.

२

ज्याच्या कदापि न रिघे उरुगाय[1] कानीं । गातां मुकुंदचरितामृत गायकांनीं ॥
तो तो श्वसूकरखरोष्ट्रसमान होतो । वाहे वृथा नरपणा अभिमान हो तो ॥ १ ॥
हाडि हाडि म्हणतांहि नरा हे । श्वानबुद्धि विषयांत नरा हे ॥
ग्रामसूकर असा वळखा तो । कीं अमंगळचि केवळ खातो ॥ २ ॥
लत्ताप्रहार वदनीं अतिगाढ वाचा । हा यज्ञ गाढविनिमित्तचि गाढवाचा ॥
हाले निमेष इतक्यांतचि भोग झाला । ऐशा सुखें कुनर हो न भजा अजाला ॥३॥
चिंध्या न सांपडति काय उग्याच वाटे । कंथेनिमित्त जरि शीत तनूस वाटे ॥
ऐसें असोनि म्हणतो शुक वाक्य कीं कां । ज्ञाते भले भजति दुष्टधनांध लोकां ॥४॥
अन्नाविणें विकळ देह म्हणाल होतो । भिक्षाशनें भजनहेतु जिताचि होतो ॥
तें तो मिळेचि म्हणतो शुक यावरी कां । ज्ञाते भले भजति दुष्टमदांध लोकां ॥५॥
राहावया मठगृहादिक तों सजावें । याकारणें जरि धनांधगृहासि जावें ॥
कोण्हीं गुहा शुक म्हणे न निरोधिल्या कां । ज्ञाते भले भजति दुष्टमदांध लोकां ॥६॥

ईश्वरें तुज दिली नरकाया । साधनें करिशि तूं नरका या ॥
भोगिशी निशिदिनीं विषयातें । मानिशी न मनिं तूं विष यातें ॥ ७ ॥
कृतयुगाहुनि उत्तम हा कली । म्हणुनि भागवतीं मुनि हाकली ॥
नरतनू अजि त्यांतहि जी भली । अजित नाम वदे तरि जीभली ॥८॥

कलियुग चवथें हें दोषसिंधूच सारा । सकळहि नरकाच्या साधनांचा पसारा ॥
परि हरिगुणलीला सत्कथा यांत सारा । त्यजुनि सकळधंदा कीर्तनीं काळ सारा ॥९॥

कुऱ्हाडीच्या घायाप्रति तरु जसा का तुटतसे ।
तसें आयुष्याचें दिनरजनिमानें घटतसे ॥
नृदेहाचें ऐसें वय समजतां ऊर उलतो ।
तरीं साधेऐसा कुनर विषयातेंच भुलतो ॥ १० ॥

जरि हरिगुणरत्नीं गुंफिली होय वाणी । तरि परमसुखाला काय हो त्यास वाणी ॥
स्तवि इतर नरांतें जीभ ते दैन्यवाणी । मुठिहिभरि न देती पिष्ट संतुष्टवाणी ॥११॥

अरे ग्रासोग्रासीं रघुपतिसि कैसा विसरसी ।
जयाचीं हीं नामें वदनिं वद सिद्धांतसरसी ॥

[1] भगवान विष्णु. मं०.

मुकुंदा गोविंदा म्हणत मनिं जिव्हेसि सुचवी ।
बरीं ध्यावीं ऐसें जन सकळिकां राम सुचवी ॥ १२ ॥
माय ते सदय लेंकुरवाळी । बाळकाप्रति जशी कुरवाळी ॥
राम तद्रुपभवां कुरवाळी । तारिला शतमखांकुर वाळी ॥ १३ ॥
दास्य दे हरि तुझ्या चरणाचें । कीर्तनश्रवणआचरणाचें ॥
दे अनन्य हृदयीं स्मरणातें । हें न देसि तरि दे मरणातें ॥ १४ ॥

## कवि रामदास

### अभंग

१

संताचे संगतीं काय प्राप्त होतें । ते तुम्हां निरुतें सांगईन ॥ १ ॥
सांगईन परी मानसीं धरावें । मग उद्धरावें या संसारीं ॥ २ ॥
संसारींचें सार जया नाश नाहीं । तेंचि पडे ठायीं संतसंगें ॥ ३ ॥
संतसंगें चुके जननीजठर । दुस्तर संसार मायाजाळ ॥ ४ ॥
मायाजाळ तुटे जरी देव भेटे । संतसंगें आटे भवसिंधू ॥ ५ ॥
भव भयानक बुडवी सकळां । त्याहूनि वेगळा साधुसंग ॥ ६ ॥
साधुसंग साधी असाध्य वस्तूसी । जेथें आहे त्यासी वाट नाहीं ॥ ७ ॥
वाट नाहीं जेथें जावया इतरा । अभाविका नरा पापबुद्धी ॥ ८ ॥
पापबुद्धी झडे संताचे संगतीं । नाहीं अधोगती गर्भवास ॥ ९ ॥
गर्भवास संतसंगें मुक्त होय । वेगीं धरीं सोय आलीया रे ॥ १० ॥
आलीया संसारीं स्वहित विचारीं । एकें भावें धरीं संतसंग ॥ ११ ॥
संतसंग धरी धन्य तो संसारीं । बोलीले श्रीहरी भागवतीं ॥ १२ ॥
प्रयासें साधीतां कधीं न ये हाता । तें लाभे तत्वतां साधुसंगें ॥ १३ ॥
साधूचेनि संगें अलभ्याचा लाभ । मुक्ती हे सुलभ होत असे ॥ १४ ॥
आहे एक देव परी तो कळेना । जयासी मिळेना संतसंग ॥ १५ ॥
संतसंग नाहीं जयालागीं जनीं । तया कां जननी प्रसवली ॥ १६ ॥
प्रसवली माता शीणचि उरला । पुत्र नाहीं झाला हरिभक्त ॥ १७ ॥
हरिभक्त नर वंशाचें मंडण । दोषांचें खंडण करीतसे ॥ १८ ॥
पावशील गती शुद्ध नीरूपणें । रामदास म्हणे क्षमा करीं ॥ १९ ॥

२

मन हें विवेकें विशाळ करावें । मग आठवावें परब्रह्म ॥ १ ॥
परब्रह्म मनीं तरीच निवळे । जरी बोधें गळे अहंकार ॥ २ ॥
अहंकार गळे संताचे संगतीं । मग आदीअंतीं समाधान ॥ ३ ॥
समाधान घडे स्वरूपीं राहतां । विवेक पाहतां निःसंगाचा ॥ ४ ॥
निःसंगाचा संग दृढ तो धरावा । संसार तरावा दास म्हणे ॥ ५ ॥

३

रात्रंदिवस मन राघवीं असावें । चिंतन नसावें कांचनाचें ॥ १ ॥
कांचनाचें ध्यान परस्त्रीचिंतन । जन्मासी कारण हींच दोन्ही ॥ २ ॥
दोन्ही नको धरूं निंदा नको करूं । तेणें हा संसारू तरशील ॥ ३ ॥
तरशील भवसागरीं बुडतां । सत्येंचि अनंताचेनि नामें ॥ ४ ॥
नामरूपातीत जाण तो अनंत । दास म्हणे संतसंग धरा ॥ ५ ॥

४

स्वार्थ केला जन्मवरी । लोभें राहिला श्रीहरी ॥ १ ॥
धनधान्य अहर्निशी । गाइमहिषी घोडे दासी ॥ २ ॥
शेतवाडे घर ठावो । प्राणी जीवीं धरी हावो ॥ ३ ॥
माता पिता बहिणी भ्राता । कन्या पुत्र आणि कांता ॥ ४ ॥
व्याही जांवई आपुले । इष्टमित्र सुखी केले ॥ ५ ॥
दास म्हणे वो शेवटीं । प्राप्त झाली मसणवटी ॥ ६ ॥

५

जन्मवरी शीण केला । अंतकाळीं व्यर्थ गेला ॥ १ ॥
काया स्मशानीं घातली । कन्या पुत्र मुरडलीं ॥ २ ।
घरवाडा तो राहिला । प्राणी जातसे एकला ॥ ३ ॥
धनधान्य तें राहिलें । प्राणी चर्फडीत गेले ॥ ४ ॥
इष्टमित्र जे सांगाती । आपुलाले घरा जाती ॥ ५ ॥
दास म्हणे व्यर्थ मेले । कांहीं पुण्य नाहीं केलें ॥ ६ ॥

६

दैन्यवाणा झाला प्राणी । चंद्री लागली नयनीं ॥ १ ॥
म्हणती ऊचला ऊचला । आतां भूमीभार झाला ॥ २ ॥
घोर लागला अमूप । प्राणी झाला प्रेतरूप ॥ ३ ॥
दांतखिळ बसली वाणी । ताठा भरला करचरणीं ॥ ४ ॥
डोळे विक्राळ दिसती । झांका झांका मुलें भीती ॥ ५ ॥
रामीरामदास म्हणे । अवघीं सुखाचीं पीसुणें ॥ ६ ॥

७

एकादशी नव्हे व्रत । वैकुंठींचा महापंथ ॥ १ ॥
परी रुक्मांगदा ऐसा । व्हावा निश्चय मानसा ॥ २ ॥
एकादशी उपोषणें । विष्णुलोकीं ठाव घेणें ॥ ३ ॥
रुक्मांगद होता नर । आम्ही काय आहों खर ॥ ४ ॥
तेणें नेला अवघा गांऊ । आम्ही स्वयें तरी जाऊं ॥ ५ ॥
रामीरामदास म्हणे । काय प्रत्यक्षाप्रमाणें ॥ ६ ॥

८

ध्यान लागलें रामाचें । दुःख हारलें जन्माचें ॥ १ ॥
रामपदांबुजावरी । वृत्ति गुंतली मधुकरी ॥ २ ॥
तनू मेघश्याम मेळे । चित्तचातक नीमाले ॥ ३ ॥
रामचंद्र नाम येकीं । चक्षूचकोर झाले सुखी ॥ ४ ॥
कीर्तीसुगंध तरुवरी । कुजे कोकिळवैखरी ॥ ५ ॥
रामी रामदासस्वामी । प्रगटले अंतर्यामीं ॥ ६ ॥

९

मुकुट किरीट कुंडलें । तेज रत्नांचें फांकलें ॥ १ ॥
ऐसा राम माझे मनीं । सदा आठवे चिंतनीं ॥ २ ॥
जडितरत्नांचीं भूषणें । दशांगुळीं करिं कंकणें ॥ ३ ॥
कासे शोभे सोनसळा । कटीं सुवर्णमेखळा ॥ ४ ॥
चरणीं नूपुरांचे मेळे । वांकी गर्जती खळाळे ॥ ५ ॥

राम सर्वांगीं सुंदर । चरणीं ब्रीदाचा तोडर ॥ ६ ॥
गळां पुष्पांचिया माळा । वामीं शोभे भूमिबाळा ॥ ७ ॥
स्वयंभ सुवर्णाची कास । पुढें उभा रामदास ॥ ८ ॥

१०

सोडीं संसाराची आस । धरीं भक्तीचा हव्यास ॥ १ ॥
दुःखमूळ हा संसार । तयामध्यें भक्तीसार ॥ २ ॥
ग्रंथ पाहतां लक्षकोटी । जेथें तेथें भक्ती मोठी ॥ ३ ॥
जन्मा आलियाचें फळ । राम करावा जवळ ॥ ४ ॥
रामदास वदे वाणी । सोडी संसारासी पाणी ॥ ५ ॥

## कवि मुक्तेश्वर

### ओंव्या नारदनीतींतील

(महाभारतीं सभापर्वी राजसूयज्ञांत धर्मराजास नारदमुनि प्रश्नद्वारा नीति सांगतात.)

नारद म्हणे महाराजा । धर्मस्वरूपा धर्मात्मजा ॥
नामासारखी सुतेजा । करणी निर्मळ असे कीं ॥ १ ॥
ऐश्वर्य लाधल्या संपूर्ण । धर्मीं वर्तत असे कीं मन ॥
राज्यमदें दुरभिमान । तुज संचरला नाहीं कीं ॥ २ ॥
न्यायें अर्जिला जो अर्थू । व्यय करिशी कीं धर्मार्थु ॥
विषयकामलोभें तुझें चित्तु । विटाळलें नाहीं कीं ॥ ३ ॥
वडील आचरले जो धर्म । तोच चालविशी कीं नेम ॥
विहितभंगाचा कर्दम । तुज लेपला नाहीं कीं ॥ ४ ॥
धर्माशीं अविरोधी जो काम । तोचि सेविसी कीं सुगम ॥
इंद्रियलोलुपतेचा भ्रम । प्राप्त झाला नाहीं कीं ॥ ५ ॥
अनायासीं हो कीं सायासीं । भाग्यें जोडिल्या संपत्तीसी ॥
विभागूनि समस्तांसी । सेविसी कीं सुजाणा ॥ ६ ॥
अहोरात्रीं साठ घडी । लोटतां पापपुण्याची जोडी ॥
किती झाली हें घडीघडी । विचारीत असशी कीं ॥ ७ ॥

समता संतोष सद्विवेक । चौथा साधुसंग देख ॥
यांसीं करूनिया सख्य । मित्रभावें अससी कीं ॥ ८ ॥
कामक्रोधलोभत्रया । मोहमदमत्सर यया ॥
वर्जित्या नियोजित्या ठाया । जाणसी कीं जाणत्या ॥ ९ ॥
काम नसावा परस्त्रियेचा । क्रोध नसावा सत्पुरुषाचा ॥
लोभ नसावा शरीराचा । मोह पुत्राचा बाधक ॥ १० ॥
मद नसावा सुहृदजातीं । मत्सर नसावा सर्वांभूतीं ॥
तुझे वर्तणुकेची शक्ती । सांग ऐशी आहे कीं ॥ ११ ॥
काम असावा ईश्वरभजनीं । क्रोध असावा इंद्रियदमनीं ॥
तीर्थप्रसादशेषग्रहणीं । लोभ अपार असावा ॥ १२ ॥
मोह असावा सज्जनासीं । मद असावा दुर्जनासीं ॥
मत्सर सदा संसारासीं । असवा तो असे कीं ॥ १३ ॥
आज्ञा कीर्ति द्विजपालन । दान भोग मित्रसंरक्षण ॥
साही गुणीं तव प्रधान । सालंकार असती कीं ॥ १४ ॥
निर्लोभी आणि विश्वासिक । वंशज असती कीं सेवक ॥
जे स्वामिकार्जीं देख । देह देती सांडणें ॥ १५ ॥
वेतन भक्षूनि पवित्र । राजद्रव्य ज्यां अपवित्र ॥
ऐसे नियोगें स्वतंत्र । स्वस्वव्यापारीं असती कीं ॥ १६ ॥
अमात्यपदीं दासीपुत्र । अधमस्थळीं परमपवित्र ॥
अपूज्या पुजोनि सत्पात्र । अवमानीत नाहींस कीं ॥ १७ ॥
अचाट कार्य साधी भृत्य । वेतनाहूनि शतगुणित ॥
द्रव्य देऊनि त्यांचें चित्त । संतोषवीत आहेस कीं ॥ १८ ॥
आपुल्या काजीं पावले मरण । त्यांचीं कुटुंबें आश्वासून ॥
आपुल्या कुटुंबासमान । पाळिशी कीं दयाळा ॥ १९ ॥
दरिद्रकाळींचीं बाळमित्रें । भेटों आलिया स्नेहपात्रें ॥
वोळखी देऊनि दर्शनमात्रें । श्रियावंत करिशी कीं ॥ २० ॥
परमगुण परीक्षा जाणणें । चित्त कळवळे परवेदने ॥
हीं मुख्य प्रभूचीं लक्षणें । तुझ्या ठायीं असती कीं ॥ २१ ॥

नेमाहूनि आगळें धन । घेऊनि प्रजांचें पीडण ॥
करिते जे अयोग्य प्रधान । ते पदातीत करिशी कीं ॥ २२ ॥
तीर्थयात्रे जाती जन । त्यांतें कोंडोनि घेती जे धन ॥
त्यांचें करूनियां हनन । मार्ग मुक्त करिशी कीं ॥ २३ ॥
सांगावया क्लेशगोष्टी । दुर्बळ घेऊं इच्छिती भेटी ॥
तयां येतयां आडकाठी । तुझ्या दारीं नाहीं कीं ॥ २४ ॥
आंगींचें एक रोम उपडे । तें जैसें हृदया ठाउकें पडे ॥
तेंवि प्रजा पावतां पीडे । जाणशी कीं तात्काळ ॥ २५ ॥
तुझिया राज्यामाजि प्राज्ञा । पुत्र पाळिती पित्राज्ञा ॥
न करितां पुरुषाची अवज्ञा । स्त्रिया स्वधर्में असती कीं ॥ २६ ॥
वर्षकार्य एक मासें । मासाचें तें एक दिवसें ॥
दिवसकार्य एकनिमिषें । संपादीत असती कीं ॥ २७ ॥
रोगें प्रवासें पीडिलें । कारागृहीं जे का अटकले ॥
ते ते सांभाळूनियां भले । क्लेशातीत करिशी कीं ॥ २८ ॥
गृहा पावलिया क्षुधापीडितें । ते तृप्त होऊनि पंचामृतें ॥
आशीर्वचनीं स्वस्थळातें । तुजपासूनि जाती कीं ॥ २९ ॥
आवडीचे निज आप्त । गुणी जामाता श्रियावंत ॥
तथा ऐशी परम आर्त । याचकांतें करिशी कीं ॥ ६० ॥
निरपेक्ष निर्लोभ भांडारी । क्लीबरक्षक अंतःपुरीं ॥
शुचिष्मंत तृप्त जठरीं । पापकर्ते असती कीं ॥ ३१ ॥
बोलों जाणती समयोचित । चतुर जे का शास्त्रीपंडित ॥
ते ते शिष्ट संग्रहाआंत । ठेविशी कीं नरेंद्रा ॥ ३२ ॥
जितेंद्रिय ज्ञानवंत । परमपवित्र साधु शांत ॥
ऐसे सभासद सभेआंत । निकटवर्ती असती कीं ॥ ३३ ॥
दुष्ट दुर्जन क्षुद्र कोपी । वाङ्निष्ठुर परम संतापी ॥
पैशुन्यवादी महापापी । सभास्थानीं वर्जिशी कीं ॥ ३४ ॥
जागा होवोनि अपरराती । सारासार विचार नीति ॥
मोक्षोपाय भवनिवृत्ती । विचारीत असती कीं ॥ ३५ ॥

अजिंक शत्रूतें जिंकावें । जिंकिले ते प्रतिपाळावे ॥
शरणागत ते रक्षावे । ऐसें करीत असशी कीं ॥ ३६ ॥
मठवापिका देवागार । भंगल्या जाणोनि जीर्णोद्धार ॥
दीपनैवेद्य निरंतर । चाल्वीत असशी कीं ॥ ३७ ॥
पर्वकाळीं स्त्रीसंगमन । सूर्योदयीं निद्रासंपन्न ॥
एकल्या पंक्ती मिष्टान्न-। भक्षण घडत नाहीं कीं ॥ ३८ ॥
तुवां अथवा प्रधानीं । रहस्य बोलिजे एकांत स्थानीं ॥
तें बाहेर लोकांचे कानीं । प्रगठ होत नाहीं कीं ॥ ३९ ॥
अर्थव्ययाचे अधिकारी । गणक लेखक प्रथमप्रहरीं ॥
सिद्धपत्रें धरूनि करीं । उभे सन्मुख असती कीं ॥ ४० ॥
जो का राजा ऐशिये परी । चहूंवर्णांचें पालन करी ॥
पृथ्वी भोगोनि लोकांतरीं । शक्रसायुज्य स्वयें पावे ॥ ४१ ॥

## कवि अमृतराव

### नारदास ध्रुवास उपदेश–चूर्णिका

रे रे आदिराज वंशावतंसा; स्वराज्यसरोवरवियोगित बालहंसा; अंसावरोनि गलितोत्तरीय पुंसा; चौसाचा गर्भ कौंसारी गिंसावयालागि धिंसा धरोनि वागवितोसि निःश्वशसनविराजधिंसा; तरी येथ पाहिजे मुख्य अहिंसा, तेव्हांच हरिदर्शनें होशील हिंसा, अंगीकारावी उत्तरमीमांसा, शीर्णपर्णाऽनिलाहारें शुष्क करावें स्वदेहमांसा, सांसारिक दुःख, विध्वंसावयालागिं आत्मप्रशंसाविवर्जित परमहंसाचिया पदपांसामाजि सांसारिकजनरहित असावें ॥ केवळ विविक्तदेशीं द्वेषियुक्तदुर्वासनादुर्वासनरचितमृद्वासनावैरि मैत्र्यादिवासनायुक्तहर्युपासना करीत बसावें ॥ आब्रह्मादिभुवनभोगीं रुसावें ॥ यदृच्छालाभसंतुष्टद्वंद्वातीतविमत्सरपणें विलसावें ॥ अमानित्वादिसाधन भगवद्गीतेसि पुसावें ॥ अंतर्बाह्यवैराग्य भाग्यामाजि योग्य सदाचरणें मानस करावें ॥ दुराग्रहवितंडावाद न करोनि सच्छास्त्रसद्गुरुवाक्य परिसावें तार्तीयभागउर्वरीत शार्वरींत उठावें ॥ निरलसपणें चित्त ठसावें ॥ ब्राह्ममुहूर्तापासूनि शय्यासनस्थनित्यापरोक्ष ब्रह्मवस्तु आपण अनुभवोनि ब्रह्मरंध्रीं-

सहस्रदलपंकजीं सद्गुरुध्यानमानसपूजनें अजपाजप निवेदनानंतर प्रातःस्नान संध्या ब्रह्मसनातनजप करोनि यथापद्धति वैदिकतांत्रिकमिश्रित परमेश्वरार्चन आरंभावें ॥ पुरुषसूक्तोक्तरीत्या षोडशोपचारें यद्वा चतुःषष्ट्योपचारामाजि यथापद्धति लब्धोपचारें तन्मयतेनें शैलीदारुमयीलेप्यालेख्यासैकती अथवा सूर्यमंडळीं जळीं स्थळीं अग्र-मूर्तिस्वरूप श्रीहरीसि पुजावें ॥ मग स्वास्तिकासनीं मीलिताधरवियोगदंतपंक्ति अस्पृष्टरसनासमकायशिरोग्रीवअर्धोन्मीलितनेत्रतत्त्वमुद्राधृत हृत्कमळीं विष्णूचें ध्यान करावें ॥ चरणकमळनाभिकमळमुखकमळ नेत्रकमळ हा विमलकमलविग्रहभक्तमनो-भ्रमर जीवनसाधक नेत्रषट्पदा राम सजलजलदश्याम कनकमुकुटकनककुंडल-कनकहारकनककेयूर कनककटक सौंदर्यकटकाकृति अकपट अतिनिकटकनकपटालंकृत कनकवृष्टिकारक परमप्रसन्न ईषत् हास्यवदन प्रसादाभिमुख वरदानयुक्त चतुर्भुज-शंखचक्रगदापद्म पीतांबरधरवत्सश्रीवत्स कौस्तुभआपादलंबिनीवनमाला कालत्रया-बाधित सत्यज्ञानानंदैकमूर्तिच्या एकैकावयवीं चित्त स्थिर करीत जावें ॥ अंघ्रितलापासूनि शनैः शनैः अजितस्वरूप जितावें ॥ मग अखंडाकाराकलितवृत्तिनें नखशिखपर्यंत चिंतावें ॥ चिंतितां चिंतितां स्वेदरोमांचकंपवाग्गद्गदादि सात्त्विकाष्ट-भावें भगवत्प्रेमानंदमग्नतेनें साक्षात्कारें सकलमनोरथसिद्धमनोरथ होऊनि निजानंदपदीं पावावें ॥ ऐसा बहु बहुप्रकारें सज्जनसंप्रदायें शिक्षिला ॥ इत्यादि.

## कवि मोरोपंत

### आर्या, स्फुट

श्रीरामासि भजावें भक्तें म्यां जेंवि तेंवि संतातें ।
राजासि उपासावें तैसेंचि जनें प्रधान पंतातें ॥ १ ॥
रंगावें सद्वचनें मतिनें चूर्णे जसेंच हळदीनें ।
भजन न सोडावें म्यां जेंवि कधीं कर्षकें न हळ दीनें ॥ २ ॥
सद्व्यसनीं वेंचावें आयू न पुरेचि भरवसा याचा ।
झालों जीर्ण तरि मनीं आहे रसिकांत भर वसायाचा ॥ ३ ॥
हरिहरजनाश्रय बरा, होतें तदितरजनाश्रयें भंड ।
लागुनि असमर्थांच्या कांसेला वस्त्र पावतें दंड ॥ ४ ॥

कांपावें मन कुजनीं वृद्धपणीं कांपतें जसें शिर तें।
सत्संगींच शिरावें बाळ जनन्यंचळीं जसें शिरतें ॥ ५ ॥
सत्संगींच असावा प्रेमा ग्रीष्मीं जसा असे व्यजनीं।
रम्यहि अभक्त हो मज, मधुपा चंपक जसा असेव्य जनीं ॥ ६ ॥
वत्स जसा स्तन्यातें सादर पीतो धरोनि आम्यातें।
जें साधुमुखोद्गत यश तैसें प्यावें करोनि 'आ' म्यां तें ॥ ७ ॥
वरि संकोच असे परि आंत बहुत कृष्णकीर्तनीं प्रेम।
गुरुजनसमक्ष पतिचें घेतां आर्याऽग्रहें जसें नाम ॥ ८ ॥
प्रेमें नवींनवीं तीं माझ्या रसनेसि सुकविकुलगीतें।
गीतें यावीं, येती माहेरीं जेंवि बहुत मुलगीतें ॥ ९ ॥
ज्यांत न हरिहरजनयश ऐसें जें काय कीर्तनीं गान।
तें अल्वणभोजनसें नच सेवुत आर्त बाळसे कान ॥ १० ॥
कर्णयुगांत भरावें जें हरिहरजनयश प्रचुर म्यां तें।
जैसा दोंदीं कोंदी गुर्जरदेशस्थ विप्र चुरम्यातें ॥ ११ ॥
हा हो सुतृप्त राघवनामें, सारेंचि जेंवि तेंलिंगा।
शीला जपो, बहु जपति जैसें अय्याख्य साधु ते लिंगा ॥ १२ ॥
मतिची पडो हरिगुणीं, पतिकंठीं मिठि जशी सुदारांची।
नुच्चारू परमर्मा जीभ नकारा जशी उदारांची ॥ १३ ॥
हरिकीर्तनीं शिरावें धनिकगृहीं जपुन जेंवि चोरानें।
बहुकार्येंहि नुठावें बहुभारें जेंवि कुचर ढोरानें ॥ १४ ॥
म्यां कीर्तना टपावें, मार्जारें सर्वदा जसें दुग्धा।
मन्मति विनयादिगुणां वाहो प्रेमें नगा जशी मुग्धा ॥ १५ ॥
निजदेहगेहभान प्रभुभक्तांच्या कधींहि मेळांत।
मज कीर्तनीं नसावें जैसें शिरतां मुलांस खेळांत ॥ १६ ॥
भवगजभय शमवाया वृत्ती हरिकीर्तनींच राखावी।
पित्तनिवारक जैशी सुलभ बरी शुंठिशर्करा खावी ॥ १७ ॥
नारायणनामानें नच सोडावें कदापि हें वदन।
मेल्याही लोभ्याच्या चित्तें सोडूं नये जसें सदन ॥ १८ ॥

ज्याचे चित्तीं हरिहर तत्संगति दे सदा मला देवा।
दे त्वद्भजनीं बुद्धी आवड पुरवुनि तुझीच पदसेवा ॥ १९ ॥
हातीं न चित्तवित्तहि न घडे जपतपहि शुद्धि बुद्धि नसे।
परि हरिजन हो प्रभुच्या हृदयीं तुमच्याहि वत्सलत्व वसे ॥ २० ॥
संसार दो दिसांचा सत्संग धरी कुलीन तोचि तरे।
ध्यावें बरें म्हणोनी स्वपरमुखीं हें कुलीनतोचित रे ॥ २१ ॥

## आर्या नामाच्या

भागवताच्या सुहृदा नामा तूं हरिसि सर्व पापदर[१]।
यास्तव सदया वरदा म्यां दीनें पसरिला तुला पदर ॥ १ ॥
सर्वत्र स्नेह तुझा समसमयीं संकटीं पुढें होसी।
परम पदीं रंकासहि बसविसि देउनि सुलग्न[२] तूं जोशी ॥ २ ॥
तूं मात्र रामनामा कामा येशी, न पाहसी दोष।
दुसरे सखे सखेद त्यजिती, करिती नयच्युतीं[३] रोष ॥ ३ ॥
नामाया मातांनीं तान्हीं[४] थानींहि लाविलीं मरती।
त्वदपत्यें दुस्तरभवसिंधूंत जडासि तारिती तरती ॥ ४ ॥
एक अयोध्या नेली तरि मागें पुष्कळ प्रजा उरली।
तीची तव प्रसादें अमृतरसास्वादनस्पृहा पुरली ॥ ५ ॥
रामें तात त्यजिला लोकीं याहुनिहि कोण अत्याग[५]।
नामें त्वां तद्धर्माविन केलें न करितांचि तत्त्याग ॥ ६ ॥
श्रीरामें एक क्रतु[६] रक्षुनियां एक रक्षिला विप्र[७]।
नामा नेले नेशी अमित क्रतु सांग सिद्धिला क्षिप्र ॥ ७ ॥
जे शरणागत घालिति बा नामा त्वत्पदीं मिठी प्राज्य[८]।
कल्पशतींही न सरे ऐसें देशी तयांसि तूं राज्य ॥ ८ ॥
नामा सामात्यप्रभु गेला स्वपदांतरास ज्या काळीं।
दे अधिकार तुज निज प्रतिनिधिचा कीं सुखें प्रजा पाळीं ॥ ९ ॥

---

१ पापभय. २ सुमुहूर्त. ३ नीतिभ्रष्टीं. ४ बालकें. ५ मोठा अपराधी. ६ यज्ञ. ७ विश्वामित्र. ८ बहुत.

नामा या मार्गे तों त्वत्सम राजा न ऐकिला कोणी ।
देशी कर[1] प्रजांतें स्वपदहि त्या जाति सोडुनी क्षोणी ॥ १० ॥
नामा बा माहेरा न्याया आलासि काय तूं मूळ ।
न सुचेचि कामधाम प्रकट स्वांतासि[2] लाविलें खूळ[3] ॥ ११ ॥
स्वाश्रितकल्पित पुरवूं म्हणती तीं तों निलाजरीं झाडें[4] ।
पांगीं मुकीं म्हणोनिच बा सदया त्वां न मोडिलीं हाडें ॥ १२ ॥
तूं अमृतशालि नामा भगवज्जनवदनपद्म तें चाडें[5] ।
सुक्षेत्रीं भरिसि पिकें, तो भवदुद्यम अनंत दे भाडें ॥ १३ ॥
सर्वा मिष्टपदार्थांमध्यें तूं मधुर रामनाम-रसा ।
पामर सादर सेविति हरिहरही जेंवि भृंग तामरसा ॥ १४ ॥
दुष्ट कळी वांचुनि तूं आवडसी फार साधुचित्तास ।
तुज जपति परमहंसहि[6] नित्य जसे कृपणलोक वित्तास ॥ १५ ॥
नामा आम्हां तशि तव संगति अंधा जना जशी यष्टी ।
अवलंबिल्या न होऊं दे कठिणहि मार्गे चालतां कष्टी ॥ १६ ॥
यद्रसनाग्रीं नाचसि होउनि तूं सुप्रसन्न नटसा[7] रे ।
नाचों लागति त्याचे भवपाशविमुक्त पितर चट सारे ॥ १७ ॥
बहुगोड रसें बहु ये वीट म्हणुनि सेविती लवण-आलें ।
तूं न तसा नामरसा सेवुनि विषयाकडे कवण आलें ॥ १८ ॥
रसिकासि वेड लावायाची विद्या असे तुला पाठ ।
कीं ऐशा नामार्या गाय मयूरेश एकशेंआठ ॥ १९ ॥

## आर्या कंस-वधप्रकरणीं

दे दानपते[8] मज हें, कथितों तें त्वां अवश्य मानावें ।
आणावे नंदतनय, जे असती 'राम' 'कृष्ण' या नांवें ॥ १ ॥
बाळक ते शौरीचे[9], मित्रपणें निज गृहांत मंदानें ।
सुरनिर्मित मन्मृत्यू, वाढविले सुत म्हणोनि नंदानें ॥ २ ॥

---

१ आश्रय. २ मनास. ३ वेड. ४ कल्पतरु. ५ धान्य पेरण्याचें यंत्र. ६ संन्यासी. ७ नाच्या. ८ हे अक्रूरा! ९ वसुदेवाचे.

यत्नें मंत्र नुघडितां, धनुमखकौतुक-विलोकन-व्याजें[1] ।
घेउनि ये, हा रथ ने, तेंहि करीं तुज सुचेल भव्या जें ॥ ३ ॥
नगरीप्रति गोरसकर, द्याया सहगोपनंद आणावा ।
त्वद्वचनें तच्चित्तीं, बहु मत्स्नेह-प्रसाद बाणावा ॥ ४ ॥
बर्हप्रसूनपल्लवगुंजास्रग्धातुभूषणा[2] विभुला ।
भुलति तरुलता गोपी, किति देवींसहि न म्हणति देव भुला ॥ ५ ॥
तेजःपुंज श्रीमत्कुंजविहारी व्रजासि ये सांजें ।
तैं गोपी ओवाळुनि, सांडिति तनु तदनु हातिंचे सांजे[3] ॥ ६ ॥
वाटेंत उभी गोपी, जी जी घेउनि करांत आरतिला ।
नयनेंचि पी अनंता, सद्गुरु न म्हणेल कोण आर[4] तिला ॥ ७ ॥
सुटला दाव्यापासुनि, वत्स स्तन्यार्थ[5] जेंवि गाईला ।
धांवे अक्रूर तसा, भेटाया कडकडोनि आईला ॥ ८ ॥
यदुनाथातें गोष्ठीं, पाहे जैसा चकोर सोमासी[6] ।
त्याच्या प्रभुमूर्तिरतदृगुपमेसि[7] सितारता[8] गमो मासी ॥ ९ ॥
मोर तसा अक्रूर, श्रीपति घनसा, तया दयारसदा ।
धांवुनि वंदी; यांचा प्रेमा त्याचाहि परिस फार सदा ॥ १० ॥
ते प्रभु जाणति सर्वहि, परि सांगे अखिल वृत्त अक्रूर ।
होय सकपटीं सकपट, युक्त करी तो दयाळु, न क्रूर ॥ ११ ॥
वार्ताश्रवणें हांसति, होती उद्युक्त कंसघातातें ।
न करुनि रहस्य उघडें, कंसाज्ञा सांगती स्वताता तें ॥ १२ ॥
देशाधिपतिनियोगें, नेणारहि सकळ नंदतनयातें ।
ऐसें ऐकुनि गोपी, म्हणती करितो व्रजेश अनयातें ॥ १३ ॥
बाई न पारिजातावांचुनियां अन्य नंदनानंद[9] ।
योषानंदहि ज्याविण, नेतो कीं त्या स्वनंदना नंद ॥ १४ ॥

१ मिषानें. २ मोरपिसें, फुलें, पाला व गुंजा यांच्या माळा व धातूचीं भूषणें धारण करणाऱ्याला. ३ ओंवाळणें. ४ अजगर. ५ दुग्धार्थ. ६ चंद्रास. ७ प्रभुमूर्तिरत + दृग् + उपमेसि = प्रभुमूर्तीच्या ठिकाणीं रममाण झालेल्या दृष्टीच्या उपमेला. ८ शर्करेच्या ठिकाणीं निमग्न झालेली. ९ नंदनवनाचा आनंद.

यमदूतशतक्रूर, स्वमुखें 'अक्रूर' म्हणवितो मेला।
आला गांव वधाया, परि बाई हा न लेश कोमेला ॥ १५ ॥
मोडिति अक्रूरावरि, कंसावरि सत्यपतिवरिहि[1] बोटें;
पहिल्यासि वृथा निंदिति, दोघांतें तें न कविमतें खोटें ॥ १६ ॥
भवनें कारागारें, काय महाभार हार ते साप।
पति अतिखळ, विषतरुचीं फुलें मुलें गमति, पावल्या ताप ॥ १७ ॥
वदनीं गोविंद हरे, दामोदर रामकृष्ण हे वाणी।
चित्तांत चक्रपाणी, गोपींच्या लोचनद्वयीं पाणी ॥
ते रामकृष्ण जेव्हां, दानपतीनें[2] रथांत बसवीले।
गोपीजनींहि दैवें, सुमनोहर शोक मोह बसवीले ॥ १९ ॥
सुहृदाननें तयांतें, येईन मनीं सुखी असा ऐसें ॥
सांगे, गमे मयूरींप्रति मेघ दवाकुळीं वनीं जैसें ॥ २० ॥
बाह्यवनीं[3] मथुरेच्या, उतरे प्रभु जेथ तो पिता नंद ॥
दासांसि निरोपासह, दे होऊं अतिथि हाहि आनंद ॥ २१ ॥
यदुकुळ नृपधानीतें[4], प्रेक्षाया साप्त रामकृष्ण मग।
गेले अपराण्हीं जे, साधूंचे देवदेव जे वनग[5] ॥ २२ ॥
नगरींत ते पहाया, स्त्रीपुरुषांचें मिळोनि ये कटक[6]।
विधुसि चकोरचकोरी, प्रेक्षिति लावूनि तेंवि येक टक[7] ॥ २३ ॥
भव्यप्रभुमूर्तीतें, प्राशिति नयनींच ते जन अघासी।
दृष्टि न सोडिति रूपा, जडति जशा मक्षिका वनमधासी ॥ २४ ॥
नरपति कंस सकाळीं मंचीं बैसे धरोनिया असितें[8]।
जन सर्व आणवी करि आज्ञा मल्लांसि निजमुखें असितें[9] ॥ २५ ॥
मोठा धनुमखदुंदुभिरव ऐकुनि ये समस्त जन कानें।
आदरिली नंदानें आज्ञा, तैशीच विश्वजनकानें ॥ २६ ॥
गजवर रंगद्वारीं, होता जो ख्यात कुवलयापीड।
तदपसरणार्थ[10] हरिनें, उचलुनि निजबाहु सुवलयापीड[11] ॥ २७ ॥

१ ब्रह्मदेवावर. २ अक्रूरानें. ३ बागांत. ४ यादवांची राजधानी मथुरा. ५ वनचर.
६ समूह. ७ लक्ष. ८ खड्गातें. ९ काळ्या. १० त्याला दूर करण्यासाठीं. ११ कंकणभूषित.

नगरिपु[१] नगासि[२] वज्रें, तेंवि गजातें गजाचिया दंतें ।
ताडुनि अचळ करी तें, प्रभुचरितामृतचि सेविलें संतें ॥ २८ ॥
गडबडला कंस मनीं, मल्लगणहि पाहतांचि भावांतें ।
इतर सकळजन सादर, वर्णिति त्यांच्या श्रुतप्रभावांतें ॥ २९ ॥
बाहे चाणूर हरिसि, राजाज्ञेनें करावया युद्ध ।
कृष्ण म्हणे शिशु आम्ही, प्रौढ तुम्ही, कर्म हें नव्हे शुद्ध ॥ ३० ॥
बाळक तूं बळशाली; बळहि; बरें कर धरूनि पाहूं तें ।
तूं मी, बळ मुष्टिक, या खेळों, हूं ! थोपटा स्वबाहूंतें ॥ ३१ ॥
मोडुनि मुष्टिनिघातें, हाडें झाडें जशीं महावातें ।
मल्लशरीरें भूवरि पाडिति; विभु दाविति प्रभावातें ॥ ३२ ॥
वरकड मल्ल पळाले, प्रेक्षकजन सर्व पावले तोष; ।
करिति नियुद्ध सख्यांशीं, तें पाहुनि कंस बहु करी रोष ॥ ३३ ॥
ते प्रभु न रुचति कंसा, जैसा आसन्नमृत्युला[३] काढा ।
दुष्ट म्हणे शौरीचे येथुनि दुर्वृत्त पोर हे काढा ॥ ३४ ॥
देतां दोष गुरुजनां, कोपें जगदीश बहु मनीं कढला ।
अहिमथनार्थ गरुडसा, प्रभुच्या मंचीं उडोनियां चढला ॥ ३५ ॥
वाताश[४] जेंवि गरुडें, खळ केशीं खड्ग परजितां धरिला ।
मंचाखालीं लोटुनि, मारी टाकूनि वर उडी अरिला ॥ ३६ ॥
यद्यपि खळ कंस तरी चित्तीं चिंती सदैव जें रूप ।
त्रासें तन्मय[५] पाहे जग; मरतां तेंचि होय तो भूप ॥ ३७ ॥
नष्टासुदेह[६] ओढी, रंगी श्रीरंग फरफरा रागें ।
रामें वधिले कंकन्यग्रोधाद्यष्टबंधुला मागें ॥ ३८ ॥
मोदभरें[७] देवांनीं, वाजविलीं त्या जयीं नभीं वाद्यें ।
वरि पुष्पवृष्टि केल्या, वधितां तो दुष्ट कंस देवाद्यें[८] ॥ ३९ ॥
दे राज्य उग्रसेनाप्रति अतिसन्मान करुनि त्या वडिला ।
तोही स्वीकार करी, प्रभुच्या पुरवावयासि आवडिला ॥ ४० ॥

---

१ इंद्र. २ पर्वतास. ३ मरणोन्मुखास. ४ सर्प. ५ कृष्णमय. ६ गतप्राण. ७ आनंदभरें. ८ कृष्णानें.

# गोपीशोकसांत्वन

## आर्या

मोह व्रजवनितांचा, नाशाया आठवूनि तदुपकृती[1] ।
स्वज्ञानयोग द्याया, धाडी उद्धवकवीस यदुप[2] कृती ॥ १ ॥
भरवाया ज्ञानामृत, उद्धव गेला व्रजांत त्या नंद ।
पूजुनि फार रडे कीं, अंतरला मूर्तसुतमयानंद ॥ २ ॥
गहिंवरली नंदस्त्री, घटिकेंत पुसोनि नंदना[3] शतदा ।
तैसेंचि मनीं भावी, निजसदनाचाहि नंद नाश तदा ॥ ३ ॥
वर्णुनि चरितें, रडती, रडविति त्या उद्धवासही, दोघें ।
समजावी ज्ञानें परि, वाहे तत्प्रेमभक्तिच्या ओघें ॥ ४ ॥
तो नंदयशोदोद्धव, रात्रीला नेणतीच सरलीला ।
प्रभुच्या मनोहरा ज्या, नुरविति देहस्मृति-प्रसर[4] लीला ॥ ५ ॥
वाड्यापुढें सकाळीं, रथ देखुनि म्हणति गोपिका, गेला ।
घेऊनि जीव, कंसश्राद्धा नेणार मांस हा मेला ॥ ६ ॥
सुमनोहर हरिवेष, प्रभुचा प्रियभृत्य पाहतां महिला[5] ।
धाल्या; भ्याल्या होत्या मणिहारीं प्रथम कल्पुनी अहिला[6] ॥ ७ ॥
देउनि आसन गोपी, एकांतीं त्यास घेउनी बसती ।
म्हणती असेल तुमची, बहुधा मथुरापुरीमधें वसती ॥ ८ ॥
वाटे तुमचा कृष्ण, स्वामी तेणें तुम्हांस पाठविलें ।
वृंदावनांत बहुधा, या पितरांतें असेल आठविलें ॥ ९ ॥
यतिसहि दुस्त्यज मातृस्नेह जरी सर्वही मृषा[7] पाहे ।
प्रियपितरचि इतर तसा, जन त्याला कोण या व्रजीं आहे ! ॥ १० ॥
न टिके इतरत्र[8] स्थिर, मैत्री स्वार्थार्थ मात्र केवळ ती ।
नेल्यावरि सुमनाचा[9], रस तिकडे मधुप[10] काय ते वळती ॥ ११ ॥
मोकलिती निर्द्रव्या, वेश्या, अफळद्रुमासही पक्षी ।
अबला नृपा प्रजाही, मृगकुळ दग्धा वनाहि जें रक्षी ॥ १२ ॥

१ त्यांचे उपकार. २ कृष्ण. ३ पुत्राला. ४ व्यापार. ५ स्त्रिया. ६ सर्पाला. ७ खोटें. ८ अन्यत्र. ९ पुष्पांचा. १० भ्रमर.

भक्षुनि अन्न गृहातें, अतिथी कृतविद्य शिष्य गुरुराया ।
घेऊनि दक्षिणा यजमाना ऋत्विज न ते धरिति माया ॥ १३ ॥
गरज सरतांचि वैश्या त्यजिती, होती गळां प्रथम हार[1] ।
आपण होउनि तृप्त, त्यजिति अतृप्त स्त्रियांसही जार ॥ १४ ॥
वदति असें, बहु रडती, आठवुनी तद्विलास या महिला[2] ।
वर्षर्तुभ्रम देती, फार प्रेमाश्रुवृष्टिनें महिला[3] ॥ १५ ॥
तेथें तशांत आला, मधुप[4] तया एक गोपिका लक्षी ।
त्यासीं बोले ऐसें, कल्पुनि कीं कृष्णदूत तो पक्षी ॥ १६ ॥
वाणी ती गोपीची, बहुसरसा उद्धवासि उत्सव दे ।
निंदा स्तवाधिका करि हरिची, सप्रेम फार कुत्स[5] वदे ॥ १७ ॥
सुज्ञशिरोमणि उद्धव, बहु त्यांचें प्रेमभाग्य वाखाणी ।
त्यांसि म्हणे बाई हो, अमृताची प्रेमभाव ही खाणी ॥ १८ ॥
देहीं गेहीं झालें, चित्त उदासीन कृष्णगुण गातां ।
झालां कृतार्थ जन्मुनि, उरलें कर्तव्य काय हो आतां ॥ १९ ॥
वाचिक[6] तुमच्या दयिता कृष्णाचें सांगतों तुम्हां परिसा[7] ।
म्हणुनि असें ज्ञान कथी, घांशी सुविशुद्धकांचनीं परिसा[8] ॥ २० ॥
यदुनाथें[9] पाठविलें, ज्ञानामृत पाजिलें तथापि सती[10] ।
भगवदधररसतृषिता, नाहीं उपदेशिल्या तशा दिसती ॥ २१ ॥
नवपीयूषसमुद्रीं[11] पतन चकोरींस जरि घडे विधिनें[12] ।
तदपि अमृतकरचि[13] तयां, प्रिय सुख त्यां त्याचियाचि[14] संनिधिनें ॥ २२ ॥
मोठा शुद्धोद[15] असो, घनाविना चातकीस तो मरुची[16] ।
तैसें सगुणावांचुनि, निर्गुण गोपींस लेश दे न रुची ॥ २३ ॥
भर बहु सगुणचरित्रीं, गोपींचा नित्य तेंचि आठविती ।
पढवुनि भक्ति बहुदिवस, ठेउनि मग उद्धवासि पाठविती ॥ २४ ॥

१ हारवतप्रिय. २. स्त्रिया. ३ पृथ्वीला. ४ भ्रमर. ५ निंदागर्भ. ६ निरोप. ७ श्रवण करा. ८ परिसमण्याला. ९ कृष्णानें. १० गोपिका. ११ अमृतसमुद्रांत. १२ दैवयोगानें. १३ चंद्र. १४ चंद्राच्या. १५ तलाव. १६ मारवाड.

गवळ्याच्या शिष्यपणीं, सुरगुरुचा[1] शिष्य जाहला धन्य ।
अन्यस्पष्टचि, सगुणप्रेमावांचूनि पंडितमंन्य[2] ॥ २५ ॥
बल्लवनाथ[3] यशोदा, गोपी, गोपाळ, देति न निरोप ।
परि विनवुनि जाय कवि, प्रेमाचें लावुनी स्वमनिं रोप ॥ २६ ॥
वाट्यांत सायसाकर, भरुनि यशोदा म्हणे, अहो ! साधो ! ।
द्या दोघांला, झांका, न पराची दृष्टि भक्षितां बाधो ॥ २७ ॥
सुतनु म्हणति त्यासि असें, विनवा जोडोनि अंजलीला हो ।
वृंदावनांत अगतिकगति युष्मत्पादकंजलीला हो ॥ २८ ॥
देहांतरींहि दास्यचि, द्या ऐसा ज्ञानयोग न वदान्या[4] ।
सांगा हेंचि ज्ञान; उपायन त्याला अयुक्त न वदा न्या ॥ २९ ॥
वाहोनि रज व्रजजनचरणांचें उद्धव प्रसन्नमनें ।
जाउनि उपायनार्पण करुनि हरिसि करि पुनःपुन्हा नमनें ॥ ३० ॥

## गोपीप्रेमोद्गार-आर्या

उद्धवजी विरहदवीं,[5] पावतसे हानि रोप[6] हा काय ।
सांगसि पळांत शतदा, म्हणवाया 'हा'[7] निरोप हा काय ! ॥ १ ॥
श्रितसर्वेच्छित फलदा, नंदसुताचीच होय जिभलता[8] ।
ऐसें समजुनि, गोपी ठकलों, कीं दे पदार्थ जी भलता ॥ २ ॥
नेउनि परीस करिंचा, किमयेच्या साधनासि शिकवीशी ।
तैसें नेउनि कृष्णा, ब्रह्मज्ञानें अम्हांसि ठकवीशी ॥ ३ ॥
जो क्षीरार्थी जन त्या, क्षीर म्हणुनि काय नीर अर्पावें ।
हा योग तेवि वंचन, या योगेंकरुनि ज्यांसि तर्पावें ॥ ४ ॥
शठवदनातें लागुनि, बोलुनि बहुगोड गोपिका फटवी ।
त्यजिली मुरलि विराजे न, वसंतें जेंवि सोडिली अटवी[9] ॥ ५ ॥
कुब्जेच्या भाग्याचा भारी भर, आजि आमुचा सरला ।
सरला असोनि आम्ही वक्रा, वक्रा असोनि ते सरला ॥ ६ ॥

१ बृहस्पताचा शिष्य उद्धव. २ व्यर्थ पांडित्य करणारा. ३ नंद. ४ दात्याला.
५ विरहाग्नींत. ६ रोपटा. ७ हायहाय. ८ जिव्हारूप वल्ली. ९ अरण्य.

उद्धवजी केली कीं, ती कुब्जा पूर्णकामना सजुनी[१] ?।
त्यजुनि नवी, रसिकाच्या मैत्री येईल का मनास जुनी ? ॥ ७ ॥
जेणें माय त्यजिली, दे बहु लालन करूनि उद्धव[२] जी।
त्या आम्ही कोण ? वृथा रुसतों, मुग्धा[३] म्हणोनि उद्धवजी ॥ ८ ॥

### आर्या मंत्ररामायणांतील

राजा[४] पुत्रचतुष्टयलाभें अनुरूप तद्वधूलाभें[५]।
मत्सम सुखी न कोणी लोक, म्हणे मृत्युचेंहि न मला भें[६] ॥ १ ॥
जनहृत्पद्मीं पावे सुख वृद्धातें तसेंतसें फार।
यशही वाढे सद्मीं, रघुवीर[७] जसाजसा महोदार ॥ २ ॥
जगतीहृत्तापातें, हळूहळू कीर्तिभाधिपें[८] विझवी।
यत्नेंकरूनि सज्जनचित्तातें सच्चरित्र तो रिझवी ॥ ३ ॥
राज्यसुखाहुनि दशरथ, पुत्रसुखें हृष्टपुष्ट झाला जे।
मर्त्येतर तत्पतिही, कश्यपही त्यासि सुप्रजा[९] लाजे ॥ ४ ॥
स्वश्री ज्येष्ठसुतातें, द्यावी हें मानसांत नृप आणी।
दिधलें वसिष्ठमुनिनें, अनुमोदन ऐकतां अशी वाणी ॥ ५ ॥
सारासारविचारप्रवीण मुख्य प्रधान जे होते।
पुसतां हें नृपतीतें, म्हणती लोकेष्ट सर्वही हो ते ॥ ६ ॥
क्ष्मामरवसिष्ठ[१०] पाहे, हर्षातें आंवरूनि योगातें[११]।
अभिषेकाचें करवी साहित्य करोनियां नियोगातें[१२] ॥ ७ ॥
अजसुतचिकीर्षितातें[१३], जाणुनियां शीघ्र मंथरा दासी।
कैकेयीला सांगे, तों ते पावे महाविषादासी ॥ ८ ॥
स्वीयसुतातें राज्यप्राप्ति असावी म्हणूनि मानवती[१४]।
रामाभिषेकसमयीं विघ्न करी, त्यासि देव मानवती[१५] ॥ ९ ॥
त्या राजेंद्रें केले, जाउनि सामाद्युपाय जे असती[१६],।
परि समजेना, जडली तीस पिशाचीच मंथरा असती[१७] ॥ १० ।

१ नीट करून. २ आनंद. ३ वेड्या. ४ दशरथ. ५ सुना. ६ भय. ७ रामचंद्र. ८ कीर्तिचंद्रानें. ९ सुप्रज जो दशरथ त्यास. १० भूदेव ब्राह्मण वसिष्ठ. ११ मुहूर्तातें. १२ आज्ञेतें. १३ दशरथमनोगतातें. १४ रुसून बसणारी. १५ मान्य होतो. १६ आहेत. १७ दुष्टा.

दे मत्सुतासि पृथ्वी, अटवी[1] रामासि हें वदोन, वर[2] ।
सत्यप्रतिज्ञ मूर्छित, केला मागोनि हेच दोन वर ॥ ११ ॥
निजसुतवियोगविव्हळ, सत्यच्युतिभीत तो असा विनवी ।
कैकेयि तुझे ठायीं, निर्दयता हे अशी नसावि नवी ॥ १२ ॥
वय माझें बहु गेलें, पुत्रोत्पत्त्यर्थ यत्न बहु केला ।
त्यासीं वियोग करितां, न कशी धरिशी मदंतशंकेला? ॥ १३ ॥
तुज राज्य सर्व दिधलें, आणिकही माग जें अभीष्ट तुला ।
गुणवदपत्यवियोगक्लेशासि जगत्त्रयीं नसेचि तुला[3] ॥ १४ ॥
काय तुझा रामानें, केला अपराध सांग गे प्रमदे ।
कां माझ्या बाळावरि, करिशी हा कोप सांग गे श्रमदे ॥ १५ ॥
हा राज्ञि! पुत्र माझा सुकुमार कुमार बहु विनीत कृती[4] ।
त्वत्पदलीन तरीही, याविषयीं कां तुझी अशी प्रकृती? ॥ १६ ॥
कां मति धरिली नंदन-वियोगवन्हींत कांत[5] होमाया? ।
कां मज वृद्धावरिली, कैकेयी त्यागिली अहो माया? ॥ १७ ॥
हे श्रीपतिप्रसादें, वृद्धपणीं पुत्र जाहले चार ।
हें जाणुनि हे वर्तसि, झाला तुज काय भूतसंचार? ॥ १८ ॥
त्या रायें कैकेयीगुणेंकरुनियां तदा विलापातें ।
स्त्रीतें पुत्रवियोगें, होणार प्रांत दाविला पातें ॥ १९ ॥
ते मध्यममातेच्या गृहासि जाऊनि जों पहातात ।
राघवलक्ष्मण मूर्छित जनक विलोकूनि ह्मणति 'हा तात' ॥ २० ॥
तें जननीला पुसतां, मूर्छेचें कारण स्वयें राम ।
पूर्वकथा सांगुन, ते प्रकट करी आपुला मनःकाम ॥ २१ ॥
आयकतां राम ह्मणे माते देवारिचा[6] रिपु[6] त्रास ।
सत्यविनाशापासुनि, कां धरितो निर्मुनीहि पुत्रास ॥ २२ ॥
हा राज्यभार सारा भरतें घ्यावा शिरीं जरी श्रमही ।
पितृसत्यत्राणास्तव, म्यां सेवावी सुखें अरण्यमही ॥ २३ ॥

---

१ अरण्य. २ भर्ता. ३ साम्य. ४ कुशल. ५ पति. ६ देवांच्या शत्रूचा शत्रु, दशरथ.

स्वमत प्रगट करुनियां, रघुपति तीतें करूनियां नमन।
गमन करी धैर्यार्णव, ज्याचें तिळमात्र भंगलें न मन॥ २४॥
निजमातेला सांगे, राघव भरतप्रसू[१]-चरित्रास।
तें ऐकतां धरी ते, पतिसुतदुःखें मनीं परित्रास॥ २५॥
भय शोकासह हृदयीं, रामासि धरूनि माय फार रडे।
बाष्पोदकें सचैल, स्नपन[२] तदा त्या रघूत्तमासि घडे॥ २६॥
मजही समागमें ने, तुजवांचुन ही पुरी मला कारा[३]।
ऐसें वदोनि हृदयीं घट्ट धरी त्या सुनिर्मलाकारा[४]॥ २७॥
शय[५] जोडुनि राम ह्मणे, जननि! उपेक्षूं नको पिता माजा।
कैकेयीशब्दशरक्षत मद्विश्लेषविकळ हा राजा॥ २८॥
हा राज्ञी सुतशब्द, श्रवण करुनि होय ते विगतहारा[६]।
हा राम ह्मणूनि करी, उरीं प्रहारासि वर्जिताहारा[७]॥ २९॥
नमन करुनियां निघतां, न शके माता सुतास वरजाया[८]।
जायाहि निघे त्याची, लक्ष्मणही सिद्ध जाहला जाया॥ ३०॥
ते श्री काय पुरीची, सीताव्याजें रघूत्तमासहित।
जाणोनियां निघाली; निर्वारितांही, प्रियोत्तमास हित॥ ३१॥
हें रायासि कथाया कैकेयीच्या स्वकीय गेहातें।
जाउनि सुमंत्र वाक्यें कळवि नमुनि तातपदयुगें[९] हातें॥ ३२॥
सुमति सुमंत्रहि विनवी, कैकेयीतें अनेक वचनांहीं।
परि तद्दुरुक्तिबाणें न फुटे ऐसें जनीं कवच[१०] नाहीं॥ ३३॥
तुज वनवास बरा कीं ताताला नरकवास हें अदया।
निर्लज्जा कैकेयी रामासि पुसे महाद्दृषद्धृदया[११]॥ ३४॥
राय असें आयकतां, 'हाय' म्हणे बायको न हे, कृत्या[१२]।
काय करूं जाय वना, बा यश जोडीं करूनि सत्कृत्या॥ ३५॥
तों राक्षसी तशी ते, रामातें वल्कलें ह्मणे धरणें।
चवदा वर्षें विपिनीं, राहोनि स्वात्मतात उद्धरणें॥ ३६॥

१ कैकेयी. २ स्नान. ३ बंदिशाळा. ४ रामास. ५ कर. ६ त्यक्तभूषणा. ७ त्यक्तभोजना. ८ टाकाया. ९ दशरथाचीं पावलें. १० चिलखत. ११ पाषाणहृदया. १२ राक्षसी.

श्रम न गणुनि अनुजासह, रामें केलें तिच्या मनासारें[1] ।
वल्कें धरितां भिजली, पुरभू जननेत्रजीवनासारें[2] ॥ ३७ ॥
गजगति सुकुमार अशीं, तिघें निघालीं वनासि पद्चारें ।
स्वरथ दशरथ प्रेषी सुमंत्रमंत्रिप्रयुक्त सुविचारें ॥ ३८ ॥
तोयजपत्राक्षातें[3] तो यजमानाचिया निदेशाला[4] ।
कथुनि प्रार्थुनि यानीं[5], स्थापुनियां ने तदिष्ट देशाला ॥ ३९ ॥
भिजविति सज्जन पौर, क्षोणीला बाप्पजीवनासारें[6] ।
जाती रामासह ते, पुर भासे त्यांसि पितृवनासारें[7] ॥ ४० ॥
पाय धरुनियां म्हणती, रामा आम्ही तुझेचि सांगाती ।
रडती पडती, पढती स्तोत्रें, त्याच्याचि कीर्तिला गाती ॥ ४१ ॥
पौराग्रहासि जाणुनि, निजल्या स्थानीं करूनियां मंत्र[8] ।
आमंत्रण न करुनियां, वंचुनि निशि जाय राम ससुमंत्र ॥ ४२ ॥

## धेनुहरणाच्या आर्या

### आदिपर्व, अध्याय १७४

पार्थ म्हणे, तो कोण ब्रह्मर्षि असे ? मनोरमाहि कथा यां सांगा
तद्यश नसे परिसिलें, सांग सख्या तूं तदीय माहात्म्यातें ॥ १ ॥
गंधर्व म्हणे, होता कुशिकतनुज गाधि कान्यकुब्जपती ।
तत्सुत विश्वामित्र, प्रभु यत्सेवेसि नृप सदा जपती ॥ २ ॥
सबळ सचिव तो भूपति, मृगया करितां वनीं बहु श्रमला ।
दैवें वसिष्ठमुनिचें पुण्याश्रमपद विलोकितां रमला ॥ ३ ॥
स्वपदनतगाधिजातें, सत्कारुनि मुनि म्हणे अगा राया ।
जावें न क्षुधितें त्वां, येउनियां आमुच्या अगारा[9] या ॥ ४ ॥
वाल्मीकिच्या जन जसा, तृप्तिस पावे कुळासकट कवनीं[10] ।
मुनिच्या उटजीं[11] तैसा, तो गाधिज भूपही सकटक[12] वनीं ॥ ५ ॥

---

१ मनाजोगें. २ लोकांच्या डोळ्यांतील अश्रुवृष्टीनें. ३ कमलनेत्र रामाला. ४ आज्ञेला. ५ रथांत. ६ अश्रुजलवृष्टीनें. ७ श्मशानतुल्य. ८ मसलत. ९ आश्रमास. १० रामायणीं. ११ पर्णकुटिकेंत. १२ ससैन्य.

नृपति म्हणे कोटुनि हें, आलें साहित्य जेवणा रानीं ।
अस्मद्गृहींहि न कधीं वरिली ही तृप्ति जेवणारांनीं ॥ ६ ॥
जें न नृपप्रासादें तें मुनिच्या भुक्तिसुख दिलें उटजें[1] ।
हें मोठें नवल, अहो लाजविला पारिजात कीं कुटजें[2] ॥ ७ ॥
वल्कलरुद्राक्षधर, ब्राह्मण अकृतान्ययत्न हा रानीं ।
बळ पूजिलें कसें हो, बहुमूल्य दुकूलरत्नहारांनीं ॥ ८ ॥
करितां शोध कळे कीं, उटजीं सुरधेनुनंदिनी[3] आहे ।
पाहे तीस नृप म्हणे, मग मुनिला गाय मागतों द्या हे ॥ ९ ॥
अर्बुद गाई देतों, अथवा देतों स्वराज्य भोगाया ।
दे गाय, काय विनिमय[4], हा भवदर्थोंन ? मान्य हो गा या ॥ १० ॥
मुनिवर म्हणे, नृपा हें वचन तुझें मन्मनासि कंपा दे ।
या धेनुबळें माझा हा आश्रमधर्म सांग संपादे ॥ ११ ॥
कोण ज्ञाता राज्यस्वीकार करील आधि[5] ज्यामाजी ।
मागों नको, न देया हेया[6] हे धेनु गाधिजा माजी ॥ १२ ॥
विश्वामित्र म्हणे मी क्षत्रिय आधार जाण तेजाचा ।
आज्ञामानसभंग न करिती भद्रेच्छु जाणते ज्याचा ॥ १३ ॥
स्वाध्याय[7] तुझें बळ, तूं ब्राह्मण, कैचें असह्य तेज तुला ।
पिप्पलजत्व[8] सम असो दहनीं[9] तेजस्विता न ते जतुला[10] ॥ १४ ॥
मानधन प्रभु मी जें वदलों कर्तव्य तें करीन खरें ।
ऐसा कोण प्राणी, ज्यातें न करील वश हरी[11] नखरें[12] ॥ १५ ॥
भगवान्[13] वदे बळी तूं, तुझिया चतुरंगसैन्य सांगातें ।
तुज कर्तव्य असे जें सिद्ध न करिशी अभीष्ट कां गा तें ॥ १६ ॥
कौशिक अनुगांसि म्हणे सोडा हो धेनुला चला हाका ।
हा काय रत्नभोक्ता मारू अनुताप पावुनी हाका ॥ १७ ॥

---

१ पर्णशालेनें. २ कुड्याच्या झाडानें. ३ कामधेनु. ४ मोबदला. ५ दुःख. ६ टाकाया-जोगी. ७ वेद. ८ पिंपळापासून होणें. ९ अग्नीमध्यें. १० लाखेला. ११ सिंह. १२ नखानें. १३ वसिष्ठ.

दंडें ताडुनि नेतां, फोडी ती धेनु फार हंबरडे।
तेव्हां आश्रमवासी द्विज-मृग-खग-देवता-कदंब[1] रडे ॥ १८ ॥
नेतां बळेंचि धांवत येउनि ती मुनिपुढें उभी राहे।
आणूनि लोचनीं जळ बहुदीनत्वें मुखाकडे पाहे ॥ १९ ॥
धेनु म्हणे स्वामी त्वां पालन केलें करी न बाप तसें।
कां मज उपेक्षिलें हो मी खळदंडें उदंड तापतसें ॥ २० ॥
साधु म्हणे मज हृदयीं शत तुज बाहेर हे कशा[2] लागे।
मी ब्राह्मण क्षमावान्, माते रडतीस तूं कशाला गे ॥ २१ ॥
क्षत्रियतेज असें हें जें तुजला पीडितें कशापातें[3]।
मत्तेज-क्षांति[4] मला म्हणति अहाहा न[5] ओक[5] शापातें ॥ २२ ॥
मन्मति-दरींत[6] न शिरे कोपमतंगज[7] विवेकहरि[8] जागे[9]।
म्यां न त्यजितां नेतो भूप बळें तुज रुचेल तरि जा गे ॥ २३ ॥
गाय म्हणे भगवंता आज्ञा नसतां तुझी न मद्धरणीं[10]।
काळहि बळी किती हा न तृणबळें वन्हि होय बद्ध रणीं ॥ २४ ॥
विप्र म्हणे नेला कीं दृढबद्ध करूनि वत्स दाव्यानें।
स्वबळें नृपें मदाश्रम, देह जसा व्यापिला सदा व्यानें[11] ॥ २५ ॥
शक्य असेल तरि रहा ऐसें मुनि बोलतांचि ती क्षोभे।
ग्रीष्मगमध्यान्हार्कप्रतिम तिचा देह तेधवां शोभे ॥ २६ ॥
धेनुमिषें त्या मुनिची सुतपस्यासिद्धि कोपली वाटे।
फाटे गाधिजबळतम त्या चपळेच्या[12] धरूनियां वाटे ॥ २७ ॥
अंगापासुनि केले प्रकट तिणें म्लेंछ यवन शबर शक।
बळ उडविलें तिहीं खगपतिपक्षांहीं जसे सहज मशक ॥ २८ ॥
जेंवि दिगंताप्रति ने तिमिरा तूळा रविप्रभा वात्या[13]।
सेना तशी नृपबळा, निस्तुळ म्हणती कवि प्रभावा त्या ॥ २९ ॥

---

१ समूह. २ चाबूक. ३ चाबुकांनीं. ४ क्षमा. ५ बाहेर काढूं नको. ६ गुहेंत. ७ कोपरूप गज. ८ विचाररूप सिंह. ९ जागृत आहे. १० माझ्या हरणाविषयीं. ११ व्यान नांवाच्या वायूनें. १२ विजेच्या. १३ वातसमूह.

दशशतसहस्र पीडिति एकैका गाधिजानुजा यवन।
गाय[1] वन स्वर्गेहि, तें दावि पितां आपणांत गाय वन[2] ॥ ३० ॥
पकडो लियो हकालो बे बिसवामितर भाग जावेगा।
यवन ह्मणति दाविति त्या शब्दीं हरि करिवरांसि ज्या वेगा ॥ ३१ ॥
मागें पाहों न दिलें, तीं बारा कोस पळविलीं कटकें[3]।
यश हारविलें तेथें, किति शस्त्रें हार कुंडलें कटकें[4] ॥ ३२ ॥
भूप म्हणे जे नेणति गोब्राह्मणतेज, ते जन क्षत्रीं।
कलिपति जसे न पाहुनि शिशुशशभृत्तेज[5] तेज नक्षत्रीं ॥ ३३ ॥
धिक् क्षत्रियतेजातें सार[6] नसे स्पष्ट या पलालसमीं[7]।
येणेंचि जाहलों हतकाम[8] पराभूत पापलालस[9] मी ॥ ३४ ॥
क्षत्रबळ नाव फुटकी, जें ब्राह्मणतेज तेचि नवनौका[10]।
बुडतों न अन्यथा मी, तरता व्यसनांत तोहि न वनौका ॥ ३५ ॥
प्राज्यहि[11] राज्य हित नव्हे, तप साधावें तयांत सर्व हितें।
तप न करावें कोणा प्रभुनें विनिमग्न ज्यांत शर्वहि[12] तें ॥ ३६ ॥
निश्चय करूनि राज्यश्री सोडुनि सर्व ताप साहूनी।
होमुनि तपोनळीं वपु होय अधिक-सर्वतापसांहूनी[13] ॥ ३७ ॥
झाला नृपति वसिष्ठस्पर्धेनें विप्र, तें असो आतां।
विस्तर भय दे, नाहीं तरि काळाचेंहि भय नसे गातां ॥ ३८ ॥

## रुक्मिणीहरणाच्या आर्या

### कृष्णविजय, अध्याय ८३

प्रथम म्हणे वैदर्भी[14], बाई[15] होत्यें लहान मी कन्या।
धन्या कृष्णकथा मज, तेव्हांचि रुचे, न आवडे अन्या ॥ १ ॥
ज्या दिवशीं हरिचरितश्रवण नसे त्यांत मज दहा दुखणीं।
दुखणी काय? नवखणी माडी नलगे, धरा नखेंदु[16] खणी[17] ॥ २ ॥

---

१ वर्णी. २ उदक. ३ सैन्यें. ४ कडीं. ५ बालचंद्राचें तेज. ६ बळ. ७ कोंड्यासारख्या. ८ नष्टमनोरथ. ९ पातकेच्छु. १० नवी नाव. ११ मोठें. १२ महादेवही. १३ अरण्यवासी जनांहून. १४ रुक्मिणी. १५ हे द्रौपदीबाई. १६ नखचंद्र. १७ उकरी.

श्रीकृष्णाला द्यावी, श्रीरामा जानकी तशी दुहिता ।
ऐशी गुरुबुद्धींनीं, केली बाई विचारणा सुहिता ॥ ३ ॥
रुक्मी माझा दादा, जो आम्हां साजणांमधें मोटा ।
खोटा नव्हेचि, परि हरिचरितरसीं तो भिजे न मणिगोटा ॥ ४ ॥
त्या स्वगुरुविचारातें, निंदुनियां मोहरोगवैद्यातें[1] ।
मजला देऊं केलें, दादानें हठ धरूनि चैद्यातें[2] ॥ ५ ॥
केला लग्नाचाही निश्चय, चैद्यासि धाडिलें मूळ ।
गूळ क्ष्वेडचि[3] वाटे, मज तातविचार होय पांगूळ[4] ॥ ६ ॥
एक ब्राह्मण केवळ, साधु दयामूर्ति तत्पदीं नमनें ।
केलीं पाय धरुनि म्यां, एकांतीं विनविला सुदीनमनें[5] ॥ ७ ॥
कां तो द्रवता माझा, असता जरि भाव पाहिला खोटा ।
जेणें अभयवर दिला, त्या गुरुहस्तांत म्यांहि लाखोटा ॥ ८ ॥
स्वकरें वसंततिलकावृत्तें[6] पत्रांत सात मोजूनी ।
लिहिलीं होतीं तींही लिहितां लिहितां क्षणांत योजूनी ॥ ९ ॥
गेला धांवत घेउनि मत्पत्र द्वारकेसि सद्विप्र ।
त्या[7] प्रणतवत्सलाला आणाया आण घालुनि क्षिप्र[8] ॥ १० ॥
तों आला शाल्वमगधपतिसख तो चैद्य मांडलें लग्न ।
जालें पुर तद्बळजळनिधींत[9] आधींत[10] मन्मनहि मग्न ॥ ११ ॥
तांतडि बहु दादाची, कैंचा अवकाश? लागली हळद ।
खळदर्पघ्न[11] दिसेना, जो नतचातक-दयासुधा-जळद[12] ॥ १२ ॥
चिंताज्वरांत रात्रौ, माझा नाहींच लागला डोळा ।
जायासाठीं कंठीं, शतवार प्राण जाहले गोळा ॥ १३ ॥
तोंचि समूळाधिज्वरहर[13] मात्रा आणुनी उषःकाळीं ।
आला द्विज धन्वंतरि[14], सदय पिताही तसा नसे बाळीं ॥ १४ ॥

---

१ कृष्णातें. २ शिशुपालातें. ३ विष. ४ पंगु. ५ दीनपणानें. ६ वृत्ताचें नांव. ७ कृष्णाला. ८ लौकर. ९ सेनासमुद्रांत. १० दुःखांत. ११ कृष्ण. १२ मेघ. १३ दुःखनाशक. १४ वैद्य.

आधीं विप्रमुखश्री, कळवी येतांचि माधवागमन ।
मग मुनि सांगे मज तो, ऊठ म्हणे गुरुपदास[1] लाग मन ॥ १५ ॥
विप्रें कथिलें मज कीं, वत्से त्वल्लिखित उत्तम श्लोक ।
ज्यांच्या अर्थश्रवणें, आला धांवोनि उत्तमश्लोक[2] ॥ १६ ॥
अंबेच्या नमनाला, न्यावी जीचा विवाह नवरी ती ।
घरि हरिशंका दादा, देवीयात्रा कुळीं न नवरीती[3] ॥ १७ ॥
मग बाई दादाचे, मागधशाल्वादिकांहि मेल्यांचे ।
सैनिक मज रक्षाया आले, धाकें विरोनि गेल्यांचे ॥ १८ ॥
पूजुनि पाय विनविली, कन्यांतें प्रसवतात ज्या माता ।
त्या लटिक्या, तूंचि खरी, तुज कृष्णाचि योग्य होय जामाता ॥ १९ ॥
देवीप्रासादांतुनि[4], निघतां द्याया करास आलीला[5] ।
आलीला[6] धरुनि करीं, दाखविली त्या गतींत आलीला[7] ॥ २० ॥
त्या मेल्यांस कशाला पाहूं मी ? प्रियतमास[8] अवलोकीं ।
कीं, आला कीं नाहीं; होय तडित्स्फुरण काय तंव लोकीं ॥ २१ ॥
पत्रीं लिहिलें होतें, देवीयात्रेंत मज पदें दावा ।
दावा[9] बहुतांशीं हा, भाव कळों दुर्जनासि नेदावा[10] ॥ २२ ॥
नयनांवरि येति सये, नलिनांवरि[11] भृंग[12]-बालसे वाल[13] ।
त्यांसि म्हणें साधु तसे, पूजिन जरि काय गाल सेवाल ॥ २३ ॥
प्रभुसि पहाया पूर्वीपासुनि मन्नेत्रपद्म बहु लोल[14] ।
तो लग्नसमय, ते उपवासहि, लावील कोण सखि बोल ॥ २४ ॥
माझा मूर्त मनोरथ, तो रथ आला प्रियास घेऊन ।
दर्शन नयनें घेती, जैसें शिशिरीं[15] दरिद्र घे ऊन[16] ॥ २५ ॥
माळा उंचलितां प्रिय, आपणहि रथावरूनियां लवला ।
लव[17] लागेना तों घे अंकीं, करुणासमुद्र काल्वला ॥ २६ ॥

---

१ ब्राह्मणपायास. २ कृष्ण. ३ नवीन रीत. ४ देवीच्या देवळांतून. ५ येणाऱ्या. ६ सखीला. ७ थोडी लीला. ८ कृष्णास. ९ द्वेष. १० न द्यावा. ११ कमळांवर. १२ भ्रमर. १३ केश. १४ उत्सुक. १५ हिंवाळ्यांत. १६ ताप. १७ क्षण.

हरिनील[1]-निभवरांकीं, वसलें न श्री घनीं तसी चपळे[2] ।
गेला घेउनि हरि[3] निजभाग सुखें त्यासि म्हणति नीच[4] 'पळे' ॥२७॥
हंसें मुक्ता[5] नेली, मग केला कलकलाट काकांनीं[6] ।
हाकांनीं नभ[7] भरिलें, जाय सुरांच्याहि नाद हा कानीं ॥ २८ ॥
पुष्कळ खळ[8] बळ[9] घेउनि हरिवरि आले नृपाळ ते कुतरे ।
उतरे एकहि न कशीं,[10] कनकासीं[11] कोटि भांडतां धुतरे[12] ॥ २९ ॥
मग आला गे बाई दादा मज सोडवावया कोपें ।
तो पेंव[13] वृश्चिकांचें[14] लोकां परि या खगध्वजा[15] सोपें ॥ ३० ॥
समनोरथरथशस्त्र प्रभुनें केला पळांत तो भग्न ।
नग्न स्वखड्गहि वधा, तों मन्मन होय शोकविनिमग्न ॥ ३१ ॥
अभयप्रदपदपद्मीं म्यां तेव्हां घातली मिठी घट्ट ।
धट्ट क्षणभरि झालें, केली स्वाभाविकत्रपा गट्ट ॥ ३२ ॥
केला न वध, तदधिका श्यालाची दुर्दशा सये केली ।
केली हरि जरि करि, तरि करिमदशोभा दिगंतरा गेली ॥ ३३ ॥
द्रौपदि अशी कथा हे, लग्नाची फार मी वदों काय ? ।
पाय प्रभुचे संतत पूजावे, तरिच सफळ हा काय ॥ ३४ ॥

## कर्णपर्वांतील दुःशासनवधाच्या आर्या

### कर्णपर्व, अध्याय ४५

धांवति अन्योन्यावरि[16], ते दोघे आठवूनि अपकार[17] ।
जाणों ते मदमत्त, क्रोधोद्धत दंपतीच[18] अपकार[18] ॥ १ ॥
दुःशासनशर मर्मीं, लागे नागेशसा[19] असुख[20] रचिता[20] ।
मूर्छित करि भीमातें, इतरांचे तो पळें असु[21] खरचिता ॥ २ ॥
सावध होउनि भीम, क्षिप्र महाशक्ति शत्रुवरि सोडी ।
तीसहि तो दुःशासन, दशबाणांहीं पराक्रमें तोडी ॥ ३ ॥

---

१ नीळमणी. २ विजेस. ३ सिंह. ४ हलके पुरुष. ५ मोतीं. ६ कावळ्यांनीं. ७ आकाश. ८ दुष्ट. ९ सैन्य. १० कसोटीस. ११ सोन्याशीं. १२ धोत्र्याचीं झाडें. १३ खाण. १४ विंचवांचें. १५ कृष्णाला. १६ भीम दुःशासन एकमेकांवर. १७ अपराध. १८ पकार-रहित दंपती म्हणजे दंती, हत्ती इत्यर्थः. १९ सर्पराजसा. २० दुःखदाता. २१ प्राण.

तेव्हां गदाप्रहारें, भीम ललाटीं स्वशत्रुला ताडी ।
क्षितिवरि हरिवज्राहत, गिरिशिखर जसें तसें तया पाडी ॥ ४ ॥
पत्नीचा[1] केशग्रहसमय[2] स्मरला निज प्रतिज्ञा ते ।
आठवि, म्हणे म्हणोत न, मिथ्यावादी मजप्रति ज्ञाते ॥ ५ ॥
वृषनृपकृपकृतवर्मद्रोणसुतांतें म्हणे अहो परिसा ।
दुःशासनास वधितों, मी भीम, गजासि घोपला[3] हरिसा[4] ॥ ६ ॥
शक्ति असेल तरि तुम्ही, रक्षा, मी आपुली प्रतिज्ञा ती ।
संरक्षितों, कराया स्वर्गीं संतृप्त संप्रति ज्ञाती[5] ॥ ७ ॥
ऐसें गर्जोनि उडी, टाकी स्वरथावरूनि कलितासी[6] ।
तो भीम भीमकर्मा, गांठी त्या रिपुसि भूमिगलितासी ॥ ८ ॥
गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरोनि पन्नगा[7] झडपी ।
तैसा भीम बळानें, दुःशासनकंठ अंघ्रिनें[8] दडपी ॥ ९ ॥
भीम विदारी खड्गें, सहज परम कठिण शत्रुचें उर तें ।
वाटे पविपातींही[9], त्या साध्वीला[10] न गांजितां उरतें[11] ॥ १० ॥
अशनिहत[12]-शिळातळजळ, रक्त तसें खड्गभग्न तें उर वी[13] ।
तृषित घटोत्कचतात, प्राशी शोणित न लेशही उरवी ॥ ११ ॥
मग कंठनाळ चरचर, तो सत्य करावया बिरुद[14] कापी ।
देउनि मिटक्या मटमट, घटघट त्या स्वाहितासृगुदका[15] पी ॥ १२ ॥
जे जे लोकीं असती, रस त्यांची ती न माधुरी[16] थोडी ।
परि अरिच्या रक्तरसीं, मज बहु त्यांहूनि लागली गोडी ॥ १३ ॥
ऐसें वदोनि ओष्ठप्रांत[17], जिभेनें पुनःपुन्हा चाटी ।
अवलंबी[18] अत्युग्रा, भीम अतृप्त द्विपारिची[19] धाटी[20] ॥ १४ ॥
रिपु शूर दूर तेथुनि, तें दारुण कर्म पाहतां पळती ।
किति पडती, किति दडती, कितिएकांचीं धृतायुधें गळती ॥ १५ ॥

---

१ द्रौपदीचा. २ सभेंत केंस ओढले तो समय. ३ तृषाक्रांत. ४ सिंहसा. ५ पूर्वज. ६ हातीं खड्ग घेऊन. ७ सर्पास. ८ चरणानें. ९ वज्रपातानेंही. १० द्रौपदीला. ११ टिकतें. १२ वीज पडून फुटलेलें. १३ व्यालें. १४ प्रतिज्ञा. १५ आपल्या शत्रूच्या रक्तरूप जलास. १६ गोडी. १७ जिभळ्या. १८ अंगीकारी. १९ सिंहाची. २० रीत.

जाणो त्या अत्युग्रा, मूर्त श्रीनारसिंह-मंत्रास ।
पाहोनि पावले ते, रिपुभटभूपाळ-भूत[1] संत्रास ॥ १६ ॥
म्हणति मनुष्य नव्हे हा, राक्षस कीं काळ हा, खवळला हो ।
कीं आमुची कराया, मूर्तप्रळयाग्नि राख वळला हो ॥ १७ ॥
भीम पुन्हा दुःशासनरक्तें अंजलि भरोनियां डोले ।
मिटक्या देउनि, पाहुनि कर्णसुयोधनमुखांकडे बोले ॥ १८ ॥
पीतों हें रक्त तुझें, हांसत होतासि मज जसा भणगा[2] ।
दुःशासना ! तसा तूं, पुनरपि गौर्गौः स्वआननें म्हण गा ॥ १९ ॥
काय करूं काळानें, अभय दिलें घेतलासि तूं पदरीं ।
दुःशासना ! कुळक्षयमूळा, त्राता दुजा तुला न दरीं ॥ २० ॥
ऐसें बोलत हांसत, शत्रुरुधिरदिग्धपाणिमुख विकट[3] ।
प्रकट महाभैरवसा, नाचत गेला जयाच्युतानिकट[4] ॥ २१ ॥

## लघ्वक्षर–रामायण आर्या

### सुखरामायण

दशमुखवधमति विधिसुरनुतपद जगदधिप अजित[5] वरद हरी ।
परमकरुण म्हणउनि दशरथनरवर-तनुज[6] मनुजपणहि[7] धरी ॥ १ ॥
कुशिकतनय[8]-सवसमवन[9], करि मुनिवरयुवति[10]-दुरितगिरिस[11] खणी ।
मग पुरहरधनु[12] चुरि वरि अवनिजनिस[13] सकळसुभटमुकुटमणी ॥ २ ॥
अवितथ[14] जनकवचन करि, पुरवुनि अभिलषित[15] सुखवि बहु जननी[16] ।
अनुजयुवतिसह[17] वरि वनवसति, धरुनि हृदय दशवदन[18]-हननीं ॥ ३ ॥
दयिततनयविरहदहनविकल नृपति[19] अहह वदत असु[20] खरची ।
दशरथ-निधन[21] बहुत पुरभरतभ्रातिस नुरवि अतुळ असुख[22] रची ॥ ४ ॥
प्रभुसि भरत चरण धरुनि, विनवि परम करुण तरिहि न परतला ।
धृतमुनिपथ समजुनि महिसमवनगुरुकथित विहित तप रतला ॥ ५ ॥

---

१ पिशाच. २ भिकाऱ्यास. ३ भयंकर. ४ अर्जुनकृष्णांजवळ. ५ विष्णु. ६ पुत्र. ७ मानवदेही. ८ विश्वामित्र. ९ यज्ञरक्षण. १० गौतमपत्नी अहल्या. ११ पापपर्वतास. १२ शैवधनु. १३ सीतेस. १४ सत्य. १५ इच्छित. १६ कैकेयी. १७ लक्ष्मण व सीता यांसह. १८ रावण. १९ दशरथ. २० प्राण. २१ मरण. २२ दुःख.

आधीं विप्रमुखश्री, कळवी येतांचि माधवागमन।
मग मुनि सांगे मज तो, ऊठ म्हणे गुरुपदास[1] लाग मन ॥ १५ ॥
विप्रें कथिलें मज कीं, वत्से त्वल्लिखित उत्तम श्लोक।
ज्यांच्या अर्थश्रवणें, आला धांवोनि उत्तमश्लोक[2] ॥ १६ ॥
अंबेच्या नमनाला, न्यावी जीचा विवाह नवरी ती।
घरि हरिशंका दादा, देवीयात्रा कुळीं न नवरीती[3] ॥ १७ ॥
मग बाई दादाचे, मागधशाल्वादिकांहि मेल्यांचे।
सैनिक मज रक्षाया आले, धाकें विरोनि गेल्यांचे ॥ १८ ॥
पूजुनि पाय विनविली, कन्यांतें प्रसवतात ज्या माता।
त्या लटिक्या, तूंचि खरी, तुज कृष्णाचि योग्य होय जामाता ॥ १९ ॥
देवीप्रासादांतुनि[4], निघतां द्याया करास आलीला[5]।
आलीला[6] धरुनि करीं, दाखविली त्या गतींत आलीला[7] ॥ २० ॥
त्या मेल्यांस कशाला पाहूं मी ? प्रियतमास[8] अवलोकीं।
कीं, आला कीं नाहीं; होय तडित्स्फुरण काय तंव लोकीं ॥ २१ ॥
पत्रीं लिहिलें होतें, देवीयात्रेंत मज पदें दावा।
दावा[9] बहुतांशीं हा, भाव कळों दुर्जनासि नेदावा[10] ॥ २२ ॥
नयनांवरि येति सये, नलिनांवरि[11] भृंगं[12]-बालसे वाल[13]।
त्यांसि म्हणें साधु तसे, पूजिन जरि काय गाल सेवाल ॥ २३ ॥
प्रभुसि पहाया पूर्वींपासुनि मन्नेत्रपद्म बहु लोल[14]।
तो लग्नसमय, ते उपवासहि, लावील कोण सखि बोल ॥ २४ ॥
माझा मूर्त मनोरथ, तो रथ आला प्रियास घेऊन।
दर्शन नयनें घेती, जैसें शिशिरीं[15] दरिद्र घे ऊन[16] ॥ २५ ॥
माळा उंचालितां प्रिय, आपणहि रथावरूनियां लवला।
लव[17] लागेना तों घे अंकीं, करुणासमुद्र कालवला ॥ २६ ॥

---

१ ब्राह्मणपायास. २ कृष्ण. ३ नवीन रीत. ४ देवीच्या देवळांतून. ५ येणाऱ्या. ६ सखीला. ७ थोडी लीला. ८ कृष्णास. ९ द्वेष. १० न द्यावा. ११ कमळांवर. १२ भ्रमर. १३ केश. १४ उत्सुक. १५ हिंवाळ्यांत. १६ ताप. १७ क्षण.

हरिनील[1]-निभवरांकीं, बसलें न श्री घनीं तसी चपळे[2] ।
गेला घेउनि हरि[3] निजभाग सुखें त्यासि म्हणति नीच[4] 'पळे' ॥२७॥
हंसें मुक्ता[5] नेली, मग केला कलकलाट काकांनीं[6] ।
हाकांनीं नभ[7] भरिलें, जाय सुरांच्याहि नाद हा कानीं ॥ २८ ॥
पुष्कळ खळ[8] बळ[9] घेउनि हरिवरि आले नृपाळ ते कुतरे ।
उतरे एकहि न कशीं,[10] कनकासीं[11] कोटि भांडतां धुतरे[12] ॥ २९ ॥
मग आला गे बाई दादा मज सोडवावया कोपें ।
तो पेंव[13] वृश्चिकांचें[14] लोकां परि या खगध्वजा[15] सोपें ॥ ३० ॥
समनोरथरथशस्त्र प्रभुनें केला पळांत तो भग्न ।
नग्न स्वखड्गहि वधा, तों मन्मन होय शोकविनिमग्न ॥ ३१ ॥
अभयप्रदपदपद्मीं म्यां तेव्हां घातली मिठी घट्ट ।
धट्ट क्षणभरि झालें, केली स्वाभाविकत्रपा गट्ट ॥ ३२ ॥
केला न वध, तदधिका श्यालाची दुर्दशा सये केली ।
केली हरि जरि करि, तरि करिमदशोभा दिगंतरा गेली ॥ ३३ ॥
द्रौपदि अशी कथा हे, लग्नाची फार मी वदों काय ? ।
पाय प्रभुचे संतत पूजावे, तरिच सफळ हा काय ॥ ३४ ॥

## कर्णपर्वांतील दुःशासनवधाच्या आर्या

### कर्णपर्व, अध्याय ४५

धांवति अन्योन्यावरि[16], ते दोघे आठवूनि अपकार[17] ।
जाणों ते मदमत्त, क्रोधोद्धत दंपतीच[18] अपकार[18] ॥ १ ॥
दुःशासनशर मर्मीं, लागे नागेशसा[19] असुख[20] रचिता[20] ।
मूर्छित करि भीमातें, इतरांचे तो पळें असु[21] खरचिता ॥ २ ॥
सावध होउनि भीम, क्षिप्र महाशक्ति शत्रुवरि सोडी ।
तीसहि तो दुःशासन, दशबाणांहीं पराक्रमें तोडी ॥ ३ ॥

१ नीळमणी. २ विजेस. ३ सिंह. ४ हलके पुरुष. ५ मोतीं. ६ कावळ्यांनीं. ७ आकाश. ८ दुष्ट. ९ सैन्य. १० कसोटीस. ११ सोन्याशीं. १२ धोत्र्याचीं झाडें. १३ खाण. १४ विंचवांचें. १५ कृष्णाला. १६ भीम दुःशासन एकमेकांवर. १७ अपराध. १८ पकार-रहित दंपती म्हणजे दंती, हत्ती इत्यर्थः. १९ सर्पराजसा. २० दुःखदाता. २१ प्राण.

दशशतसहस्र पीडिति एकैका गाधिजानुजा यवन ।
गाय[1] वन स्वर्गेहि, तें दावि पितां आपणांत गाय वन[2] ॥ ३० ॥
पकडो लियो हकालो बे बिसवामितर भाग जावेगा ।
यवन ह्मणति दाविति त्या शब्दीं हरि करिवरांसि ज्या वेगा ॥ ३१ ॥
मागें पाहों न दिलें, तीं बारा कोस पळविलीं कटकें[3] ।
यश हारविलें तेथें, किति शस्त्रें हार कुंडलें कटकें[4] ॥ ३२ ॥
भूप म्हणे जे नेणति गोब्राह्मणतेज, ते जन क्षत्रीं ।
कल्पिति जसे न पाहुनि शिशुशशभृत्तेज[5] तेज नक्षत्रीं ॥ ३३ ॥
धिक् क्षत्रियतेजातें सार[6] नसे स्पष्ट या पलालसमीं[7] ।
येणेंचि जाहलों हतकाम[8] पराभूत पापलालस[9] मी ॥ ३४ ॥
क्षत्रबळ नाव फुटकी, जें ब्राह्मणतेज तेचि नवनौका[10] ।
बुडतों न अन्यथा मी, तरता व्यसनांत तोहि न वनौका ॥ ३५ ॥
प्राज्यहि[11] राज्य हित नव्हे, तप साधावें तयांत सर्व हितें ।
तप न करावें कोणा प्रभुनें विनिमग्न ज्यांत शर्वहि[12] तें ॥ ३६ ॥
निश्चय करूनि राज्यश्री सोडुनि सर्व ताप साहूनी ।
होमुनि तपोनळीं वपु होय अधिक-सर्वतापसांहूनी[13] ॥ ३७ ॥
झाला नृपति वसिष्ठस्पर्धेनें विप्र, तें असो आतां ।
विस्तर भय दे, नाहीं तरि काळाचेंहि भय नसे गातां ॥ ३८ ॥

## रुक्मिणीहरणाच्या आर्या

### कृष्णविजय, अध्याय ८३

प्रथम म्हणे वैदर्भी[14], बाई[15] होत्यें लहान मी कन्या ।
धन्या कृष्णकथा मज, तेव्हांचि रुचे, न आवडे अन्या ॥ १ ॥
ज्या दिवशीं हरिचरितश्रवण नसे त्यांत मज दहा दुखणीं ।
दुखणी काय? नवखणी माडी नलगे, धरा नखेंदु[16] खणी[17] ॥ २ ॥

---

१ वर्णी. २ उदक. ३ सैन्यें. ४ कडीं. ५ बालचंद्राचें तेज. ६ बळ. ७ कोंडयासारख्या. ८ नष्टमनोरथ. ९ पातकेच्छु. १० नवी नाव. ११ मोठें. १२ महादेवही. १३ अरण्यवासी जनांहून. १४ रुक्मिणी. १५ हे द्रौपदीबाई. १६ नखचंद्र. १७ उकरी.

श्रीकृष्णाला द्यावी, श्रीरामा जानकी तशी दुहिता ।
ऐशी गुरुबुद्धींनीं, केली बाई विचारणा सुहिता ॥ ३ ॥
रुक्मी माझा दादा, जो आम्हां साजणांमधें मोटा ।
खोटा नव्हेचि, परि हरिचरितरसीं तो भिजे न मणिगोटा ॥ ४ ॥
त्या स्वगुरुविचारातें, निंदुनियां मोहरोगवैद्यातें[१] ।
मजला देऊं केलें, दादानें हठ धरूनि चैद्यातें[२] ॥ ५ ॥
केला लग्नाचाही निश्चय, चैद्यासि धाडिलें मूळ ।
गूळ क्ष्वेडचि[३] वाटे, मज तातविचार होय पांगूळ[४] ॥ ६ ॥
एक ब्राह्मण केवळ, साधु दयामूर्ति तत्पदीं नमनें ।
केलीं पाय धरुनि म्यां, एकांतीं विनविला सुदीनमनें[५] ॥ ७ ॥
कां तो द्रवता माझा, असता जरि भाव पाहिला खोटा ।
जेणें अभयवर दिला, त्या गुरुहस्तांत म्यांहि लाखोटा ॥ ८ ॥
स्वकरें वसंततिलकावृत्तें[६] पत्रांत सात मोजूनी ।
लिहिलीं होतीं तींही लिहितां लिहितां क्षणांत योजूनी ॥ ९ ॥
गेला धांवत घेउनि मत्पत्र द्वारकेसि सद्विप्र ।
त्या[७] प्रणतवत्सलाला आणाया आण घालुनि क्षिप्र[८] ॥ १० ॥
तों आला शाल्वमगधपतिसख तो चैद्य मांडलें लग्न ।
जालें पुर तद्दळजळनिधींत[९] आधींत[१०] मन्मनहि मग्न ॥ ११ ॥
तांतडि बहु दादाची, कैंचा अवकाश? लागली हळद ।
खळदर्पघ्न[११] दिसेना, जो नतचातक-दयासुधा-जळद[१२] ॥ १२ ॥
चिंताज्वरांत रात्रौ, माझा नाहींच लागला डोळा ।
जायासाठीं कंठीं, शतवार प्राण जाहले गोळा ॥ १३ ॥
तोंचि समूळाधिज्वरहर[१३] मात्रा आणुनी उषःकाळीं ।
आला द्विज धन्वंतरि[१४], सदय पिताही तसा नसे बाळीं ॥ १४ ॥

---

१ कृष्णातें. २ शिशुपालातें. ३ विष. ४ पंगु. ५ दीनपणानें. ६ वृत्ताचें नांव. ७ कृष्णाला. ८ लौकर. ९ सेनासमुद्रांत. १० दुःखांत. ११ कृष्ण. १२ मेघ. १३ दुःखनाशक. १४ वैद्य.

तेव्हां गदाप्रहारें, भीम ललाटीं स्वशत्रुला ताडी ।
क्षितिवरि हरिवज्राहत, गिरिशिखर जसें तसें तया पाडी ॥ ४ ॥
पत्नीचा[1] केशग्रहसमय[2] स्मरला निज प्रतिज्ञा ते ।
आठवि, म्हणे म्हणोत न, मिथ्यावादी मजप्रति ज्ञाते ॥ ५ ॥
वृषनृपकृपकृतवर्मद्रोणसुतांतें म्हणे अहो परिसा ।
दुःशासनास वधितों, मी भीम, गजासि घोपला[3] हरिसा[4] ॥ ६ ॥
शक्ति असेल तरि तुम्ही, रक्षा, मी आपुली प्रतिज्ञा ती ।
संरक्षितों, कराया स्वर्गीं संतृप्त संप्रति ज्ञाती[5] ॥ ७ ॥
ऐसें गर्जोनि उडी, टाकी स्वरथावरूनि कलितासी[6] ।
तो भीम भीमकर्मा, गांठी त्या रिपुसि भूमिगलितासी ॥ ८ ॥
गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरोनि पन्नगा[7] झडपी ।
तैसा भीम बळानें, दुःशासनकंठ अंघ्रिनें[8] दडपी ॥ ९ ॥
भीम विदारी खड्गें, सहज परम कठिण शत्रुचें उर तें ।
वाटे पविपातींही[9], त्या साध्वीला[10] न गांजितां उरतें[11] ॥ १० ॥
अशनिहतें[12]-शिळातळजळ, रक्त तसें खड्गभग्न तें उर वी[13] ।
तृषित घटोत्कचतात, प्राशी शोणित न लेशही उरवी ॥ ११ ॥
मग कंठनाळ चरचर, तो सत्य करावया बिरुद[14] कापी ।
देउनि मिटक्या मटमट, घटघट त्या स्वाहितासृगुदका[15] पी ॥ १२ ॥
जे जे लोकीं असती, रस त्यांची ती न माधुरी[16] थोडी ।
परि अरिच्या रक्तरसीं, मज बहु त्यांहूनि लागली गोडी ॥ १३ ॥
ऐसें वदोनि ओष्ठप्रांत[17], जिभेनें पुनःपुन्हा चाटी ।
अवलंबी[18] अत्युग्रा, भीम अतृप्त द्विपारिची[19] धाटी[20] ॥ १४ ॥
रिपु शूर दूर तेथुनि, तें दारुण कर्म पाहतां पळती ।
किति पडती, किति दडती, कितिएकांचीं धृतायुधें गळती ॥ १५ ॥

---

१ द्रौपदीचा. २ सभेंत केंस ओढले तो समय. ३ तृषाक्रांत. ४ सिंहसा. ५ पूर्वज. ६ हातीं खड्ग घेऊन. ७ सर्पास. ८ चरणानें. ९ वज्रपातानेंही. १० द्रौपदीला. ११ टिकतें. १२ वीज पडून फुटलेलें. १३ व्यालें. १४ प्रतिज्ञा. १५ आपल्या शत्रूच्या रक्तरूप जलास. १६ गोडी. १७ जिभळ्या. १८ अंगीकारी. १९ सिंहाची. २० रीत.

जाणो त्या अत्युग्रा, मूर्त श्रीनारसिंह-मंत्रास ।
पाहोनि पावले ते, रिपुभटभूपाळ-भूत[1] संत्रास ॥ १६ ॥
म्हणति मनुष्य नव्हे हा, राक्षस कीं काळ हा, खवळला हो ।
कीं आमुची कराया, मूर्तप्रळयाग्नि राख वळला हो ॥ १७ ॥
भीम पुन्हा दुःशासनरक्तें अंजलि भरोनियां डोले ।
मिटक्या देउनि, पाहुनि कर्णसुयोधनमुखांकडे बोले ॥ १८ ॥
पीतों हें रक्त तुझें, हांसत होतासि मज जसा भणगा[2] ।
दुःशासना ! तसा तूं, पुनरपि गौर्गौः स्वआननें म्हण गा ॥ १९ ॥
काय करूं काळानें, अभय दिलें घेतलासि तूं पदरीं ।
दुःशासना ! कुळक्षयमूळा, त्राता दुजा तुला न दरीं ॥ २० ॥
ऐसें बोलत हांसत, शत्रुरुधिरदिग्धपाणिमुख विकट[3] ।
प्रकट महाभैरवसा, नाचत गेला जयाच्युतानिकट[4] ॥ २१ ॥

## लघ्वक्षर–रामायण आर्या

### सुखरामायण

दशमुखवधमति विधिसुरनुतपद जगदधिप अजित[5] वरद हरी ।
परमकरुण म्हणउनि दशरथनरवर-तनुज[6] मनुजपणहि[7] धरी ॥ १ ॥
कुशिकतनय[8]-सवसमवन[9], करि मुनिवरयुवति[10]-दुरितगिरिस[11] खणी ।
मग पुरहरधनु[12] चुरि वरि अवनिजनिस[13] सकळसुभटमुकुटमणी ॥ २ ॥
अवितथ[14] जनकवचन करि, पुरवुनि अभिलषित[15] सुखवि बहु जननी[16] ।
अनुजयुवतिसह[17] वरि वनवसति, धरुनि हृदय दशवदन[18]-हननीं ॥ ३ ॥
दयिततनयविरहदहनविकल नृपति[19] अहह वदत असु[20] खरची ।
दशरथ-निधन[21] बहुत पुरभरतधृतिस नुरवि अतुळ असुख[22] रची ॥ ४ ॥
प्रभुसि भरत चरण धरुनि, विनवि परम करुण तरिहि न परतला ।
धृतमुनिपथ समजुनि महिसमवनगुरुकथित विहित तप रतला ॥ ५ ॥

---

१ पिशाच. २ भिकाऱ्यास. ३ भयंकर. ४ अर्जुनकृष्णांजवळ. ५ विष्णु. ६ पुत्र. ७ मानवदेही. ८ विश्वामित्र. ९ यज्ञरक्षण. १० गौतमपत्नी अहल्या. ११ पापपर्वतास. १२ शैवधनु. १३ सीतेस. १४ सत्य. १५ इच्छित. १६ कैकेयी. १७ लक्ष्मण व सीता यांसह. १८ रावण. १९ दशरथ. २० प्राण. २१ मरण. २२ दुःख.

# कर्णार्जुनयुद्धाच्या आर्या

## कर्णपर्व, अध्याय २० ते २९

कर्ण म्हणे कुरुनाथा[१], पार्थाशीं संगरांगणा[२]-माजी।
घालीन गांठि, त्यातें मी कीं मारील तो मला आजी ॥ १ ॥
कार्यबहुत्वासाठीं, गांठि न पडली तयासवें मागें।
त्वां आम्हां दोघांचीं, आजि पहावीं बळें महाभागें ॥ २ ॥
मी जिष्णुतें[३] न वधितां, आजि न मागें फिरेन हे वाचा[४]।
साची असो, असावा निश्चयचि तुझा मनुष्यदेवाचा[५] ॥ ३ ॥
अश्वांच्या हृदयाचा ज्ञाता कृष्णासमान कौशल्य।
जाणतसे जरि माझें, सारथ्य करील आजि हा शल्य ॥ ४ ॥
तरि मी धनंजयाधिक[६], होइन तुज जय घडेल अभ्रांत[७]।
मग मज पार्थांत[८] सुकर, जैसा क्षुब्धानिळासि[९] अभ्रांत[१०] ॥ ५ ॥
तेव्हां ह्मणे सुयोधन, हें आहे सर्व सिद्ध मी आंगें[११]।
चालेन तुझ्यामागें, मग भक्ताला अभीष्ट[१२] तें सांगें ॥ ६ ॥
ऐसें वदोनि गेला, विनयें शल्यासमीप मग राजा[१३]।
प्रणयेंकरूनि त्यातें, प्रार्थी साधावया महाकाजा ॥ ७ ॥
सत्यव्रता समर्था, मद्राधीशा महारथा साधो।
वंदूनि विनवितों बा, तुझ्या प्रसादेंचि कार्य हें साधो[१४] ॥ ८ ॥
पदर पसरिला तुजला, रिपुगजपंचानना[१५] नृपांमाजी।
व्हावें प्रसन्न मजला, द्यावा वर एक याचका[१६] आजी ॥ ९ ॥
वरदा[१७] त्वां कर्णवचन, केलेंचि श्रवण सुप्रबुद्धा तें।
सफळ करीं; पार्थाशीं व्हावा अंगेंद्र[१८] योग्य युद्धातें ॥ १० ॥
बा वासुदेवसम तूं जाणसि सारथ्यकर्म नरनाथा।
तुजसम पटु[१९] अन्य नसे, म्हणवुनि मी ठेवितों पदीं माथा[२०] ॥ ११ ॥

---

१ दुर्योधना. २ युद्धाची जागा. ३ अर्जुनातें. ४ वाणी. ५ मनुष्यांचा स्वामी जो दुर्योधन त्याचा. ६ अर्जुनाहून अधिक. ७ निःसंशय. ८ पार्थनाश. ९ प्रचंड वायूस. १० मेघांचा नाश. ११ स्वतां. १२ इच्छित. १३ दुर्योधन. १४ साध्य होवो. १५ शत्रुगजरूपी सिंहाला. १६ याचना करणाऱ्यास. १७ शल्या. १८ कर्ण. १९ समर्थ. २० डोकें.

ब्रह्मा[1] महेश्वराचा[2], झाला कीं जेंवि कृष्ण विजयाचा[3]।
सारथि तूं कर्णाचा, हो वरदा हेतु मुख्य विजयाचा[4] ॥ १२ ॥
तो कृष्ण संकटीं त्या पार्थातें रक्षितो यथा राया।
तूं कर्णातें रक्षीं, हो सेतु स्वयशतोय[5] थाराया[5] ॥ १३ ॥
बळ अल्प पांडवांचें, परि त्यांहीं फार मर्दिलें सैन्य।
आतां निजपक्षींचें[6], दोघे योद्धे तुम्ही हरा दैन्य ॥ १४ ॥
अरुण रवीचा सारथि, दहनाचा[7] वायु, यत्न कीं विधिचा[8]।
सारथि हो तूं तैसा, कर्णाचा धैर्यबळपयोनिधिचा[9] ॥ १५ ॥
शल्य सुयोधनवाक्यें कोपे, चोळी करें करा, डोळे।
आरक्त करी, चावे अधरातें, फार तो मनीं पोळे[10] ॥ १६ ॥
मग कुरुराजासि[11] म्हणे राया अवमानितोसि बाहूनी[12]।
म्हणसी सोडुनि धनु शर, धरिं हयरश्मि[13] प्रतोद[14] बाहूंनीं[15] ॥ १७ ॥
करिसी बहु-प्रशंसा[16], या नरवरमंडळांत कर्णाची।
सांगसि सारथ्याची, पदवी मजलागिं हीनवर्णाची[17] ॥ १८ ॥
सिंहासनोचिताला, मज सारथ्याधिकार हा नीच[18]।
इच्छिसि नृपा कराया, मत्तेजाची जनांत हानीच[19] ॥ १९ ॥
युद्धीं दुर्बळ मी हें, गमलें तुज म्हणवुनीच भूपा[20] हें।
सारथ्य योजिलें तरि, दे दावुनि भाग, शक्ति तूं पाहें ॥ २० ॥
सांग मला भाग, तया जिंकुनि जाईन आपुल्या देशा।
अथवा एकाचि मी रिपुबळ मर्दिन, दे मला रणादेशा[21] ॥ २१ ॥
हे दाससूतबंदी, यांहीं आम्हां नृपांसि वानावें[22]।
सारथि होउनि उच्चें, जो नीच रथी तदुक्त मानावें ? ॥ २२ ॥

---

१ ब्रह्मदेव. २ शिवाचा. ३ अर्जुनाचा. ४ जयप्राप्तीचा. ५ यशरूप उदकातें रक्षाया. ६ स्वकीय पक्षाचें. ७ अग्नीचा. ८ दैवाचा. ९ धैर्य आणि बळ हींच उदकें, यांचा जो समुद्र त्याचा. १० संतापे. ११ दुर्योधनास. १२ बोलावून. १३ घोड्यांच्या दोऱ्या. १४ चाबूक. १५ भुजांनीं. १६ स्तुति. १७ कनिष्ठ जातीची. १८ हलका. १९ नाशच. २० दुर्योधना. २१ युद्धाच्या आज्ञेला. २२ वाखाणावें.

हो म्हणसी सूताचा सूत[१], भला गा भला, मला पदवी ।
देसी, हे सीमा तव, सुज्ञपणाचीच हें असें वदवी[२] ॥ २३ ॥
जातों गृहासि, झालों कृतकृत्य, प्राप्तमोक्षसम यज्ञ ।
प्रेक्षुनि घालों कीं तूं, धृतराष्ट्रसुता गुणज्ञ समयज्ञ[३] ॥ २४ ॥
ऐसें वदोनि मग नृप, वीरसमाज त्यजूनि करि गमन ।
आटोपेना त्याचें त्यासहि अपमानकोपकरिग[४] मन ॥ २५ ॥
तेव्हां धांवे कुरुवर, दीर्घ दृढ प्रेमबाहुपाशातें ।
पसरोनि शीघ्र कवळी[५], नमुनि म्हणे न करिं वंध्य आशांतें[६] ॥ २६ ॥
शत्रूंच्या हृदयीं तूं शल्य[७] म्हणुनि शल्य म्हणति तुज राया ।
कुब्जेसि कृष्णसा तूं, पटु मज्जयसिद्धिलागिं उजराया[८] ॥ २७ ॥
बहु विक्रम[९] कर्णाचा, न्यून पराक्रम तुझा असें न मनीं ।
असतें जरि तरि माझें शिर होतें सिद्ध हें कसें नमनीं[१०] ॥ २८ ॥
कर्णाहुनि मजहुनि तूं, अधिक अधिक यादवाधिपाहूनी[११] ।
व्हावें प्रभो वरप्रद, मज आजि पराभवाधि[१२] पाहूनी ॥ २९ ॥
हयहृदय[१३] कृष्ण जाणे, त्याहुनि तूं द्विगुण जाणसी माम्या ।
भुजयुद्धींहि परिसिली, न बळाची तुझिच आण सीमा[१४] म्यां ॥ ३० ॥
पार्थाधिक कर्ण तसा, कृष्णाधिक तूं म्हणून सार थिता[१५] ।
स्वगुण न लोपीं, प्रकटीं, वरिली विधिनेंहि शंभुसारथिता ॥ ३१ ॥
शल्य म्हणे राया मज राजसमूहांत[१६] हात जोडोनी ।
म्हणसी कृष्णाधिक, हें दुर्लभ यश जात नाहिं सोडोनी ॥ ३२ ॥
झालों प्रसन्न तुज मी, वर देतों घे करीन सारथ्य ।
पथ्य[१७] अपथ्य[१८] न म्हणतां, परि सोसावें मदुक्त हें तथ्य[१९] ॥ ३३ ॥
सारथि होतों परि मी, प्रभुसूतातें म्हणेन कां हां जी ।
गांजीन तरि सहावें, म्हणिजे वैद्यें दिली सुधा कांजी[२०] ॥ ३४ ॥

१ सारथि. २ बोलवी. ३ समय जाणता. ४ अपमानजन्य कोप हाच करी (गज) त्यावर वसलेलें. ५ मिठी मारी. ६ इच्छांतें. ७ सलणारा. ८ चांगल्या दशेस पावविण्यास. ९ पराक्रम. १० नमस्काराविषयीं. ११ कृष्णाहून. १२ पराभवरूप रोग. १३ घोड्याचें मन. १४ मर्यादा. १५ अल्प. १६ राजमंडळींत. १७ बरें. १८ वाईट. १९ खरें. २० पेज.

कर्ण सुयोधन म्हणती, केलें मान्य त्वदुक्त[१] बापा हें ।
अंगीकृत कार्याच्या, निर्वाहीं सुयश तूंहि बा पाहें ॥ ३५ ॥
शल्यें सारथ्याचा केला स्वीकार तेधवां यास ।
कुरुपति कथि इतिहास, त्रिपुराचा[२] चित्त हृष्ट[३] व्हायास ॥ ३६ ॥
सूतकुळांत न झाला, मज वाटे देवपुत्र हा कर्ण ।
क्षत्रकुळींच उपजला, हें याचा स्पष्ट सूचवी वर्ण[४] ॥ ३७ ॥
लोकांत प्रकट न हो, कुलकारण एक हेंचि सत्य जिला ।
झाला तिणें उपजतां बाळपणीं, करुनि साहस त्यजिला ॥ ३८ ॥
हा दीर्घभुज सकुंडलकवच उपजतांचि बाळभास्करसा[५] ।
प्रसवे न यासि राधा, प्रसवेल सुधाकरासि[६] काय रसा[७] ? ॥ ३९ ॥
अजि सिंधुशुक्तिगर्भीं,[८] मौक्तिक उपजे, नदींतही असती ।
पुष्कळ शिंपा, परि तीं त्यांच्या उदरीं न मौक्तिकें वसती[९] ॥ ४० ॥
राधा धात्रीच[१०] गमे, कर्णाच्या, न जननी, शरीरा या ।
सांगा जी व्याघ्रासि प्रसवेल मृगी कधीं तरी राया ? ॥ ४१ ॥
हा प्राकृत पुरुष नव्हे, सांगावें काय म्यां तुला कविला ।
कर्णाच्या तेजें बहु, वीरांकरवीं स्वगर्व टाकविला ॥ ४२ ॥
सारथि होय पितामह[११] रुद्राचा जेंवि तूंहि कर्णाचा ।
लाजो तुला सुरथहय, गुणधरिता बंधुही[१२] सुपर्णाचा[१३] ॥ ४३ ॥
सारथि अधिक रथीहुनि, असतांचि घडे जय प्रजापाळा ।
पाळा[१४] कर्णासि तुम्ही, घालू कंठांत कीर्ति मणिमाळा ॥ ४४ ॥
पार्थातें कृष्ण तसा, कर्णातें तूंहि संगरीं[१५] रक्षीं ।
त्वां मारुतें[१६] करावा कर्णबळाग्नि प्रदीप्त रिपुकक्षीं[१७] ॥ ४५ ॥
शल्य अवश्य म्हणे तों कर्ण म्हणे तूं यथोक्त रथ कल्पीं[१८] ।
मद्रपते निजवूं दे, सत्वर भीमानुजासि शरतल्पीं[१९] ॥ ४६ ॥

---

१ तुझें बोलणें. २ शिवाचा. ३ हर्षयुक्त. ४ शरीरकांति. ५ उदयकाळच्या सूर्यासारखा. ६ चंद्रास. ७. पृथ्वी. ८ समुद्राच्या शिंपीच्या पोटांत. ९ राहती. १० दाईच. ११ ब्रह्मदेव. १२ अरुण, सूर्यसारथि. १३ गरुडाचा. १४ रक्षण करा. १५ युद्धांत. १६ वायूनें. १७ शत्रुरूप तृणांत. १८ तयार कर. १९ शरांची शय्या.

शास्त्रप्रोक्तविधानें, रथ कल्पुनि शीघ्र आणिला शल्यें ।
जेंवि मनोरथ साक्षात्, केला दैवेंचि सिद्ध वात्सल्यें ॥ ४७ ॥
शल्य बसे मग बैसे वैकर्तन[1] निजरथीं जसा तरणी[2] ।
पाहुनि शोभा मानिति, जन कीं केलाचि पार्थघात रणीं ॥ ४८ ॥
धर्म धरावा किंवा मारावा पार्थ, वर मला दे हा ।
अथवा पांचहि मारीं, विजयश्रीशुद्धकीर्तिच्या गेहा[3] ॥ ४९ ॥
ऐसें वदे जयार्थी, नृप त्यासि म्हणे अवश्य, तो कर्ण ।
झाला सिद्ध महात्मा वाराया सर्व आप्तलोकर्ण[4] ॥ ५० ॥
हर्षें शल्यासि म्हणे, मद्राधीशा वरप्रतापा हूं ।
प्रेरीं[5] वाजी आजी, त्वद्दर्शित यानशीघ्रता पाहूं ॥ ५१ ॥
मारीन पांडव रणीं, शल्या निश्चयचि जाण ते जितकीं ।
शस्त्रें धरितिल, खंडिन; माझे अतितीव्र बाण तेजित[6] कीं ॥ ५२ ॥
शरवृष्टिनें धनंजय, शांतीतें[7] पाववीन मी थोर ।
घनवृष्टिरसीं सादर[8], आजि रणीं या करीन कुरुमोर[9] ॥ ५३ ॥
शल्य म्हणे सूतसुता[10], कां गा अवमानिशी सुभव्यजना[11] ।
वंशजहि[12] शूर्प[13] न गुणें लंघी सभ्यादृता शुभ व्यजना[14] ॥ ५४ ॥
न विलोकिला धनंजय[15], म्हणवुनि ऐसें यथेष्ट बोलवतें ।
न लवे वेतसशिर[16] परि, येतां गुरुपूर[17] तें किं हो लवतें ॥ ५५ ॥
मदभूतग्रस्ता[18] तुज, धर्मात्मा सिद्धमंत्र[19] पाहेल ।
साधुपुढें मोह तसा, क्षणभरिहि न हा प्रलाप[20] राहेल ॥ ५६ ॥
कर्ण अनादरुनि वचन, शल्यासि म्हणे सुशीघ्र[21] हय[22] हाकीं ।
आकर्षिला कृतांतें[23], चुंबकमणिनेंचि[24] जेंवि अय[25] हा कीं ॥ ५७ ॥

---

१ सूर्यपुत्र कर्ण. २ सूर्य. ३ गृहा. ४ आप्तांचें ऋण. ५ हांक. ६ तेजस्वी. ७ मरणातें ८ आदरयुक्त. ९ कौरवमोर. १० कर्णा. ११ चांगल्या मनुष्यास. १२ उत्तमवेळूचा १३ सूप. १४ विंझुणा. १५ अर्जुन. १६ वेताचा वेल. १७ मोठा पाण्याचा लोंढा. १८ उन्मादरूप पिशाच त्यानें ग्रासलेला. १९ सिद्धाचा मंत्र. २० वडबड. २१ लौकर. २२ घोडे. २३ यमानें. २४ लोहचुंबकमणि. २५ लोखंड.

कर्ण म्हणे शल्या, गति भीष्माची शत्रुंनीं तशी केली ।
गुरुहि[1] अधर्मे वधिला, विजयश्री ओढुनी बळें नेली ॥ ५८ ॥
पार्थप्रताप[2] साहे, आहे मजवेगळा असा कोण? ।
गंगासुत वृद्ध भला, तो ब्राह्मणही पुरातन द्रोण ॥ ५९ ॥
माझें प्रिय बहु केलें, धृतराष्ट्रसुतें तदर्थ साधीन ।
याविषयीं प्रियभोगासह जीवित[3] करिन अंतकाधीन[4] ॥ ६० ॥
इत्यादि आत्मविक्रम[5], जेव्हां स्वमुखें यथेष्ट कर्ण वदे[6] ।
शल्य तया उत्तर दे, उग्र जसें विष हरासि अर्णव[7] दे ॥ ६१ ॥
नरवर अर्जुन कोठें, पुरुषाधम सूतपुत्र तूं कोठें ।
वाचाळा नाचावें सत्स्तवनीं[8] न खलवर्णनीं ओठें ॥ ६२ ॥
तुज नित्य घोषयात्रास्मरण असावें, परंतु हा मद[9] तों ।
आहेचि विस्मृतीचें बीज, म्हणुनि लेशमात्र मी वदतों[10] ॥ ६३ ॥
तूं प्रथम पळालाशी, प्राणक्षयभय धरूनि मनिं मागें ।
जिंकोनि बद्ध केला, दुर्योधन खचरनायकें[11] रागें ॥ ६४ ॥
बद्धविमुक्त[12] सुयोधन, तेव्हां त्वां कीं धनंजयें केला ।
राधेय अन्य तूं तो, अन्यचि जाणों पळोनि जो गेला ॥ ६५ ॥
त्या गोग्रहप्रसंगीं[13], भीष्मद्रोणादि सर्व एकानें ।
केले भग्न दशा ते, तुमची क्षण आयकों न ये कानें ॥ ६६ ॥
तेव्हां त्वां तो अर्जुन, राधेया[14] कां न जिंकिला शस्त्रें ।
अस्त्रें गेलीं होतीं, कोठें नेलीं हिरोनि जैं वस्त्रें ॥ ६७ ॥
झालें युद्ध उपस्थित, आजि पळेनासि जरि तुला पार्थ ।
मारील निश्चयें हें, कर्म करिशि निजवधूविलापार्थ[15] ॥ ६८ ॥
ऐसें सज्जन-संमत[16], हित सत्य श्राव्य[17] जें वदे शल्य ।
कर्णाच्या कर्णा दे, दुःख तसें तप्तही न दे शल्य[18] ॥ ६९ ॥

---

१ भीष्मही. २ अर्जुनतेज. ३ प्राण. ४ यमाचे स्वाधीन. ५ आपला पराक्रम. ६ बोले. ७ समुद्र. ८ साधुस्तुतीविषयीं. ९ उन्माद. १० बोलतों. ११ चित्रसेन गंधर्वानें. १२ बद्धपणांतून सोडविलेला. १३ गोग्रहणवेळीं. १४ कर्णा. १५ स्वस्त्रीच्या रडण्याकरितां. १६ मान्य. १७ श्रवण करण्यास योग्य. १८ लोखंडाची सळई.

कर्ण म्हणे गा शल्या, मागील कथा कशास ? जरि आजी ।
मज जिंकील तरि खरें तव कत्थन[१] शीघ्र चाल्वीं वाजी ॥ ७० ॥
शल्य म्हणे बहु बरवें, पार्थाशीं गांठि घालितों तूर्ण[२] ।
ईश्वरवरानुकूलें, दैवें होतात कामना[३] पूर्ण ॥ ७१ ॥
यापरि बोल्त जातां, पांडवपृतना[४] विलोकिली दूर ।
कोठें अर्जुन ऐसें, सादर ज्या त्यासि तो पुसे शूर ॥ ७२ ॥
कर्ण म्हणे सुखवाया[५] भूप सखा करुनि शत्रुचें निधन ।
सांगेल पार्थ मज जो, देइन मागेल तें तयासि धन ॥ ७३ ॥
शल्य म्हणे राधेया, वांटिसि धन कां कुबेरसा अज्ञा ।
पार्थ पहाशील सुखें, व्ययवेत्ते[६] वित्त[७] वेंचिती यज्ञा ॥ ७४ ॥
कंठीं बांधोनि शिळा, बाहुबळें जेंवि सागरीं तरण ।
कीं भृगुपतन[८] तसें हें, जें तूं करणार त्या अरींत रण ॥ ७५ ॥
व्यूह रचोनि सकळ नृप, बंधु, सुत, सुयोधनादिकांसहित ।
पार्थाशीं युद्ध करीं, जरि म्हणसी स्वजय हो, न हो अहित ॥ ७६ ॥
कर्ण म्हणे शल्या मी, स्वभुजबळें प्रार्थितों रणीं पार्था ।
हे प्रभु सहाय असतां, साधीना कर्ण कोणत्या स्वार्था ? ॥ ७७ ॥
तूं निश्चित हितशत्रु स्तविशी घडिघडि सधर्मभीमातें ।
साच्युत धनंजयातें, तूं देवूं पाहतोसि भी[९] मातें ॥ ७८ ॥
या दृढमदभिप्रायापासुनि[१०] वारूं शके न शक्र[११] मला ।
मर्त्यांची[१२] काय कथा ? प्राकृतसा काय कर्ण हा गमला ? ॥ ७९ ॥
शल्य म्हणे राधेया, जेव्हां तुझिया स्मरोनि कर्मातें ।
अर्जुन तीव्र शरांनीं, समरीं भेदील सर्व मर्मातें[१३] ॥ ८० ॥
तेव्हां पश्चात्तापा, बापा तूं पावशील पापानें ।
सापानें धरिला प्लव[१४], न जगे, वडबडसि तूं जसा पानें[१५] ॥ ८१ ॥

---

१ वडबड. २ लवकर. ३ मनोरथ. ४ पांडवसेना. ५ सुखी करण्यास. ६ खर्च जाणते. ७ द्रव्य. ८ पर्वताच्या कड्यावरून पडणें. ९ भय. १० माझ्या दृढ मतापासून. ११ इंद्र. १२ मनुष्याची. १३ मर्मस्थानांतें. १४ बेडूक. १५ मद्यपानानें.

तूं विजयासि वधाया, वांच्छिशि हें कोण जाणता आहे ?।
अंबांकस्थितशिशु[1] शशिमंडळ[2] कवळावया जसा पाहे ॥ ८२ ॥
शवमांस[3]-मत्त जंबुक[4] तूं, गजमुक्ताश[5] सिंह तो जिष्णु।
तूं शशक[6] पार्थ गजपति, कीं दानव[7] तूं सिताश्व[8] तो विष्णु ॥ ८३ ॥
स्वबिलस्थ[9] कृष्णसर्पा, काष्ठें टोंचोनि खवळिशी कां गा ?।
तीव्र त्रिशूळवदनें, तूं खाजवितोसि आपुल्या आंगा ॥ ८४ ॥
पार्थ-पयोधर[10] गर्जे, स्पर्धा मंडूक[11] तूं वृथा धरिशी।
त्याच्या पुढें टुरुटुरू, टरोंटरों शब्द हे किती करिशी ॥ ८५ ॥
श्वान[12] स्वपोषकाच्या[13] सदनाच्या[14] आश्रयें उभा राहे।
जिकडे वनांत गर्जे शार्दूल,[15] तया दिशेकडे पाहे ॥ ८६ ॥
भुंके बळें यथेष्ट, व्यथित[16] करी निकटवर्तिजनकर्णा[17]।
अर्जुन दृष्टि न पडला, तोंचि तसा भुंकतोसि तूं कर्णा ॥ ८७ ॥
शशमंडळांत[18] कोल्हा म्हणतो मी सिंह वल्गना[19] करितो।
जोंवरि न पाहिला गजमुक्ताफळकवळभक्षिता हरि तों ॥ ८८ ॥
कर्ण म्हणे गुणवद्गुण जाणे गुणवंत, अगुण नेणेची[20]।
प्रसवे तीच अभिज्ञा[21], शल्या तैशी न वांझ वेणेची[22] ॥ ८९ ॥
मी आपणासि जाणें, जाणें त्या जिष्णुलाहि[23] तत्त्वानें[24]।
तैसें न जाणिजे त्वां, इतरें बा तत्त्वहीन[25] सत्त्वानें ॥ ९० ॥
पार्थवधाचें साधन, आहे तें सांगतों तुला जेणें।
आज द्वैरथयुद्धीं, विजयाचे प्राण निश्चयें घेणें ॥ ९१ ॥
आहे अहिमय[26]-सायक, मृदुचंदनचूर्णपूर्ण भात्यांत।
त्यावांचुनि शर दुसरा, नाहींच क्षोणिवल्लभा[27] आंत ॥ ९२ ॥

---

१ आईच्या मांडीवरचें पोर. २ चंद्रमंडळ. ३ प्रेतमांस. ४ कोल्हा. ५ हत्तीच्या मोत्यांचा खाणारा. ६ ससा. ७ राक्षस. ८ अर्जुन. ९ आपल्या बिळांत बसणारा. १० मेघ. ११ बेडूक. १२ कुतरा. १३ धन्याच्या. १४ घराच्या. १५ सिंह. १६ दुःखयुक्त. १७ समीप असणाऱ्या लोकांच्या कानास. १८ सशांच्या मंडळींत. १९ वडबड. २० न जाणे. २१ जाणणारी. २२ प्रसूतिवेदनेची. २३ अर्जुनाला. २४ खरेपणानें. २५ अज्ञान प्राण्यानें. २६ सापाचा. २७ शल्या.

तो आहेय[1] शरोत्तम[1], सोडुनि मी मेरूतेंहि फोडीन ।
कवचाची काय कथा, पार्थी कीं केशवींच सोडीन ॥ ९३ ॥
तूं झालासि कुदेशीं[2], संगरपांडित्य[3] काय तुज ठावें ।
शल्या कल्याणगुणा, पात्र जगीं पुण्यसंग्रहें व्हावें ॥ ९४ ॥
भ्यालासि मूढबुद्धे, बडबडसी फार वानिसी[4] अरिला[5] ।
भाव तुझा मज कळला, धीर तुझा मृत्युच्या भयें हरिला ॥ ९५ ॥
ते मारितील मज कीं, त्यांला मारीन मी स्वबळ जाणें ।
कृष्णाला कर्ण न[6] भी[6], तनु टाकुनि एकदां असे जाणें[7] ॥ ९६ ॥
दोघांची काय कथा, जरि कृष्णार्जुन सहस्र येतील ।
तरि माझे शर[8] त्यांच्या प्राणधनातें, हिरोनि घेतील ॥ ९७ ॥
तुज भेदिलें परांनीं स्पष्ट, म्हणुनि बोलसी असें खोटें ।
सर्वां पापांमध्यें, हें मित्रद्रोहपाप[9] मज मोठें ॥ ९८ ॥
मज युद्धाभिप्रायापासुनि मागें बळेंचि फिरवील ।
ऐसें भूत[10] नसेचि, त्रिजगीं जें या यशास मिरवील ॥ ९९ ॥
भ्याडासि भेडसावीं, मी भ्याया उपजलों नसें कांहीं ।
विक्रम यश साधाया, झालोंसें चाल पथ पुढें पाहीं ॥ १०० ॥
शल्य म्हणे रे सूता, बडबड करितोसि फार मद्यप-सा[11] ।
गुरुसागर बहु गर्जे, परि मुनिचा[12] एकही भरे न पसा ॥ १०१ ॥
तेव्हां दुर्योधन नृप, निजकार्याचा न व्हावया घात ।
कर्णास मित्रभावें, वारी[13] शल्यासि जोडुनी हात ॥ १०२ ॥
नृपबहुमानें झाले, अतिवाद त्यजुनि उपरमा[14] वरिते ।
मग हरिवर[15] करिवरसे[16], गेले दोघे नरोत्तमावरि[17] ते ॥ १०३ ॥
कर्ण त्रिदशगुरुमतें[18], रचुनि महाव्यूह तन्मुखीं ठाके ।
बार्हस्पत्यव्यूहा, पाहुनि बहु धर्म तो मनीं धाके ॥ १०४ ॥

१ सर्पबाणश्रेष्ठ. २ वाईट देशीं. ३ युद्धपांडित्य. ४ वाखाणितोसि. ५ शत्रु अर्जुनाला. ६ भीत नाहीं. ७ जावयाचें. ८ बाण. ९ स्नेहिद्वेषाचें पाप. १० प्राणी. ११ मद्यप्यासारिखा. १२ अगस्तिऋषीचा. १३ निवारण करी. १४ शांति. १५ सिंह. १६ हत्तीसे. १७ अर्जुनावर. १८ बृहस्पतिमतानें.

भूप  म्हणे तूंचि करीं, कर्णाशीं युद्ध उद्धरीं कांटा।
भांडो सुयोधनाशीं भीम, तयाचाचि तो असे वांटा ॥ १०५ ॥
अमृतरसाची धारा धर्माची श्वेतवाह आज्ञा पी[2]।
होय पुढें सैन्यातें, ऐसें वर्ती म्हणोनि आज्ञापी[3] ॥ १०६ ॥
शल्य म्हणे राधेया, तो येतो जिष्णु विष्णुसमशील[4]।
गरुडीं कालीय तसा, ज्यावरि तूं कोप-गरळ[5] वमशील ॥ १०७ ॥
कर्णा पुससी ज्याला, आला तो पार्थ दाव[6]-पावकसा।
वधितो मृगांसि हरिसा, सोसेल परांसि तत्प्रभाव[7] कसा ॥ १०८ ॥
तुजशीं धनंजयाशीं[8], गांठि पडाया नकोचि बहुवेळ।
पाहीन मी तयाचा, आणि तुझाही रणांगणीं खेळ ॥ १०९ ॥
वधिशील जिष्णुला[9] तरि, कर्णा होशील आमुचा राजा।
परि हें दुर्घट, इंद्रा जरि काय सहाय आणिला आजा ॥ ११० ॥
कर्ण म्हणे मद्रेशा[10], नीट पहा पार्थ-केतुचा[11] शेंडा।
संसप्तकांत झाला, मग्न जसा सागरोदरीं[12] भेंडा[13] ॥ १११ ॥
शल्य म्हणे वरुणातें, कोण समुद्रोदकांत बुडवील।
विझवील तृणें दहना[14], अनिळाला[15] करुनि बद्ध तुडवील ॥ ११२ ॥
ऐसें जों कर्णाशीं, शल्य वदे तोंचि शीघ्र त्या सेना।
मिळती मारण-मरणाहूनि दुजें अधिक ज्यांसि भासेना ॥ ११३ ॥
कुरुपांडवसेनांसीं, होतां संग्राम रामशिष्य[16]-मणी।
गजयूथावरि[17] हरिसा, धांवे मारी अनेक वीरमणी ॥ ११४ ॥
अरि एक बाण हाणी, तों हाणी कर्ण शर तया तिपट।
निपट प्रत्युपकृति[18]-पटु, झांकी रिपु पसरुनि स्वहेतिपट[19] ॥ ११५ ॥
काढी जोडी ओढी, सोडी शर कर्ण लाघवास्तव तें।
न दिसे, दिसे शरासनमंडळ हतशत्रुबळहि त्या भवतें ॥ ११६ ॥

१ धर्मराज. २ प्राशन करी. ३ सांगे. ४ विष्णुस्वभावाचा. ५ विष. ६ वणवा. ७ त्याचें सामर्थ्य. ८ अर्जुनाशीं. ९ अर्जुनाला. १० शल्या. ११ ध्वजाचा. १२ समुद्रमध्यांत. १३ मातीचा गोळा. १४ विस्तवास. १५ वायूला. १६ परशुरामाचा शिष्य. १७ हत्तीच्या कळपावर. १८ उलट उपकार. १९ आयुधवस्त्र.

हतनरतुरगगजांच्या, रक्तांची गुरुतरंगिणी[1] वाहे ।
साक्षात्सरस्वती ती, स्वर्ग जन जिच्या निमज्जनें[2] लाहे[3] ॥ ११७ ॥
रक्तनदीच्या स्नानें, पानें गंधेंहि वीर ते भुलले ।
दिसती वसंतसमयीं[4], किंशुकतरु[5] कटककाननीं[6] फुलले ॥ ११८ ॥
शल्य म्हणे आला रे, आला काळानळ[7]-प्रबळ भीम ।
भी[8] मन काळाचेंही, यास प्रतिमल्ल एक बळभीम[9] ॥ ११९ ॥
बहुकाळसंचितोग्रक्रोधगरळ[10] तुजवरीच ओकाया ।
हा भीमभुजग[11] आला, सावध हो देख तेजओका[12] या ॥ १२० ॥
कर्ण म्हणे मद्रेशा[13], सत्यचि वदतोसि भीम हा साचा ।
घेईल सूड समरीं, आम्हीं केल्या महोपहासाचा[14] ॥ १२१ ॥
हा वीर धीर कोपी, प्रबळ नसे यासि चाड देहाची ।
चौघांहूनि शतगुण, प्रीति द्रुपदात्मजेशि दे[15] हाची ॥ १२२ ॥
याला वधीन किंवा, विरथ तरी मी करीन कोपार्थ ।
याच्या कैवारें तरि, मजशीं घालील गांठि तो पार्थ ॥ १२३ ॥
शल्य म्हणे न वदें बहु, आधीं भीमासि चाल वाराया[16] ।
कर्ण म्हणे तुज सागर भासे, मज भीम काल्वा[17] राया ॥ १२४ ॥
भीमातें नाराचें[18], ताडी कर्ण स्तनांतरीं[19] आधीं ।
मग बुडवि शरसमुद्रीं, कपि गिरितें[20] जेंवि दुस्तरागाधीं[21] ॥ १२५ ॥
भीमहि झांकी कर्णा, बाणपटें तत्तनूंत नव रोप[22] ।
खोंवी, तो वीरमणि स्वमनीं तेव्हां धरी अमित[23] कोप ॥ १२६ ॥
लोक म्हणति दारुण[24] रण, नेणों होईल आणि काय कसें ।
दोघेहि प्रबळ हठी, दिसतें हें युद्ध भीतिदायक-सें ॥ १२७ ॥
हांसे भीम मनिं म्हणे, जरि नसता कर्ण जिष्णुचा वांटा ।
कां टाकितों सुयश? कां गुरुहृदयांतिल न काढितों कांटा? ॥ १२८

१ मोठी नदी. २ स्नानानें. ३ पावे. ४ वसंतऋतूंत. ५ पळसाचीं झाडें. ६ सैन्यरूप अरण्यांत. ७ प्रलयाग्नि. ८ भय पावे. ९ सदाशिव. १० बहुत दिवस सांठविलेलें उग्र क्रोधरूप विष. ११ भीमरूप साप. १२ तेजस्थाना. १३ शल्या. १४ थट्टेचा. १५ देतो. १६ निवारणार्थ. १७ अल्प सरोवर. १८ बाणानें. १९ उरावर. २० पर्वतातें. २१ विस्तृत आणि खोल अशा समुद्रांत. २२ बाण. २३ पुष्कळ. २४ भयंकर.

कौसुंभरक्तरंजित[1], वस्त्रानें शोभते जशी महिला[2] ।
हतकटकरक्तरंगें[3], आली शोभा तशी रणीं महिला ॥ १२९ ॥
भीमें कुरुबळ मथिलें, जरि केलें गुरुसुतादिकीं[4] जतन ।
हतनष्ट रुद्ररोपें होय जसें दक्षमखमहायतन[5] ॥ १३० ॥
पार्थ मुकुंदासि म्हणे, संसप्तक मारिले पहा कृष्णा ।
कृष्णादेवीची जशि, तशि पुरवाया स्वभूमिची तृष्णा ॥ १३१ ॥
कर्णाचा गजकक्ष-ध्वज[6] दिसतो आमुच्या बळांतचि[7] तो ।
पुरुषव्याघ्र प्राया, वीरांचे राशि संगरीं रचितो ॥ १३२ ॥
चाल सख्या हरि सत्वर, तेथें ने तन्निवारणार्थ[8] मला ।
यम लाजो तव दासा, वाटे वृष[9] काळ पांडवां गमला ॥ १३३ ॥
कर्णातें साहेसा, न दुजा मजवेगळा तुला कळतें ।
अद्भुत तेज तयाचें, भस्मचि केलें असेल गा बळ[10] तें ॥ १३४ ॥
जो सारथि सुखधामा[11], तुजसम शूरहि नवांबुदश्यामा[12] ।
आला अरिच्या कामा, तो राजा शल्य आमुचा मामा ॥ १३५ ॥
ने रथ तेथें जेथें, कर्ण करितसे मदीय-बलदमना[13] ।
स्मरत असेल वृषदहनदग्धांच्या कृष्णमित्रजलद[14] मना ॥ १३६ ॥
हरि हर्षें हरि[15] हांकी, तैं हरिणांचाचि न हरिती सर्व ।
ते ऐसे जवन[16] ल्व न, पवनकुमारींहि उरविती गर्व ॥ १३७ ॥
शल्य कपिध्वज[17] पाहुनि, कर्णासि म्हणे पहा महाबाहो[18] ।
आला अर्जुन, सावध आतां युद्धार्थ शीघ्र तूं बा हो ॥ १३८ ॥
कर्ण म्हणे सत्य वदसि, धैर्याची धरुनि घट्ट कास रहा ।
वदलासि यथार्थ नृपा, मज झाला प्राप्त धन्य वासर[19] हा ॥ १३९ ॥
मी शुद्ध युद्ध यासीं, निर्भयचित्तें करीन काम रणीं ।
होतो पूर्ण; पहावा धर्मज्ञजनेंहि दोष कां मरणीं[20] ॥ १४० ॥

---

१ कुसुंबी रंगानें शोभित. २ स्त्री. ३ मारलेल्या सैन्याच्या रक्ताचा रंग त्यानें. ४ अश्वत्थामादिकांनीं. ५ दक्षाचें यज्ञठिकाण. ६ गजचिन्हित. ७ सैन्यांत. ८ त्याच्या निवारणार्थ. ९ कर्ण. १० सैन्य. ११ सुखाचें घर. १२ कृष्ण. १३ सैन्यनाश. १४ अर्जुनरूप मेघ. १५ घोडे. १६ वेगवान. १७ अर्जुन. १८ कर्णा, महाभुजा. १९ दिवस. २० युद्धमरणीं.

भीष्मद्रोणचरित्राहुनि, कोणाचें चरित्र सन्महित[1] ।
परि तेंहि विसरवीन, स्वचरित्रें मी करीन जन्महित ॥ १४१ ॥
कृष्ण म्हणे पार्था हा, आला क्रोधांध कर्ण अंतकसा[2] ।
मृत्युंजयवरपात्रा, तूं याचा न करिशील अंत कसा ॥ १४२ ॥
याच्या शरासि साहे, ऐसा त्रिजगांत तूंचि एक रणीं ।
वीर उदंड असति परि, त्यांला पार्था तुझी न ये करणी[3] ॥ १४३ ॥
कर्णातें जिंकाया तूं शक्त[4], तव प्रताप मी जाणें ।
झाला प्रसन्न तुज तो, जो जाळी त्रिपुर[5] एकले बाणें ॥ १४४ ॥
मारीं हरप्रसादें कर्णा, वृत्रा जसा सुनाशिर[6] ।
राधेसह ताडूत, व्याकुलचित्ता तिच्या सुना शीर[7] ॥ १४५ ॥
पार्थ म्हणे कृष्णा मज, जय घडतो आजि निश्चयें हा कीं ।
बा सर्वलोकगुरु तूं, आहेसि बहु प्रसन्न, हय[8] हाकीं ॥ १४६ ॥
आजि पहाशील सख्या, मच्छरशकलीकृतांग[9] कर्णातें ।
तदसृक्कणसिक्तातें[10], आकाशातेंहि शोणे[11]-वर्णातें ॥ १४७ ॥
मी त्याचें कीं माझें तो, आजि करील निश्चयें हनन[12] ।
मन न व्यग्र तुझें हो, रणिं जयमरणार्थ आमुचें जनन[13] ॥ १४८ ॥
जिष्णुसि हरि ने धर्म-स्वांतींचें[14] उद्धरावया शल्य ।
कर्णरथासहि आणी, सत्वर समरांगणांत तो शल्य ॥ १४९ ॥
उत्साह, तेज, विद्या, शिक्षा, बळ, धैर्य, शौर्य दोघांचें ।
तुल्यचि ज्यापरि गंगायमुनांच्या पावनत्व ओघांचें ॥ १५० ॥
इंद्र म्हणे कर्णवधें, हो पार्थ स्तोत्रपात्र अमरांत[15] ।
सूर्य म्हणे पार्थवधें, संपादू विजय कर्ण समरांत ॥ १५१ ॥
कर्ण म्हणे शल्या जरि, मजला मारील आजि पार्थ कसें ।
करिशील सांग ऐकों, मैत्रीचें होय ज्यांत सार्थक-सें ॥ १५२ ॥

---

१ पूज्य. २ यमासारिखा. ३ हातोटी. ४ समर्थ. ५ तीन पुरें. दैत्य. ६ इंद्र. ७ कपाळ. ८ घोडे. ९ माझ्या बाणांनीं छिन्न झालेल्यास. १० त्याच्या रक्तबिंदूंनीं युक्त अशास. ११ आरक्त. १२ घात. १३ जन्म. १४ मनांतलें. १५ देवांत.

शल्य म्हणे कर्णा, तें न घडो, दैवें घडेलही जरि तें।
तरि मी त्वदर्थ युद्धीं, मारीन रणांत जिष्णुतें[1] हरितें[2] ॥ १५३ ॥
पार्थहि हरिस म्हणे, जरि अरि मज मारील, काय करिशील ?।
न पुसावें परि पुसतों, कीं तूं संशय समस्त हरिशील ॥ १५४ ॥
ऐकोनि कृष्ण शिव शिव, ऐसें आधीं म्हणोनि मग हांसे।
कीं कर्ण काय, न बळी काळाचेही स्वसेवकीं फांसे ॥ १५५ ॥
शुष्क उदधि, शीत अनळ, जरि होईल प्रभाकरा[3] पात।
तरि या कर्णापासुनि, नाहीं होणार बा तुझा घात ॥ १५६ ॥
जरि विपरीतचि होइल, तेंही स्मरहर[4]-वरप्रदान मृषा।
तरि मी निजभुजतेजें, भस्म करिन मद्रपतिसमेत वृषा ॥ १५७ ॥
ऐसा निश्चय केला, पार्थें कर्णेंहि मांडिलें समर।
कौतुक पाहति कौरवपांडवपक्षस्थ, आणखी अमर[5] ॥ १५८ ॥
पार्थाकडील कटकें कर्णें, कर्णाकडील त्या पार्थें।
केलीं तीव्रशरांहीं, भग्नें मग्नें भयीं हस्तस्वार्थें[6] ॥ १५९ ॥
वर्षति अन्योन्यावरि, कर्णार्जुन ते घनावरी घनसे।
पुरुहूतदूत[7]-वात-द्युमणिकरां, शरगृहांत रीघ[8] नसे ॥ १६० ॥
तों आला वधसमय, द्विजशापहि भू[9]-मुखेंचि तो[10] डावें।
गिळवी रथचक्र, म्हणे, रामास्त्रा[11] प्रेम तूंहि सोडावें ॥ १६१ ॥
चक्र क्षितिनें गिळितां, न स्मरतां भार्गवास्त्र[11] रविजाला[12]।
स्पर्शे विषाद[13] म्हणती, बळतेजोनाशहेतु कवि ज्याला[14] ॥ १६२ ॥
व्यसनीं[15] पडतां, क्षात्रीं धर्मीं होऊनि तो विरस[16] 'हाय'।
कर्ण म्हणे, धर्मासहि[17] मानी कीं हा नव्हे चिरसहाय ॥ १६३ ॥
विधि[18] फिरतां जरि दिधला, व्यसनें त्या फार कंप दात्यातें।
परि परिरंभण[19] देउनि, होती शुचिसत्त्व[20]-संपदा त्यातें ॥ १६४ ॥

१ अर्जुनातें. २ कृष्णातें. ३ सूर्याला. ४ शिव. ५ देव. ६ जयाशारहित. ७ मेघ. ८ प्रवेश. ९ पृथ्वी. १० तो शाप. ११ परशुरामानें दिलेलें अस्त्र. १२ कर्णाला. १३ दुःख. १४ ज्या विषादाला. १५ संकटांत. १६ उत्साहरहित. १७ निजधर्मास. १८ दैव. १९ आलिंगन. २० धैर्य.

राधापुत्र[1] बहु करी बाधा पार्थासि, तेधवां त्याला ।
राधाहृच्चोर[2] म्हणे, बा धाक प्राप्त कां तुला झाला ?॥ १६५ ॥
तों वृष भूमिग्रस्त-स्यंदन[3]-चक्रासि उद्धरायातें ।
उतरे स्वरथाखालें, करुनि असें अतुल युद्ध राया तें ॥ १६६ ॥
उद्धरण करूं पाहे, कर्ण भुजांनीं धरूनि चक्राचें ।
परि पृथ्वी सोडीना, जाणों व्रत घेतलेंचि नक्राचें ॥ १६७ ॥
सप्तद्वीपा पृथ्वी, वृष[4] उचली चार अंगुळें वरिती ।
बडिशाशि[5] जसी मत्सी, नुगळी[6] चक्रासि, कांपली परि ती ॥ १६८ ॥
सद्रसना[7] नामातें, कीं सोडी बंधुता न दायातें[8] ।
तैशी क्षिति चक्रातें, श्रम झाला फारसा तदा यातें ॥ १६९ ॥
त्या व्यसनीं तो पाणी आणी नेत्रासि वृष म्हणे 'हाय' ।
काय करील ? न साहे, ते बहु मर्मींहि साहिले घाय ॥ १७० ॥
स्ववधोद्यतार्जुनातें, कर्ण म्हणे बळ तुझें अनंत रहा ।
स्वस्थ मुहूर्तभरि रणश्रद्धा पुरवील गा अनंतर हा[9] ॥ १७१ ॥
रथचक्र उद्धरूं दे, श्रुतिशास्त्रज्ञा महारथा कुलजा ।
साधु न हाणिति अरिला, पाहति अधृतायुध[10] व्यथाकुल ज्या[11] ॥ १७२ ॥
तूं स्वरथीं, क्षितिवरि मी, तूं सायुध, मी अशस्त्रकवच रणीं ।
न वधावें मज, जों मी रथचरणीं, लाग तूंहि भवचरणीं[12] ॥ १७३ ॥
भ्यालों न तुज हरिसही, जो न तुला विमुख, काय कातर[13] तो ? ।
कथितों यास्तव कीं जन, धर्में भवसिंधु[14]-नायका तरतो ॥ १७४ ॥
रक्षावा धर्म बुधें, कुशळाचा धर्म हा निधी[15], राहें ।
स्थिर, जें करिसि निरायुधमथन, करिल धर्महानि धीरा हें ॥ १७५ ॥
कृष्ण म्हणे राधेया, भला बरा स्मरसि आजि धर्मातें ।
नीच व्यसनीं बुडतां, निंदिति दैवास न स्वकर्मातें ॥ १७६ ॥

---

१ कर्ण. २ कृष्ण. ३ रथ. ४ कर्ण. ५ गळास. ६ न सोडी. ७ साधूची जीभ. ८ विभागातें. ९ हा कर्ण. १० अशस्त्र. ११ ज्याला. १२ शिवपदीं. १३ भित्रा. १४ भवसमुद्र. १५ ठेवा.

जेव्हां तूं दुर्योधन, दुःशासन शकुनि एकमति झालां।
कैसें कपटद्यूतीं, चित्तींहि न धर्म लंघितां भ्यालां? ॥ १७७ ॥
जेव्हां सभेसि नेली पांचाळी[1], मानिलें मनीं शर्म[2]।
तेव्हां गेला होता कोठें राधासुता[3] तुझा धर्म? ॥ १७८ ॥
फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया आंग।
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां वृषा सांग ॥ १७९ ॥
चारुनि विषान्न भीमा, सर्प डसविले नृपें असें खोटें।
कर्म करवितां कर्णा, होता तव धर्म तेधवां कोठें? ॥ १८० ॥
केले दग्ध जतुगृहीं[4], त्वां पांडव वारणावतीं जेव्हां।
गेला होता कोठें, धर्म तुझा सूतनंदना[5] तेव्हां? ॥ १८१ ॥
अभिमन्यु बाळ बहुतीं, वधितां त्वां वारिलें न तें कर्म।
तेव्हां गेला होता, कोठें राधासुता तुझा धर्म? ॥ १८२ ॥
पूर्वीं धर्म न रुचला, त्यजिला निपटूनि जो जसा कुचला।
आतांचि बरा सुचला, काळगृहा सर्व व्हा परासु[6], चला ॥ १८३ ॥
मागेंचि तुम्ही भजतां, धर्माला तरि तुम्हांस वांचविता।
आतां मरा, न वांचे, दीप्तगृहीं[7] जो न तोय[8] सांचविता ॥ १८४ ॥
मागेंचि धर्म करितां जरि, देतां राज्य, धर्म वांचविता।
न जगे तो दुर्भिक्षव्यसनापूर्वीं न धान्य सांचविता ॥ १८५ ॥
आतां रक्षील कसा, धर्म तुम्हीं वित्तमद्यमत्तांनीं।
जो लोटिला दहादां, स्वहितहि मानूनि अहित लत्तांनीं[9] ॥ १८६ ॥
रक्षावा धर्म असा करिसी उपदेश तरि असे मान्य।
रक्षितसों धर्मातें[10], आम्हांला धर्म ठाउका नान्य ॥ १८७ ॥
आश्रितजनाभिमानी, प्रभु[11] बोले जेधवां असें रागें।
निःश्वास वृषें लज्जाऽवनतमुखें सोडिला असा नागें[12] ॥ १८८ ॥

---

१ द्रौपदी. २ सुख. ३ हे कर्णा. ४ लाक्षागृहीं. ५ हे कर्णा. ६ मृत. ७ पेटलेल्या घरांत. ८ पाणी. ९ लाथांनीं. १० धर्मराजातें. ११ कृष्ण. १२. सर्पानें.

न वदे कांहींच, रथीं वेंघे[1], घे सूर्यसूनु चापातें[2]।
सोडी बाण कराया मूर्च्छित शक्रासि सूनुच्या[3] पातें[3] ॥ १८९ ॥
तेव्हां परपुरुष[4] म्हणे, पार्था दिव्यास्त्र-वात[5] सोडावा।
झोडावा, मोडावा, वैर-द्रुम[6], कर्ण, बाण जोडावा ॥ १९० ॥
कर्णावरि बहु कोपे, पार्थ जई तेधवां अनळसाचा[7]।
देह ज्वालामाली[8], भासे त्या रणमखीं अनळ[9] साचा ॥ १९१ ॥
शर सोडिला रविसुतें, धीर जनेंही स्वधीर यामागें।
जो सोडिलाचि नव्हता, व्यसनांत कधींहि मणि जसा नागें ॥ १९२ ॥
तो शर गरधरवरसा[10], पविसा[11] रविसा स्मरारि[12]-सायकसा।
पार्थभुजांतरिं शिरला, वल्मीकामाजि[13] नागनायकसा[14] ॥ १९३ ॥
त्या खरशरप्रहारें, विव्हळ झाला महेंद्रसुत[15] राया।
जरि होता निकट कुशळ, मंत्री प्रभु बाणसर्प उतराया ॥ १९४ ॥
ऐसा निजभुजविक्रम, दावुनि सर्वां भटांसि शुद्ध रणीं।
उतरे वृष[16] दावाया, भूग्रस्तरथांघ्रिच्याहि[17] उद्धरणीं ॥ १९५ ॥
बहु यत्न करी प्रार्थी, परि धरिलें सोडिनाचि चाक रसा[18]।
द्विजशाप मान्य पतिसा, गुरु कर्ण न मान्य तीस चाकर-सा ॥ १९६ ॥
देव म्हणे पहिलें गुरुनाम, मग स्वधनु, बाण बरवे घे।
खंडीं शिर, रिपु पुनरपि जों रथरत्नाचिया न वर वेंघे ॥ १९७ ॥
प्रभुची आज्ञा होतां, पार्थ प्रखरेषु सोडुनि त्वरित।
रणदक्षा स्वविपक्षा[19] करि कक्षाकेतु[20] खंडुनि ज्वरित[21] ॥ १९८ ॥
तुटला ध्वजचि न केवळ, विजयाचा भरंवसाहि तुटला हो।
सुहृदश्रुबिंदुसह[22] तो, पडला बळधैर्यसेतु फुटला हो ॥ १९९ ॥
केतु च्छेदुनि पार्थ, द्युमणिसुताचे[23] हरावया प्राण।
जोडी गांडीव गुणीं, शत्रुहर हरायुधा[24] असा[24] बाण ॥ २०० ॥

---

१ चढे. २ धनुष्यातें. ३ अर्जुनाच्या पतनानें. ४ कृष्ण. ५ वायु. ६ वृक्ष. ७ आळसरहित अशा अर्जुनाचा. ८ प्रज्वलित. ९ अग्नि. १० विषधर सर्पसा. ११ वज्रसा. १२ शिव. १३ वारुळांत. १४ सर्पसा. १५ अर्जुन. १६ कर्ण. १७ भूमींत गेलेल्या चाकाच्याही. १८ पृथ्वी. १९ शत्रु कर्ण त्यास. २० गजचित्रांकित ध्वज. २१ विह्वल. २२ मित्रांच्या अश्रुबिंदूंसह. २३ सूर्यपुत्र कर्णाचे. २४ शिवाच्या बाणासारखा.

योजुनि महास्त्रमंत्रित शर विजय म्हणे जरि स्वगुरु सर्व।
तोषविले असतील, ज्ञानबळाचा नसेल तिळ गर्व ॥ २०१ ॥
विधिनें जोडुनि नेलें, असेल जरि कीर्तनें[1] न तप नाशा।
तरि या शरें वृष मरो, हरिचीच[2] पुरो, पुरो न तपनाशा[3] ॥ २०२ ॥
ऐसें वदोनि पार्थें, ओढुनियां सगुणबाण कर्णांत[4]।
पाठविला काळें निजदूत तसा व्हावयासि कर्णांत[5] ॥ २०३ ॥
नयनाग्निकील[6] नीलग्रीवाचा[7] मीनकेतुवरि[8] जैसा।
अरिवरि सायकनायक, जाय कराया क्षय त्वरित तैसा ॥ २०४ ॥
तो शर कृत्यानळसा[9], दुर्घट चक्रोदतिक्रियानळसा[10]।
गांठी कुरुबळविजयप्रासादाच्या रविप्रभा कळसा ॥ २०५ ॥
शाणानिशितमुख[11] बाण, प्राणभृदीड्यार्क[12]-सूनुच्या अमळा।
खंडी नाळापासुनि, कमळा मारुत[13] तसा शिरःकमळा ॥ २०६ ॥
साप्ताश्रु[14] शिर वृषाचें, प्रथम क्षोणीतळीं गळालें[14] हो।
मग सकुसुमवृष्टि[15] तनू, सधर्मभय[16] शत्रुबळ पळालें हो ॥ २०७ ॥
कर्णशरीरापासुनि तेज निघालें दिवाकरीं शिरलें।
गुरुहृच्छोकतमावरि[17], जाणों सत्पुत्ररत्न तें फिरलें ॥ २०८ ॥
ऐसा केला असतां, कृष्णकृपेनेंचि कर्णनाश तदा।
पांडव-पांचाळ करिति, विजयाच्या वीर्यवर्णना शतदा ॥ २०९ ॥
बहुसिंहनाद वाद्यध्वनि जयजयकार करिति धर्मबळें[18]।
म्हणति तरला युधिष्ठिर, दुस्तरकर्णार्णवासि धर्मबळें[19] ॥ २१० ॥
भग्नरथें शल्य पळे, क्षितिस म्हणे क्षोभलीस तूं कां गे।
दुर्योधनासि भेटे, स्वमुखें कर्णांतवृत्त तें सांगे ॥ २११ ॥

---

१ स्वगुणवर्णनानें. २ इंद्राचीच (आशा). ३ सूर्याची आशा. ४ कानापर्यंत. ५ कर्णाचा नाश. ६ तृतीय नेत्रांतील अग्नीची ज्वाळा. ७ शिवाचा. ८ मदनावर. ९ अभिचाराग्निसा. १० चक्र उपडण्याविषयीं निरलस. ११ साणेवर घांसलेला. १२ लोकस्तुत्य सूर्य. १३ वायु. १४ आप्तांचे अश्रु व कर्णाचें शिर गळालें. १५ मग कुसुमवृष्टि आणि तनू गळाली. १६ इकडे धर्मराजाचें भय आणि शत्रुसैन्य पळालें. १७ सूर्याच्या हृदयांतील शोकरूप तमावर. १८ धर्मराजाचीं सैन्यें. १९ स्वधर्माच्या बळानें.

भूप म्हणे हा हा अशि, कशि झाली आजि अंगराजगती[1]।
स्वर्गश्री साधावी, मग आधीं करुनि संगरा[2] जगती[3] ॥ २१२ ॥
तें विपरीत कसें त्वां, केलें कर्णा सख्या अगा धामीं[4]।
सुख काय? तरों कैसा, या त्वद्विरहार्णवा[5] अगाधा[6] मी ॥ २१३ ॥

## अक्रूरागमन आर्या–गीति

राशि तपाचा राया, आला अक्रूर हरिस पाचाराया।[7]
प्रेषी स्वपतिस काय, श्रीमथुरा मूळ सात्त्विकौघ सकाय[8] ॥ १ ॥
सरलीं सारीं दुरितें, जन्म सफळ आज, दुःख गेलें दुरि तें।
जीं ध्याति मुनिजनमनें, हरिपदनलिनांसि करिल शिर निज नमनें ॥ २ ॥
जातों कंसाकडुन, स्वांतीं वाटेन यदुवतंसा कडु न।
कीं क्षेत्रज्ञा[9] त्याला, तत्त्व कळे सर्व ईश्वरा ज्ञात्याला ॥ ३ ॥
ऐसें चिंतित काया विसरे; न कळेचि मार्ग तो तितका या[10]।
पावे अस्तास रवी, व्रजाहि हा मार्गदैर्घ्य चिंता सरवी ॥ ४ ॥
श्वेतश्यामळ, लीलानिधि जे दिसती न दृष्टिला मळलीला।
यमुनासुरसरिदोघ[11], व्रजा प्रयागाचि आणिती सरि[12] दोघ ॥ ५ ॥
शुभवासरिं दोघांतें, प्रेक्षुनियां त्या दयैकसरिदोघांतें[13]।
उतरे यानावरुनी[14]; वस्त्रादि स्रस्त जें तया नावरुनी ॥ ६ ॥
दे परिरंभण[15] गा तें, जें दुर्लभ इंदिरेस, त्या भणगातें[16]।
झाला आपण साचा; रोमांचित सुरगुरू सखा पणसाचा ॥ ७ ॥
ताता सांग मनाचें इच्छित, कारण मला तवागमनाचें।
ऐकावा तो कानीं, सारा वृत्तांत तेथिला तोकांनीं ॥ ८ ॥
धृतवारिरुडर्यंकीं[17], स्वकरीं चुरितां स्वभक्तपद पर्यंकीं।
सांगे सहस्रशीर्षा, पुरुषा स्वागमनहेतु कंसचिकीर्षा ॥ ९ ॥
मग भोजवतंसाची[18], आज्ञा नंदासि कथिति हे कंसाची।
कीं अक्रूर बहाया, आला मथुरेंत चापयाग[19] पहाया ॥ १० ॥

---

१ कर्णाची दशा. २ युद्धा. ३ पृथ्वी. ४ गृहांत. ५ विरहसमुद्रास. ६ दुस्तर. ७ बोलावया. ८ मूर्तिमंत. ९ सर्वांतर्यामी. १० अक्रूरास. ११ यमुनागंगांचे ओघ. १२ सादृश्य. १३ दयासिंधूंतें. १४ रथावरून. १५ आलिंगन. १६ भिकाऱ्यातें. १७ कमलचक्रांकितीं. १८ भोजपति कंसाची. १९ क्रीडाविशेष.

# साक्या रामायण युद्धकांड

तेजें विजयश्री साधाया, सानुजससुगळ[१] सबळ।
राम निघे सुमुहूर्तीं ध्याया, स्वशरातें अरिकवळ[२] ॥ १ ॥
जलनिधितिरास[३] जातां प्रभुला, शरण बिभीषण आला।
झाला प्रसन्न, लंकाराज्य स्तवनुतिफळ दे त्याला ॥ २ ॥
नळकपि सुमहान् सेतु रची त्या, मार्गें तो प्रभु उतरे।
पतिमथनें अरि सुगळा भ्याले, हरिला जैसे कुतरे ॥ ३ ॥
प्रभु तारात्मज[४] दूतमुखें त्या, हित कथि तें खळ[५] न गणी।
त्यांत वक्रपण आदी मध्यें, अंतिंहि जैसें मगणीं[६] ॥ ४ ॥
समरीं सहाय सचिव सुत सुभट, कुंभकर्णही खपला।
इंद्रजित जसा मायावीही, जरि बहु विजया जपला ॥ ५ ॥
खळबळपारावारातें[७] तो प्रभुवर कुंभज[८] भेटे।
कीं राक्षसकुळ-कक्षीं[९] रघुवर तो प्रळयानळ पेटे ॥ ६ ॥
गरुडाहूनि मरुत्सुत[१०] आला, समरीं बहु कामाला।
आणुनि औषधि गिरिशिखरातें[११] हृष्ट करी रामाला। ७ ॥
सप्त अहोरात्रें रण करुनी, दशमुख तो खपवीला।
संपादुनि विजयश्री रामें, दिधला तोख[१२] पवीला[१३] ॥ ८ ॥
झाले जयजयकार बहु स्तव, दिव्य[१४] वाद्यरव[१४] हर्षें।
नृत्यें गीतें केलीं कल्पद्रुमकुसुमांचीं वर्षें[१५] ॥ ९ ॥
दशकंठानुज[१६] पदीं[१७] बसविला, मग दिव्य[१८] करी सीता।
गुरु[१९] सुखवुनि कपि[२०] उठवुनि केली, त्रिजगीं कीर्ति स्फीता[२१] ॥ १० ॥

---

१ सुग्रीव. २ शत्रुरूप ग्रास. ३ समुद्रतीरास. ४ अंगद. ५ रावण. ६ मगण सर्वगुरु. उदाहरण, श्रीरामें. याची चिन्हें ऽऽऽ हीं तिन्ही स्थानीं वक्र आहेत तसा. ७ खळरूप समुद्रास. ८ अगस्तिऋषि. ९ तृणांत. १० मारुति. ११ द्रोणाचलातें. १२ हर्ष. १३ वज्राला. १४ स्वर्गांतील वाद्यांचा शब्द. १५ वृष्टि. १६ रावणाचा भाऊ बिभीषण. १७ लंकाराज्यपदावर. १८ प्रमाणशपथ. १९ दशरथादिक. २० मृत वानर. २१ प्रसृता.

मग सुमंत्रवरयानिं[1], अधिष्ठुनि[2] कपितेंही[3] बाहुनि[4] घे[4] ।
परमोत्सवें सलक्ष्मण सीतेसह वेगें राम निघे ॥ ११ ॥
सकल वृत्त[5] रानीं जें घडलें, तें सीतेला कळवी ।
भेटुनि भरता तद्दुःखासह[6] पुरजनदुःखा[7] पळवी ॥ १२ ॥
रघुवर[8] हेमनगावर[9] घनसा[9], सिंहासनीं विराजे ।
सेवक मयूर नाचति चातक, सर्व भासती राजे ॥ १३ ॥
भावें सद्यश रामाचें, गावें जगदभिरामाचें ॥ ध्रुवपद ॥

## आर्या परंतु–रामायणांतील

साहित्य करी राजा, अर्पाया यौवराज्य रामातें ।
दयिता परंतु मोडी, कैकेयी नाम कुमति वामा[10] तें ॥ १ ॥
ती पूर्वदत्त मागे, वर दोन परंतु राज्य तनयातें ।
द्यावें म्हणे चतुर्दश वर्षें, जो ज्येष्ठ राम, वन यातें ॥ २ ॥
दुर्बुद्धिमंथरामत, दूषितमति सर्पिणी तशी खवळे ।
राजा प्रार्थी बहुधा, करही जोडी परंतु ती न वळे ॥ ३ ॥
गुरु[11]-सत्यरक्षणार्थी, दारानुजसह निघे सुखें राम ।
वल्कल धरी परंतु न, सोडी श्री त्या सती[12] जशी धाम ॥ ४ ॥
वाइट कैकेयीतें, स्त्रैण[13] म्हणे दशरथासही पुर तें ।
न विटे परंतु चित्त, प्रभुचें कीं शांतिसद्गुणें पुरतें ॥ ५ ॥
होता दूर परंतु, द्रुत गुरुनें साधु भरत आणविला ।
कैकेयीनें त्याला, राज्यार्थकृतप्रयत्न जाणविला ॥ ६ ॥
हांसे माय परंतु, स्मृतगुरु तो साधुराय 'हाय' वदे ।
कीं ती मूढा बुडवुनि, शतखंडी एक राज्य हा यव[14] दे ॥ ७ ॥

---

१ पुष्पक विमानांत. २ बसुनि. ३ अंगदसुग्रीवादिकांस. ४ बोलावुनि विमानांत घेता झाला. ५ सीताविरह, जटायुमरण, सुग्रीवसख्य, सेतुबंधन इत्यादि. ६ भरतदुःखासहित. ७ अयोध्यावासी जनांचें दुःख. ८ श्रीराम. ९ मेरुपर्वतावर मेघसा. १० कुटिला. ११ पिता दशरथ. १२ पतिव्रता. १३ स्त्रीजित. १४ धान्यविशेष.

तीतें क्षमी परंतु, क्रोधें धिक्कार करुनि साधु निघे।
नमुनि गळां पडुनि रडुनि, कौसल्येचा प्रसाद साधुनि घे ॥ ८ ॥
तो प्रभुसि चित्रकूटीं, प्रार्थी आग्रह करी फिरायास।
सकृप परंतु न वळला, कीं हरणें विप्रसुरचिरायास ॥ ९ ॥
हटकर परंतु समजे, माथां वाहोनि पादुका परते।
नंदिग्रामीं राहे, श्रीशीं स्वप्नींहि साधु[१] तो न रते ॥ १० ॥

## श्लोक स्यमंतकोपाख्यान

जो सप्रेम उपासिला सुनियमें सत्राजितें तो रवी।
भेटे सख्य करी स्यमंतकमणी दे वाढवी थोरवी ॥
आला द्वारवतीप्रति द्युमणिसा[२] रत्नप्रभामंडला-।
संलक्ष्याकृति पौर हे कळविती श्रीयादवाखंडला[३] ॥ १ ॥
तूं देवेश्वर गुप्त या यदुकुळीं आलें फळा दैव तें।
वैकुंठ त्यजिलें, तुला हुडकिती जाणो सदा दैवतें ॥
भेटाया वळखोनियां तुज जगच्चक्षु[४] स्वयें आज गा।
येतो दृष्टिस रश्मिमंडळ रवी, रक्षीं हरी या जगा ॥ २ ॥
हांसे कृष्ण म्हणे न तो रवि तुम्ही होऊं नका भीत या।
ऐका हो कथितों यथार्थचि तुम्हां कीं जाणतों मी तया ॥
जो सत्राजित सूर्यभक्त तुमचा इष्ट स्वगेहास तो।
येतो भास्करदत्तरत्नधर तत्तेजें तसा भासतो ॥ ३ ॥
तो सत्राजित येउनि स्वसदना पूजूनियां ब्राह्मणा।
प्रार्थी कीं मणिकारणें मज तुम्ही स्वस्त्यस्तु ऐसें म्हणा ॥
स्थापी देवगृहांतरींच मिरवी जैशी सुशोभा रवी।
स्वर्णाचे[५] वसुसंख्य[६] नित्यहि मणिश्रीमंत तो भार[७] वी ॥ ४ ॥
आधिव्याधि भुजंग दुष्टकपटी दुर्भिक्ष मारी असे।
कल्याणेतर दुःखहेतु नसती जेथें मणी तो असे ॥

१ भरत. २ सूर्यसा. ३ यादवेंद्राला. ४ सूर्य. ५ सोन्याचे. ६ आठ. ७ सुवर्णाचे कांहीं भार मान.

सच्चिंतामणि[1] हि स्यमंतकमणी मागे नृपाकारणें ।
कीं वृष्णीश्वर उग्रसेन रविसा शोभेल तद्धारणें ॥ ५ ॥
श्रीमत्कृष्णप्रसादापरिस बहु मनीं मानिलें स्वर्ण[2] दीनें ।
त्या मूढें थिल्लरींचें[3] जळ वर गणिलें वाहतां स्वर्णदीनें[4] ॥
दुष्प्राप स्पर्शरत्न[5] त्यजिल तरि न तो होय का हीन सोनीं ।
रक्षी लक्षी कुबुद्धि स्वहित करि असे लाभ कांहीं नसोनी ॥ ६ ॥
दे सोनें मात्र तेंही परिमितचि दिला भास्करें एक गोटा[6] ।
साधु प्रत्यूह[7] झाला म्हणति तुज कसा वाटला लाभ मोटा ॥
तत्त्यागें विश्वचिंतामणिमणि मिळतां मानिला फार तोटा ।
हा हा सत्राजिता तूं सकळबुधमतें या जनीं मूढ खोटा ॥ ७ ॥
लोकत्रयीं हो शुभ कीर्ति याची । याकारणें श्रीपति रत्न याची ॥
कांहींच लोकांत उणें असेना । कृष्णप्रसादास्तव उग्रसेना ॥ ८ ॥
पूज्यश्रीभगवत्पदीं न करितां सद्वस्तुचें अर्पण ।
प्रारंभीं करि आपुलेंचि जन जो तेणें मनस्तर्पण ॥
तें इष्टप्रदही अनिष्ट फल दे कीं चूकला सूचित[8] ।
ज्ञाते जाणति या कथेंत इतुकें सत्तत्व हें सूचित[9] ॥ ९ ॥
हा हा सत्राजिता रे हरिवरिच कसा घातला आळ साचा ।
तूं पापी, संहरावें त्वरित तुज, नव्हे काळ हा आळसाचा ॥
दुष्टा अंगार[10] कीं तो यदुकुळभवनीं लाविला भूललासी ।
मूर्खा दीपा पतंग स्वमनिं जरि म्हणे हें खरें फूल लासी[11] ॥ १० ॥

## कवि आनंदतनय

### सीतास्वयंवरांतील श्लोक

चिद्भाग्यें[12] अथिला विदेह मिथिलाभूपाल भूपावली ।
पाचारूनि विचारुनी मनिं कथी साचार वाचावली ॥
जो हें त्र्यंबकचाप भूप उचली त्या आपुली कन्यका ।
केली अर्पित हें समर्पक वरा हो नोवरा जी निका ॥ १ ॥

१ श्रीकृष्ण. २ सोनें. ३ सांचवणी. ४ भागीरथी. ५ परिस. ६ खडा. ७ विघ्न. ८ योग्यकृत्य. ९ सुचविलें. १० अग्नि. ११ भाजितो. १२ वैराग्यरूप ऐश्वर्यानें युक्त.

हें ऐकोनि निकें सकाम सकल क्षोणीपती[१] पातले ।
जैसे देव महेंद्रमंडितसभे येती मदें मातले ॥
यत्नें त्या जनकें सुरत्नकनकें शृंगार रंगांगणीं ।
केला केवळ कौतुकें मग सभा व्यापे नृपांच्या गणीं ॥ २ ॥

॥ **चूर्णिका** ॥ जैसे सकल कुलाचल मिळाले एक्या स्थळीं; कीं लक्षावधि प्लव[२] वारांनिधिजळीं[३]; कीं कामरूप पन्नगभार पाताळीं; कीं नानाविमानसंघ गगनमंडळीं; कीं नानाफलसमूह डाहळीं; तेंवि मुकुटांगदकेयूरकटकमुक्ताहारतोडर-नूपुरहंसकादिभूषणीं विराजमान भूपाळ जनक सभामंडपीं सकलही एकवटले ॥३॥

**श्लोक**

हेमाद्रीवरि हेमनिर्मित जशा संफुल्ल वल्ली भल्या ।
तैशा आभरणीं अपार तरुणी सौधांगणीं शोभल्या ॥
मध्यें कल्पकवल्लरीसम दिसे शीतांशुबिंबानना ।
सीता शीलवती शुभा नृपसभा लक्षी जना कानना ॥ ४ ॥
रायें दूरुनि देखिल्या ऋषिघटा[४] माथां जयांच्या जटा ।
शाटी बंधन वल्कला जिन-कटा[५] त्या पादुका वाजटा ॥
शुद्धाच्छस्फटिकाक्षहार झुलती भूतिप्रभा[६] बोलती ।
सारे चित्रचि साग्निहोत्र झुलती आनंदले चालती ॥ ५ ॥
जो कल्याणगुणी गुणीच अगुणी भूतें मणी ज्या गुणीं[७] ।
ज्याच्या रूपगुणीं सदा गुणगुणी शंभू रिघे निर्गुणीं ॥
सृष्टी चित्त गुणीं जयास्तव गुणीं माया जया ठेंगणी ।
तो कोणा न गणी बसे ऋषिगणीं श्रीराम रंगांगणीं ॥ ६ ॥
जो वाहे धरणी प्रपंच भरणीं वानीत वाग्धोरणी ।
देवाची करणी प्रतिप्रकरणीं लुब्धे जगत्कारणीं ॥
जो का आदिफणी विषें फणफणी रत्नें जयाच्या फणीं ।
तो रामानुज रामचंद्र निकटीं शोभे सभारंगणीं ॥ ७ ॥

---

१ राजे. २ नौका. ३ समुद्रोदकांत. ४ ऋषिसमूह. ५ कमरेस. ६ भस्मशोभा.
७ दोऱ्यांत.

सवाई ॥ यापरिचे भवतापविमोचन चापशरांकित भव्यमती ।
पाहुनि सर्व नृपांहुनि उत्तम लाहुनि[1] तोष पुसे नृपती ॥
कोण असे महिपाळक बाळक हे जगचाळकसे सुचले ।
सांग मला सहसा गमनाशय चांग[2] मनासि मला रुचलें ॥ ८ ॥
हांसोनियां नृपसभे मुनिराज बोले ।
स्वानंदसंभ्रमभरें हृदयांत डोले ॥
हां जी नृपा बहुत भाग्य जगीं उदेलें ।
याच्या गुणें दुरित दैन्य समस्त गेलें ॥ ९ ॥
साकेताधिपबाळ हे रणतटीं रक्षोगणा काळ हे ।
दीनाचे कनवाळ हे प्रतिपदीं राया जगत्पाळ हे ॥
पुर्ते हे शुभलक्षणी रत सदा धर्मीं स्वसंरक्षणीं ।
आनंदाब्धि अनुक्षणीं भरतसे यांच्या कृपा-ईक्षणीं ॥ १० ॥
चापा नृपा आणि महोत्सवातें । आले पहाया बळवैभवातें ॥
मार्गीं अहिल्या विपिनांत रामें । केली शिळा मुक्त मनोभिरामें ॥ ११ ॥
परिसुनि मन राया दाटलें रामपायीं ।
म्हणति मनिं करावा सोयरा हा उपायीं ॥
कठिण तरि पणाचा व्यर्थ संकल्प केला ।
रघुवर नवरा हा धन्य या कन्यकेला ॥ १२ ॥

## पद

कोण तूझ्या मनास येतो सांग वो सीते ॥ ध्रुवपद ॥
पैलकुसुंबी दुस्तचि ल्याला ॥ बाई तो कै नव्हे ॥
पांघुरला नवरंगदुशाला ॥ बाई तो कै नव्हे ॥
विड्या घेत हडपेकर ज्याला ॥ बाई तो कै नव्हे ॥
माथां मंदिल झळकत शेला ॥ बाई तो कै नव्हे ॥
कोण तूझ्या मनास येतो सांग वो सीते ॥ १ ॥

१ पावुनि. २ चांगलें.

तो ऋषिमंडळिं दिव्य धनुर्धर ॥ तेव्हां न म्हणे नव्हे ॥
मेघश्याम अभिराम मनोहर ॥ तेव्हां न म्हणे नव्हे ॥
दाशरथी नृपराज धनुर्धर ॥ तेव्हां न म्हणे नव्हे ॥
आनंदात्मजसेव्य परात्पर ॥ तेव्हां न म्हणे नव्हे ॥ १ ॥
कोण तुझ्या मनास येतो सांग वो सीते ॥ २ ॥

श्लोक

चतुर म्हणविशी तूं बोलसी काय सीते ।
वरिन म्हणसि रामा मात हे कायसी ते ॥
बहुत दिवस बापें नेमिलें या पणातें ।
रघुपति पति होतो तो कसा आपणातें ॥ १३ ॥
ऐशी ते वदतां वधू मग पुढें कैशी कथा वर्तली ।
जैशी चंड मरुद्भरें वनतटी तैशी सभा नर्तली ॥
शंकाहीन मदें मदोद्धत महाहंकार ज्याचा भला ।
डंका दुंदुभि वाजवीतचि सभे लंकापती पातला ॥ १४ ॥

सवाई

दैत्य धुरंधर तो दशकंधर जो नृपगंधिरजास न साहे ।
मस्त समस्तहि मस्तक डोलवि हस्त गदांकित हालविताहे ॥
धीट सभांतरिं नीट रिघोनि अवीट बसे कवणासि न पाहे ।
ढाल फिरंग विशालधनूशर चालत चाळवि वीसहि बाहे ॥ १५ ।
व्यग्र नृपाळ समस्त सभेंत उदग्र दशानन लक्षितसे ।
वंदिति सर्वहि बंदि जसे परि नंदिसमान उगाचि बसे ॥
पर्वत संनिभ गर्वनिधी मग सर्व सभे पण काय पुसे ।
तो लघु नम्र सखोल सभापति बोलत बोल तया मृदुसे ॥ १६ ॥

श्लोक

या चापा एक बापा चढविल गुण जो पूर्ण आकर्ण राजा ।
हे कन्या त्याचि धन्याकृतिस निरविली साच त्याचीच भाजा ॥

लंकालंकार तेव्हां दशवदन वदे ऐक एकैक माजा ।
लीलेचा खेळ राया न पुरति सुर ते चंडदोर्दंडकाजा ॥ १७ ॥
दंतीं ज्यां देवदंती धरुनि मुरडिला शैल कैलास गाढा ।
घेतां हस्तीं समस्तीं कडकडति कडे काय ती काल्दाढा ॥
तेथें या कांबिटाचा गरिमगुण किती प्रौढिही कोण येणें ।
माझ्या गाजोनि भूजा म्हणति मज असा काय सायास घेणें ॥ १८ ॥
पाहीन डोळां नवरी वराया । आणा म्हणे रावण रावराया ॥
विदेह बोले जिणतां पणातें । वरील ते आपण आपणातें ॥ १९ ॥
लंकानायक सायकासन गुणीं सज्जावया सज्जला ।
तों सीता भयकंपिता, जन महाचिंतांबुधीं मज्जला ॥
झाल्या म्लानमुखी मनोरम सखी तो जों भुजा सांवरी ।
तों आकार विकार देखुनि उठे हाकार माडीवरी ॥ २० ॥
तो जेव्हां कडकावला धनुवरी ठेला उभा भूतसा ।
सीतेला धडका उठे निजमनीं कीं बोल्वेना तसा ॥
ते बोले पण कासयासि जनकें केला सख्यांनो असा ।
कैसें कारण काय कीं कटकटा आतां प्रयत्नीं असा ॥ २१ ॥

वीरासनीं कनककार्मुकबाणपाणी ।
टेंकूनि ढाल कर घालुनियां कृपाणीं ॥
जो बैसला द्विजगणांत कलानिधी तो ।
ज्यां आपण प्रणियला गुणवारिधी तो ॥ २२ ॥
रघुपतिजलधीतें मी नदी जाण वाहें ।
उचित म्हणुनि त्याचें वाक्यही आणवा हें ॥
जननिजनक कानीं गूज वो जाणवा हें ।
न तरि सखि न ठेवीं प्राण मी आण वाहें ॥ २३ ॥

हातें थापटिल्या भुजा मज असा नाहीं त्रिलोकीं दुजा ।
मेरूही मजशीं खुजा सुरवरीं आधींच माझी पुजा ॥
ऐसा जल्पुनि चापसाप उचलों जातां न हाले कदा ।
जैसा शैल मतंगजासि न ढळे पाहे विदेहात्मजा ॥ २४ ॥

विसां करींही धनु तें न तोले। न सांवरे यास्तव देह डोले ॥
भरें तयाच्या बहु खाय झोले। त्याही मधें रावण काय बोले ॥ २५ ॥
या भूपें पण जिंकिला उभविलें कोदंड चंडाकृती।
मद्दोर्दंड उदंड दंड करिती शाबास माझी धृती ॥
डोले बोलत बोलती न धरवे गेलाचि झोला भला।
आलें चाप अपाप त्यावरि उरीं तो भूतळा पातला ॥ २६ ॥
आला भूमितळासि गर्वपुतळा पिंजारुनी कुंतळा।
चापातें उखळावया बळ खळा नाहींच उच्छृंखळा ॥
सर्वांगींच कळा, विटे मुखकळा, झाल्या भुजा पोकळा।
वाजे ऊर गळा स्वदेह सगळा झिंजाडितां आगळा ॥ २७ ॥
निर्वीरा धरणी म्हणे वरधणी गोत्रूनि राजे पणीं।
ऐसा शब्द झणीं वदे नृपगणीं भू हे सुवीराग्रणी ॥
मेरूतें गगनीं झुगारिति जनीं आहेत ऐसें मनीं।
नेणे कीं अवनीपती म्हणतसे श्रीराम वीरासनीं ॥ २८ ॥
दे आज्ञा शिवसायकासनगुणीं योजीन मी आयका।
बोले वंदुनि पाय कामजनिता योग्यांचिया नायका ॥
आनंदें मुनिनाथ भेटुनि भुजीं स्पर्शोनि हस्तांबुजीं।
गर्जे हो जयवंत देवमनुजीं हो चोज या बाहुजीं ॥ २९ ॥
ऐसा मित्रकुलाब्जमित्र वदतां तो मित्रता लोभला।
विश्वामित्र म्हणे अमित्रदमना रामा भला रे भला ॥
होशी चंडपराक्रमी चतुरधी चंडांशुवंशोद्भवा।
त्वद्दोर्दंड अखंड होत विजयी घे कीर्तिच्या वैभवा ॥ ३० ॥

## चूर्णिका

विश्वामित्र म्हणे रामा, नूतननीलधाराधरश्यामा, ऋषिजनमनश्चकोरसोमा, सर्वसुरसार्वभौमा, परमसुदृढमृडकोदंडचंडाभिमानखंडनपांडित्य दाखवीं, सकळभुवनवीरद्विरदमुखीं अद्भुतेक्षुरस चाखवीं, क्षित्युद्भवरत्न जानकी संतोषवीं, लीलाभूषणीं कविवाग्वधूसि भूषवीं, सीतामुखशीतांशुरसपानचतुरचकोर व्हावया उठावें उठावें ॥ ३१ ॥

तेव्हां राजाधिराज, राजीवनयन, विराजमान, रघुराज, वीर शार्दूल उठावला, कार्मुकोपकंठ प्रांत पावला, जैसा उरगावरी पतगराज झेंपावला, गंभीर धीर भुजा थापटूनि लीलाबाल बालखेलनापरि कमठकठिणनीलकंठकमठा मुठीं मुठाळोनि वामकरें सधर सित शरासन ओढिलें, झंझारवें त्रिवार झाडिलें, किंकारध्वनिपूर्णतूर्ण आकर्ण ओढिलें, तंव मध्यभाग मोडोनि कडाडलें, तत्प्रतिध्वनिभरें गगन गडाडलें, भू तटतटीत, खटखटीत कृतांतदळ, दिग्गज डगमगित, फणिवर सचकित, थक्कित दिनकर शशधरादि तारामंडळ, बहु शंकित पंकजभव, खळबळित सुरासुरकुळ, डळमळित सत्यलोक पाताळ, वितुळत घनपटळ, चळचळ कांपत बळशील भूपाळ, लोकपाळ व्यथित असतां, भेरीदुंदुभीपटहकोहलादि नानाविधमंगलवाद्यें, नरलोकीं सुरलोकीं एक्याच काळीं धिमधिमायमान वाजतीं झालीं ॥ ३२ ॥

तंव मिथिलेश्वरचित्तजलाधिमाजि विस्मयानंदोर्मी माजली, भला भला म्हणोनि विश्वामित्र वाग्देवता गर्जली, सीता निजहृदयकमळीं असुखमुकुलता विसर्जली, संफुल्लसारसमुखी सखीमंडळी नयनकल्हारीं आल्हादली ॥ ३३ ॥

## श्लोक

रामें लोकाभिरामें मदनशतसमें पूर्णकल्याणधामें ।
लीलाभूभृल्ललामें तुकुनि शिवधनू वोढिलें पूर्णकामें ॥
वोढी घेतां तडाडी निबिड दशदिशीं घोष मोठा झडाडी ।
मध्यें भंगे कडाडी प्रतिनिनद नभीं मेघ जैसा गडाडी ॥ ३४ ॥

श्रीराम लक्ष्मणहि गौतमपुत्र राजा ।
गाधेय जानकि अशां न पिडी अवाजा ॥
हे मात्र सावध सहा, इतरां जिवांसी ।
मूर्छा जडे, विकळ ते पुरदेशवासी ॥ ३५ ॥

सीतेला स्मरसा धनूसि हरसा राजां दिसे वीरसा ।
मूढांला नरसा जनां नृवरसा भक्तांसि माहेरसा ॥
देवां ईश्वरसा रिपूंसि गरसा ज्ञात्यांसि चित्सारसा ।
ऐसा सर्व रसांसि हेतु परिसा जो सूर्य हृत्सारसा ॥ ३६ ॥

आनंदें अळुमाळ लक्षित पदा वेल्हाळ त्या अंगणीं ।
लज्जानम्र मदालसा चमकतां कोल्हाळ भूपांगणीं ॥
हांसे मंद अनालसी अलिकुलस्तोमालका मंगळा ।
रंगीं भव्यतमालनीलविभुच्या ते माळ घाली गळां ॥ २७ ॥

॥ **चूर्णिका** ॥ ते करांबुजीं मधूकमालिका, घेऊनि अंबुजनयना विदेहबालिका, कंदर्पास रतीपरी; कीं कंदर्परातीस दाक्षायणीपरी, कीं निर्जरनाथासि इंद्रायणीपरी, कीं सत्यलोकनाथासि सावित्रीपरी, कीं जगद्व्यापिनारायणासि लक्ष्मीपरी, श्रीरामासमीप पातली, तन्मनोहरमाला कंधरीं घातली, तंव नानाविध वाद्यवादन विलासकुतूहल कुसुमवर्ष आनंदध्वनि करोनि सीतारघुनंदनमहिमा त्रिलोकीं लोक जयजयकारें गर्जती ॥ ३८ ॥

## लवकुशाख्यानांतील श्लोक

तें यज्ञकंकण करांबुजिं राघवातें ।
शत्रुघ्न ते भरत बांधिति नीज हातें ॥
सोडूनि भूमिवरि त्या मग शामकर्णा ।
झांकी रवी नयन देखुनि कांतिवर्णा ॥ १ ॥
श्रीराम वंदुनि सहोदर ते निघाले ।
वाजीगजारुढ रथीं दळभार चाले ॥
पादाति चालति नव्हे गणना तयांची ।
कीं काढिली वरुनि कांति हिमालयाची ॥ २ ॥
तो शामकर्ण मग चालतसे पुढारां ।
लोपी नभीं दिनकरा चमुचा धुळोरा ॥
सोडूनियां चमु तुरंगम तेजराशी ।
आला त्वरेंकरुनि वाल्मिकिआश्रमासी ॥ ३ ॥
तेथें क्रिडा करितसे लहु बाळवेशें ।
गेला असे वनफळां कुश तो अवेशें ॥
त्या बाळकाजवळ अग्रज तो नसोनी ।
पाहे हयासि मन निर्भयते करूनी ॥ ४ ॥

## चामर वृत्त

अश्व देखतांचि बाळकासि चोज वाटलें ।
रुक्मरत्नभूषणें म्हणे कसें सुशोभिलें ॥
ते क्षणींच देखिली शिरीं सुवर्णपत्रिका ।
पाहि बाळ वाचुनी बहूत अर्थ नेटका ॥ ५ ॥

सूर्यवंशि राघवें तुरंग हाचि सोडिला ।
यासि जो धरी बळें नृपांत वीर आगळा ॥
सैन्य हें करील युद्ध सोडिना तयावरी ।
मीच राम येउनी करीन शत्रुमोहरी ॥ ६ ॥

पत्रिकार्थ पाहुनी लहूकुमार हांसला ।
सोडुनी करांबुजें चुरा करोनि टाकिला ॥
अश्वकंठिंची करें सुरत्नमाळ काढिली ।
जानकीसुनंदनें गळ्यांत शीघ्र घातली ॥ ७ ॥

तुरंगकंठ वेष्टुनी सुरम्य वस्त्रपल्लवें ।
कर्दळीवनांत आणुनी तयासि गौरवें ॥
बांधुनी रणांगणांत संगरासि ठाकला ।
अश्व तो न देखतांचि सैन्यभार लोटला ॥ ८ ॥

अश्वरक्षपाळ येउनी कुमार पाहती ।
चाप सज्जुनी उभा लहान फार आकृती ॥
दीसतो कुमार हा जसा सकाळचा रवी ।
धाकुटा परंतु हावभाव फार दाखवी ॥ ९ ॥

## कामदा छंद

एक जाउनी सांगती सिते । अनर्थ मांडिला तूझिया सुतें ॥
कर्दळीवनीं अश्व बांधिला । त्यानिमित्त सैन्यभार लोटला ॥ १० ॥

प्रार्थिलें अम्ही बाळकोत्तमा । देइं सोडुनी या तुरंगमा ॥
नायकेच तो हट्ट मांडिला । चाप सज्जुनी बाण लाविला ॥ ११ ॥
येणें कां उगें हयासि बांधिलें । रावणारिशीं वैर लाविलें ॥
सैन्य येउनी लुटिल आश्रमा । नारिबाळकें पावती श्रमा ॥ १२ ॥

### श्लोक

रुदन ते करितसे जनकात्मजा । कुमति हे उपजली कशि आत्मजा ॥
तुरग बांधुनी जिवावरि ऊठला । पडतसे जननि होउनि व्याकुला ॥ १३ ॥
कासया धरियला हय तो तुवां । काय होय न कळे तुझिया जिवा ॥
येरु वीनवि तुझा सुत मी जरी । सैन्य कां करिं न संगरिं मोहरी ॥ १४ ॥

### सवाई

एक गजावरि एक हयावरि एक रथावरि बैसुनि आले ।
घालुनियां कवचें धरुनी बरच्या करिं सेवक पेलिति भाले ॥
गर्जति वीर धुधाट समीरण ते रणधीर उताविळ झाले ।
वस्त्र सवारुनि शस्त्र विकल्पुनि अस्त्रहि मंत्रुनि युद्धिं निघाले ॥ १५ ॥
तुंबळ सैन्य विलोकुनियां लहुशीं मग तो मुनि वाल्मिकि बोले ।
हे चमु फार लहू सुकुमार तुं राहिं उगा तुजलागिं न तोले ॥
येरु वदे चमु मारिन आज ऋषी तुमचे निववीन मि डोळे ।
ऐकुनि शब्द ऋषी मग स्तब्धचि होउनियां हृदयांतरिं डोले ॥ १६ ॥
वंदुनियां ऋषि माय पदांबुज, ओढुनि कार्मुक बाहिर नीघे ।
सैन्यसमुद्र विलोकुनि दृष्टिस भूजनुपासुनि धांवत वेगें ॥
छेदितसे परवीरशिरें उडवी नभिं सोडुनि बाण अमोघे ।
येरिकडे चमुमाजि उताविळ दाशरथी निघडे रणिं दोघे ॥ १७ ॥
देखुनियां अतिभार विलोकुनि वाल्मिकि सांगतसे लहुवातें ।
संनिध साह्य नसे कुश तो तुज यास्तव सोडुनि दे तुरगातें ॥
येरु म्हणे मज साह्य कृपा तुमची मग काय असे भय मातें ।
धन्य म्हणे ऋषि जानकिच्या कुशिं जिंकुनि ये रिपुसी निज हातें ॥ १८ ॥

बोलतसे शुभवाक्य ऋषीश्वर हो विजयी रणिं तूं लहुबाळा ।
त्यावरि युद्ध करी समरांगणिं पाहतसे भरतानुज डोळा ॥
प्रेरुनियां रथ गर्जतसे म्हणे हें मज दाविशि कौतुक काळा ।
खेळसि अग्निसवें लहु केंवि तुं ओढिसि पुच्छ धरूनि सुव्याळा ॥ १९ ॥

## श्लोक

बोले लहू त्या भरतानुजासी । मी धाकुटा अद्भुत रे तुम्हांसी ॥
भक्षी जसा तो वडवाग्नि सिंधू । कीं तो करी हस्ति अगास्ति बिंदू ॥ २० ॥
ऐकोनी शब्द त्याचे मग निजवदनें काय शत्रुघ्न बोले ।
पृथ्वीमाजी न दीसे लहुसम परि हा मीपणें फार डोले ॥
शिक्षा मी यासि लावूं परि लघु मुल हें काय होईल कीर्ती ।
यालागीं स्तब्ध झाला मग लहु उठला संगरा शूरमूर्ती ॥ २१ ॥
सांभाळीं बाण माझा मग रघुपतिचें नाम गर्जोनि कर्णीं ।
ओढोनी सोडि तेव्हां गगन गडगडी जेंवि वीजा सुवर्णी ॥
जाती झांकोनि डोळे पडत हय तळीं वीर मूर्छीत प्राणें ।
शत्रुघ्ना थोर चिंता मृतिसमयिं म्हणे रक्षिजे राघवानें ॥ २२ ॥
आतां या पाठि देऊं निजमुख फिरवूं अग्रजा काय दावूं ।
मारूं हा तीव्रबाणें जरि मज न मरे संगराशीं समावूं ॥
तेव्हां तो बाण सोडी गगन परवडी जाहले लक्ष कोडी ।
देखोनी जानकीचा तनय भुजबळें बाण बाणेंचि तोडी ॥ २३ ॥

## कामदा छंद

भूमिजे ऋषीकुमार सांगती । तूझिया सुतें मारिले किती ॥
शस्त्रि अस्त्रि तो अजिंक जाहला । मल्लसंगरीं बंध पावला ॥ २४ ॥
बांधुनी तया रथींच घालुनी । वीर गच्छले सैन्य घेउनी ॥
वृत्त ऐकतां जानकी रडे । वक्ष भाळ तें पिटुनियां पडे ॥ २५ ॥
शोक ते करी रामअंगना । दाखवा म्हणे शीघ्र नंदना ॥
यावरी कुठें पाहुं लेंकरूं । एकली वनीं काय मी करूं ॥ २६ ॥

## चामर वृत्त

असें ऋषी वदे मुखें अचिंत राहि तूं सुखें ।
कुमार पैल पातला दुरून कूश कौतुकें ॥
कुशासि देखुनी सिता रडोनि आळवी शुरा ।
कुमार होय घाबरा पुसे नमूनि सुंदरा ॥ २७ ॥
वृतांत सर्व सांगती लहूचें युद्ध वानिती ।
निदानिं बंध पावला म्हणोनि त्या अमानिती ॥
सुसैन्य तेंचि ओसरे परंतु जानकी झुरे ।
बहूत आम्हि सांगतों रडों नको कृपा करे ॥ २८ ॥

## श्लोक

नेला असेल जरि बाळ महीतळीं तो ।
वोढूनि काढिन बळें स्वकरें गडी तो ॥
मारीन पन्नग मि फोडिन शेषटाळू ।
भूगोल हा उलथितां मज नाहिं वेळू ॥ २९ ॥
वैकुंठनाक उलथूं शिवशैल हातें ।
दिक्पाल अष्ट बुडवूं उदधींत माते ॥
तीं किंकरें मजपुढें लहु काय नेती ।
मारूनि त्यांसि रणिं आणिन पाहिं छाती ॥ ३० ॥
माता म्हणे न वधिं कैकयि-आत्मजांसी ।
बांधोनियां रथिंच घालुनि आण त्यांसी ॥
जा शीघ्र सोडविं सहोदर येश घेईं ।
ऐकोनि ठेवि कुश मस्तक मायपाईं ॥ ३१ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 30071 वि. काव्य
ओ. क्र. 1626 नों. दि. 20/10/69

## घनाक्षरी

देखतांचि कूश वीर, लहू रथीं धरी धीर, जेंवि सूटतां समीर, नीरदांस माळवी ॥ १ ॥ युद्ध द्यावया उदार, रणीं करी शरमार, रविकुळीं अवतार, धरी रिपू खाल्वी ॥ २ ॥ सैन्यामाजि हाहाकार, झाला वीरघोष फार,

आतां कैचें घरदार, नाहीं थार जावया ॥ ३ ॥ हाय बोलती वदनिं, विघ्न आलें हें कोठूनि, कोण्हीं जावें रणांगणिं, यासिं सम व्हावया ॥ ४ ॥ ३२ ॥

कुश म्हणे रे शत्रुघ्न, थोर होशि रे कृतघ्न; करूनियां थोर विघ्न, लहू बाळ आणिला ॥ १ ॥ आतां करूं दंत भग्न, बाणिं लावूं तुझें लग्न, दुःखसिंधुमाजि मग्न, होसि प्राणावेगळा ॥ २ ॥ बहू झालासि तूं शेर, आतां करीन मी जेर, सैन्य झाडूं जैसा केर, टाकूं मेरूपाठारीं ॥ ३ ॥ टांग धरूनि गगनिं, तुज झोंकूं फीरवूनि, स्वर्ग दाखवूं नयनिं, याचि क्षणामाझारीं ॥ ४ ॥ ३३ ॥

### कामदा छंद

युद्ध तें तुम्हीं कधिं न देखिलें । म्हणुनि राघवें तुम्हांसि धाडिलें ॥
भ्याड ते तुम्ही ठावके मला । मान्य तो नव्हे याग मांडिला ॥ ३४ ॥

### उपेंद्रवज्रा

पवित्र रामायण वाल्मिकानें । जें वर्णिलें तें परिसा द्विकानें ॥
झाला यशस्वी सुत जानकीचा । न सोडणें अर्थ पुढें कथेचा ॥ ३५ ॥

## कवि रामजोशी

### लावणी

श्रीसांबाच्या समान दैवत, न त्रिभुवनिंही दुजें ॥ सुरांचें मंडळ याहुनि खुजें[१] ॥ धृ० ॥ वरकड म्हणविति देव सुरांतिल महादेव हा खरा ॥ भवार्णवलीला ऐकुनि तरा ॥ विचित्र भूषण पहा जयाच्या शिरिं गंगेचा तुरा ॥ ललाटीं चंद्रतिलक साजिरा ॥ स्वीकृत ज्याणें अस्त्रीकृतहरि[२] मारी त्रिपुरासुरा ॥ सुरांचा करुनि मनोरथ पुरा ॥ पहा कशी हे विचित्र लीला जाळुनि रतिच्या वरा[३] ॥ कवळिली अर्धांगीं सुंदरा[४] ॥ कुंडल युग कुंडलीश[५] कर्णीं झाला कंकण खरा ॥ नांदतो करुनि नगाच्या घरा ॥ काळकूट विष जाळित सुटलें जें ब्रह्मांडोदरा ॥ हाचि घे त्या तैशाही गरा[६] ॥ चाल ॥ या कर्में भोळा न म्हणा विद्योत्तमा ॥ किति राजनीतिची यांत दाविली शिमा ॥ हें दारुण विष यास्तव शिरिं धरि

---

१ लहान. २ विष्णूचा बाण केला ज्यानें. ३ मदनास. ४ पार्वती. ५ शेषवासुकी.
६ विषास.

चंद्रमा ॥ रिपु मदन विषाचा करितां आंगीं उमा[1] ॥ हे प्रळयाग्नीवरि ठेवी सरिदुत्तमा[2] ॥ चाल पहिली ॥ अगाधकृत्यें अशीं न कोणीं केलीं देवें दुजें ॥ करावीं पिनाकविलसद्भुजें ॥ १ ॥

## लावणी

अमोल काया जाइल वाया ॥ जशी कांच कीं फुटे फटकन् ॥ उभा काळ विक्राळ लक्षितो ॥ वेळ होय सावध झटकन् ॥ धृ० ॥ कृतिं त्रतीं द्वापारीं होती आयुष्याची बहुभरती ॥ कलीमाजि शतवर्षें नेमिलीं ॥ परि तींहि न होती पुरतीं ॥ बारा चौदा पंध्रा विंशति पंचविसांमधिं किति मरती ॥ मागें मेले पुढेंहि मरतिल कोण करिल त्यांची गणती ॥ आजा काका मामा मेला त्यांची साक्षी ध्या चित्तीं ॥ त्यांचे शोकें दुःखित झाला ॥ पुढें तुम्हांला तीच गती ॥ देह आपला जाइल यास्तव धरा साये कांहीं झटकन् ॥ समय पातल्या उशिर न लागे ॥ गिळिल काल येउनि गट्कन ॥ १ ॥ अमोल० ॥ हत्ती घोडे महाल खजीना ॥ कोणाची मंदिरमाडी ॥ शेवटिं जाइल कांहीं न राहिल ॥ काय धरुनि तीची गोडी ॥ तारुण्याच्या भरें घालशिल विषयामधिं दाटुन फुगडी ॥ अहा रांडेच्या समय कठिण मग जेव्हां काळ करकर रगडी ॥ सुंदर सुंदरि रंभा जैशी तिची मनामधिं बहु अवडी ॥ जबरदस्त हा पाश स्त्रियेचा ॥ जशी कवाडा कुलुपकडी ॥ या भवसागरिं मायामगरी पाय धरुनि ओढी मट्कन ॥ जशि नंगी समशेर देहिचे तुकडे तुकडे करि कट्कन ॥ २ ॥ अमोल काया० ॥

## लावणी

चराचरीं गुरु तरावयाला नरा शिरावरि हरी ॥ जरा तरि समज धरीं अंतरीं ॥ हटातटानें पटा रंगउनि जटा धरिशि कां शिरीं ॥ मठाची उठाठेव कां तरी ॥ वनांत अथवा जनांत हो कां मनांत व्हावें परी ॥ हरीचें नाम भवांबुधिं तरी ॥ चाल ॥ काय गळ्यांत घालुनि तुळशीचीं लांकडें ॥ हीं काय भवाचें दुर करितिल सांकडें ॥ बाहेर मिरविशी आंत हरिशिं वांकडें ॥ चा० प० ॥ अशा

१ भडका. २ गंगा.

भक्तिच्या रसारहित तूं कसा म्हणविशी सुधा ॥ हरिरस सांडुन घेशी दुधा ॥ भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयीं बुधा ॥ धरिशि तरि हरिचा सेवक सुधा ॥ १ ॥ जाळ गळ्यामधिं माळ कशाला ॥ व्याळ काम कोपला ॥ आंतुनि बाहेर म्हणविशी भला ॥ वित्त पहातां पित्त येतसे चित्त पाहिजे मला ॥ असें हरि म्हणतो नुमजे तुला ॥ दांभिक वर संभाविक अभ्यंतरिं नाहीं बिंबला ॥ बहिर्मुख नर नरका लाधला ॥ चा० ॥ तूं पोटासाठीं करिं खटपट भलतिशी ॥ परि भक्तिरसाविण हरि भेटल काय तुशी ॥ काय मौन धरुनियां गौमुखिला जाळिशी ॥ चा० प० ॥ स्वार्थसुखें परमार्थ बुडविला अनर्थ केला मुधा ॥ न जाणसि कांजी म्हणसी सुधा ॥ २ ॥ भला जन्म० ॥

## लावणी

एक सज्जना अरे मनमोहना संपत् पाहतां कवणाची ।
जाइल काया जाइल माया उसणी आणिली पांचांची ॥ ध्रुवपद ॥
कौरव गेले पांडव गेले वदली वाणी व्यासाची ।
छप्पन कोटी यादव गेले काया उरली कृष्णाची ॥ १ ॥
रावण ज्ञानी तो अभिमानी खंडें केलीं वेदाचीं ।
तेहतिस कोटी बंदि घातले घडिघडि त्यांला तो जाची ॥ २ ॥
सूर्यवंशीं राम जन्मला केवळ माय भक्तांची ।
हनुमंतानें अब्धि लंघिला नगरि जाळिली सोन्याची ॥ ३ ॥
चापपाणी बाण वर्षे कुडी पाडिली बा त्याची ।
रावणाचीं शिरें मोकळीं काग हो त्यांला टोंची ॥ ४ ॥
अठ्ठ्याऐंशी हजार ऋषिवर वार्ता हो मार्कंडेयाची ।
चौदा कल्पें उष्ण सोशिलें नाहीं छाया गुंफेची ॥ ५ ॥
लोमहर्षणा लोम झडे तैं संख्या पुरे आयुष्याची ।
ऐसे ऐसे होउनि गेले काय कथा हो अणिकाची ॥ ६ ॥
कितीक येती कितीक जाती घिरटी होते काळाची ।
ज्याचे गांठीं पुण्य नाहीं यम हो त्याला बहु जाची ॥ ७ ॥

सावध व्हावें भजन करावें भक्ति करावी देवाची ।
आतां तरि ही गोष्ट आयका नारायणा श्रीरंगाची ॥ ८ ॥
ऐक सज्जना अरे मनमोहना संपत् पाहतां कवणाची ० ॥

## कितीएक कवींचीं पदें

### पद १

कृपाघना तुज कां न ये करुणा । शुकसनकादिक वंदिति चरणां ॥ कृ० ॥ ध्रु० ॥
उत्कंठा मनिं पाय पहाया । लागलि निशिदिनिं जगदाभरणा ॥ कृ० १ ॥
अंतरिंचा तूं जाणसि आशय । पूर्ण करिसि कधिं अघसंहरणा ॥ कृ० २ ॥
ध्यानभजन मी कांहिंच नेणें । दास म्हणवितों, पतितोद्धरणा ॥ कृ० ३ ॥

### पद २

कृपाघन भक्तीं आकळिला । कृपाघन ० ॥ ध्रु० ॥
नक्र धरि करी, करि स्मरणातें । ऐकुनि कळवळला ॥ कृ० १ ॥
प्रल्हादास्तव प्रकटुनि स्तंभीं । दानव निर्दळिला ॥ कृ० २ ॥
अर्जुनरथिं सारथ्य करी जो । निजपद दे बळिला ॥ कृ० ३ ॥
रुक्मिणिनें एकें तुळसिदळानें । गिरिधरप्रभु तुळिला ॥ कृ० ४ ।

### पद ३

ऐसा गे माय कैसा हा योगी । ज्या ठायीं जन्मला तो ठाव भोगी ॥ ऐ० ॥ ध्रु०
माय कुमारी बाप ब्रह्मचारी । तरी एकवीस पुत्र जाहले उदरीं ॥ ऐ० ॥ १ ॥
आचार सोडोनि झालासे भ्रष्ट । मावशीशीं जेणें लावियला पाट ॥ ऐ० २ ॥
आणीक याचें नवल सांगूं मी काई । येणें बहिणी भोगियेल्या येके ठायीं ॥ ऐ० ३ ॥
ज्ञानदेव म्हणे हें अनुभवीं जाणें । अनुभवावांचोनी कांहींच नेणें ॥ ऐ० ४ ॥

### पद ४

मुळींच हें नाहीं हें नाहीं । अनादिसिद्ध मि पाहीं ॥ ध्रु० ॥
माया साच असावी । मग त्यां विवेकें निरसावी ॥ मु० १ ॥
भवरोगिष्ट असावें । मग त्यां रामरसायण घ्यावें ॥ मु० २ ॥

अभाव असावा गांठीं । मग म्यां भाव धरावा पोटीं ॥ मु० ३ ॥
निजरंगीं रंगला । अपुल्या उगमीं संगम झाला ॥ मु० ४ ॥

## पद ५

अरे तूं भुलूं नको रे नटूं नको । स्वहिता अंतरशील ॥ ध्रु० ॥
देह हा पांचांचा पांचांचा । पांचजण नेतील ॥
जिव हा अज्ञानी तयाला । याम्यदूत नेतील ॥
हिशोब पापाचा पुण्याचा । चित्रगुप्त घेतील ॥
केल्या कर्मांचें फळ बापा । अवश्य ते देतील ॥ अरे० १ ॥
राहें लीनपणें बा सर्वांशीं । जैसें पातळ तोय ॥
वेदशास्त्राच्या उपदेशें । निरभिमानी होय ॥
क्षमा आत्मत्वीं धरावी । अबोलणी जनिं होय ॥
विवेकविचारें शिकावीं । संतजनाची सोय ॥ अरे० २ ॥
वैभव जायाचें बा जायाचें । पापबळें जाईल ॥
सत्ता श्रीहरिची बा देवाची । हरी हिरुनि नेईल ॥
होईं सावध रे सावध रे । तरिच बरें होईल ॥
क्षेम कल्याण कल्याण । अमृतेश्वर देईल ॥ अरे० ॥ ३ ॥

## पद ६

मज कळत नाहीं । कोण मी ॥ ध्रुवपद ॥
नर म्हणों तरी नारीच भासे । नारी म्हणों तरी समूळ विनासे ॥ १ ॥
स्थूळ म्हणों तरी सूक्ष्मची असे । सूक्ष्म म्हणों तरी कांहींच न दिसे ॥ २ ॥
दास म्हणों तरी रामची आहें । राम म्हणों तरी नाम न साहें ॥ ३ ॥

## पद ७

दासाचा हा ऋणी विठोबा । दासाचा हा ऋणी ॥ ध्रु० ॥
धर्ममखीं जो काढी उष्टीं । निर्जरचूडामणी ॥ विठोबा० ॥ १ ॥
पार्थरथीं जो सारथि होउनि । धूत हयांतें रणीं ॥ वि० ॥ २ ॥

नंदवधू करि बंधन दावें। सोशितसे शिशुपणीं ॥ वि० ॥ ३ ॥
गोपव्रजीं चारूनि गोधनें। बांधितसे गोठणीं ॥ वि० ॥ ४ ॥
दामाजीस्तव नीचवेष धरि। द्रव्य देत पुरवणी ॥ वि० ॥ ५ ॥
अमृतराय कवि जीवित निर्मळ। दीनजना रक्षणीं ॥ वि० ॥ ६ ॥

## पद ८

पदरीं धरुनी हरी आणा गे बाई ॥ ध्रुवपद ॥
जाऊनियां यमुनेस्थळीं। खेळतसे चेंडूफळी।
तोचि पहा वनमाळी। चतुर शहाणा गे ॥ पदरीं० ॥ १ ॥
शिरीं बांधोनियां चिरा। खोंवी मोतीयाचा तुरा।
वरी झळकतो हिरा। अमोलीक दाणा गे ॥ पदरीं ॥ २ ॥
मत्स्यकूर्म नानापरी। दशविध रूपें धरी।
अमृताचा साह्यकारी। तोचि हरी जाणा गे ॥ पदरीं० ॥ ३ ॥

## पद ९

विठोबा राहीना राहीना। जातां जनिच्या घरा ॥ ध्रु० ॥
नामदेवाची देवाची। जनि दासी प्रेमळा।
अरती सेजेची होतांची। देती सांखळखिळा।
कुलपें जैशींची तैशींची। कैसा जातो भला।
जपणी लागोनी बैसोनी। कोणि धरूं पाहिना ॥ विठोबा० ॥ १ ॥
जनिच्या घरिं जातां घरिं जातां। देवाचे उपचार।
वाकळ शेजा त्या, बाजा त्या। तृणझोंपडिचें घर।
तेथें दिप नाहीं दिप नाहीं। कांबेटीचें दार।
ऐसा आनंदें स्वानंदें। काम करी भागेना ॥ विठोबा० ॥ २ ॥
दळितो कांडीतो कांडीतो। जनिचीं लुगडीं धुतो।
फार श्रमलीस म्हणवोनी। चौंहातीं रगडितो।
कळण्याकोंड्याची कोंड्याची। भाकर तिचि भक्षितो।
त्रिकाळ सुग्रास नैवेद्य। पक्वान्नें सेविना ॥ विठोबा० ॥ ३ ॥

रात्रौ जाऊनी नेऊनी । पितपट कोणा दिला ।
हर्षे घेऊनी येऊनी । वाकळ पांघूरला ।
बडवे म्हणती बा श्रीरंगा । शोभा आली तुला ।
तार्किक म्हणती रे, म्हणती रे । जनिवांचुनि होइना ।। वि० ।। ४ ।।
ऐसें किति वेळां किति वेळां । वाकळ घेउनि अला ।
पितांबर मोलाचा मोलाचा । नेउनि देतो तिला ।
याला कुळ नाहीं रुप नाहीं । दासीसीं लागला ।
मी तो देव कीं मानव कीं । विचारून पाहिना ।। विठोबा० ।। ५ ।।

## पद १०

गड्यांनो कृष्ण गडी अपुला । यमुनाडोहीं बुडाला ।। ध्रु० ।।
काळिया डसेल कृष्णाला । होइल विषबाधा त्याला ।
हाका मारी अपुल्याला । तुम्ही कां स्वस्थपणें बसलां ।
आतां कोण काढिल त्याला । यमुनाडोहीं बुडाला ।। ग० १ ।।
गाई त्याविण हंबरती । वासुरें स्तनपान न करिती ।
यापरि गोप सर्व रडती । मुखानें कृष्ण कृष्ण म्हणती ।
आतां काय भेटेल अपुल्याला । यमुनाडोहीं बुडाला ।। ग० २ ।।
यशोदा पुसेल जरि हरिला । तरि मग काय सांगुं तिजला ।
नंद मज म्हणेल त्वां नेला । हलधर मारिल रे मजला ।
आतां काय जावें गोकुळाला । काळजी प्रेमाबाईला ।। गड्यांनो ३ ।।

## पद ११

वेडीपीशी झालें, पूर्ण निमालें । नामसुधारस प्यालें गे बाई ।। ध्रु० ।।
सद्गुरुवचनें, भेदुनि गेलें । माझें मीपण नेलें गे बाई ।। १ ।।
मस्तकिं हस्तक, ठेउनि अपुला । आपण ऐसें केलें गे बाई ।। २ ।।
आदिनारायण, अंकित झाला । समूळ पातक गेलें गे बाई ।। ३ ।।

## पद १२

संतपदाची जोड । दे हरि संतपदाची जोड ॥ ध्रु० ॥
संतसमागमें आत्मत्वाचा । सुंदर उगवे मोड ॥ दे०॥ १ ॥
सुफलित करुनी पूर्ण मनोरथ । पुरविशि जिविंचें कोड ॥ २ ॥
अमृत म्हणे रे हरिभक्ताचा । शेवट करिसी गोड ॥ दे हरि० ॥ ३ ॥

## पद १३

सज्जन आवडती । ते मज सज्जन आवडती ॥ ध्रु० ॥
शत्रुमित्रसम मानापमानीं । शीत उष्ण सहती ॥ ते० ॥ १ ॥
द्वैताविरहित श्रुतिवरि भावो । निरहंकाररती ॥ ते० ॥ २ ॥
सुखदु:खीं मन लिप्त नव्हेची । सच्चित्सुखप्राप्ती ॥ त० ॥ ३ ॥

## पद १४

स्मर हरमानसमोहन राम ॥ ध्रु० ॥
दशरथनंदन, दशमुखअंतक । अयोध्यापति श्याम ॥ स्मर हर० ॥ १ ॥
जानकिप्रियकर, वानरस्वामी । भक्तजनसुखधाम ॥ स्मर हर० ॥ २ ॥
ऋषिमखपालन, बंधविमोचन । दास करी निष्काम ॥ स्मर हर० ॥ ३ ॥

## पद १५

ज्याचे वंशीं कुळधर्म रामसेवा । त्याचे वंशीं मज जन्म दे गा देवा ॥ ध्रु० ॥
ज्याची वाणी रंगली रामनामीं । त्यासीं मजसीं संवाद घडो स्वामी ॥ १ ॥
वारंवार विनंती परिसावी । दयासिंधूची पूर्णकृपा व्हावी ॥ २ ॥
म्हणे उद्धवचिद्धन महाराजा । रामदासा संग घडो माझा ॥ ३ ॥ ज्याचे० ॥

## पद १६

भुलला रे भुलला रे प्राणी भुलला या आभासा रे ।
आत्मकळा न कळे भ्रमला नर व्यर्थ पराक्रम गेला रे ॥ ध्रु० ॥
श्रुतिपारायण शास्त्र सुभाषित उत्तम पंडित झाला रे ।
योगकळा सकळा अनुलक्षित वायु समग्रहि प्याला रे ।
भूतभविष्य गमे समयीं यमनियमहि वश्य तयाला रे ॥ आत्मकळा न कळे० ॥१॥

आचरला तप सर्वहि उत्तर दक्षिण मानस केलें रे ।
योगक्रियाविधि तें विधिपूर्वक मंत्राराधन झालें रे ।
आगम साधुनि शक्ति उपासुनि वैदिक सिद्धिस नेलें रे ॥ आत्म० ॥ २ ।
आसन घालुनि अंतरिक्ष रविमंडळ भेदुनि राहे रे ।
बोधक शक्ति बृहस्पतिसदृश विक्रम शक्र न साहे रे ।
साधकबोधक सर्व सुचे पुरुषार्थहि त्रैविध पाहे रे ॥ आत्म० ॥ ३ ॥
क्रूरतपें अति आचरला कळिकाळहि दृष्टिस नाणी रे ।
शूरपणें अमरावति जिंकुनि सत्वर अमृत आणी रे ।
वाक्य वृथा न वदे सहसा विधि सभ्य अनश्रुत वाणी रे ॥ आत्म० ॥ ४ ॥
नित्यानित्य विचार विलोकुनि शुद्ध विराग धरावा रे ।
भावबळें गुरुराजपदांबुजिं आश्रय पूर्ण करावा रे ।
रंग अभंगचि जनिं निजनिश्चय मीपणहेत हरावा रे ।
नेति मुखें श्रुति येथुनि तन्मयशब्दीं निशब्द वरावा रे ॥ भुल्ला० ॥ ५ ॥

## पद १७

अर्जुना तूं जाण रे । होशील सुजाण रे ।
विश्व नाहीं मीच आहें सख्या तुझी आण रे ॥ ध्रु० ॥
तंतूमाजी पट रे । मातीमाजी घट रे ।
माती तंतू निर्धारितां कैंचा घटपट रे ॥ अर्जु० १ ॥
आडापोटीं खर्व रे । मजमाजी सर्व रे ।
नमी त्यांतें न ते मज पाहें हें अपूर्व रे ॥ अर्जु० २ ॥
हेमी आळंकार रे । पाण्याची ते गार रे ।
हेम पाणी पाहूं जातां कैंचा तो आकार रे ॥ अर्जु० ३ ॥
राजविद्या गूज रे । सांगतसें तूज रे ।
कलीयुगीं वामनासी देणें हेंची मज रे ॥ अर्जु० ४ ॥

## पद १८

आग्रहो जरि ऐसा । देव भेटेल कैसा । ध्रु० ॥
मी एक पंडित । मी एक गायक । मी एक ज्ञानी लैसा ॥ १ ॥
मर्द असें संसार कराया । मेळवुनी बहु पैसा ॥ २ ॥
आत्मचरित्रें लोकांमध्यें । व्हावी फार प्रशंसा ॥ ३ ॥
अमृत म्हणे तूं लीनपणानें । राही पाणी तैसा ॥ ४ ॥

## पद १९

बरें म्हणुनि घेई । जनामधिं बरें म्हणुनि घेईं ॥ ध्रु० ॥
धनविद्येचा गर्वभार तूं । नको धरूं डोईं ॥ जना० १ ॥
परधनदाराअभिलाषातें । नको अणूं हृदईं ॥ जना० २ ॥
कुटुंबभरणासाठीं भल्तें । करूं नको कांहीं ॥ जना० ३ ॥
थोडाबहु उपकार दिनावर । करि तूं ल्वलाहीं ॥ जना० ४ ॥
मान अहंता सोडुनि मुंगी । हो साकर खाईं ॥ जना० ५ ॥
नारायणसंत गुरुचरणावरि । संतत शिर वाहीं ॥ जना० ६ ॥

## पद २०

क्षणभंगुर संसार । गड्यांनो क्षणभंगुर संसार ॥ ध्रु० ॥
मानवदेहीं येउनि जन्मा । पूर्ण करा सुविचार ॥ ग० १ ॥
धनविद्येच्या गर्वाचा कां । माथां घ्यावा भार ॥ ग० २ ॥
इहलोकींचे तुच्छ मनोरथ । तेहि न पडती पार ॥ ग० ३ ॥
ऐहिक विषयासाठिं कशाला । फिरतां दारोदार ॥ ग० ४ ॥
माझें माझें म्हणतां त्याचा । कोण करिल अधिकार ॥ ग० ५ ॥
धनसुतदारासक्त न व्हावें । जाणा सर्व असार ॥ ग० ६ ॥
गुरुचरणाला शरण रिघावें । तोच खरा आधार ॥ ग० ७ ॥
नारायणसुत विनवी गुरुविण । कोण करिल उद्धार ॥ ग० ८ ॥

## पद २१

कैसेंही कीर्तन करितां। कल्याण बरवें आहे ॥ ध्रु० ॥
वाल्मिकि उफराट्या नामानें। पावत झाला वक्ता मानें।
पतितपुत्राच्या अभिधानें। तरला संसार ल्वलाहें ॥ १ ॥
शुका पढवीतां पापिणी। केला परमात्मा तो रिणी।
चढली वैकुंठा कुंटिणी। केवढें कौतुक हें पाहें ॥ २ ॥
शुद्धा बुद्धी नसतां ज्ञान। विताळ ईश्वर करितां गान।
तारक नामाचें महिमान। आनंदात्मज गुण लाहे ॥ ३ ॥

## पद २२

ऐका हो अद्भुत देणें। त्या एका भगवंताचें ॥ ध्रु० ॥
नेणें पूजा नेणें सेवा। शरणागत मी आलों देवा।
म्हणतां देउनियां निज खेंवा। दिधलें संस्थान सोन्याचें ॥ १ ॥
भेटी नेले पोहे मुष्टी। तेणें देवा झाली तुष्टी।
आली सौभाग्यासी पुष्टी। झालें कल्याण दुबळ्याचें ॥ २ ॥
केवळ मुग्धाचिया धाटी। निघता झाला दुग्धासाठीं।
दिधली क्षीराब्धिची वाटी। बाळक धालें विप्राचें ॥ ३ ॥
उंची बैसायाच्या काजा। निघतां विपिना गाजावाजा।
केला अढळपदींचा राजा। निरखी अजून जग साचें ॥ ४ ॥
म्हणे आनंदाचा बाळ। होती मुक्याचे वाचाळ।
पांगुळ लंघिति पर्वतमाळ। होइल पीयूष विखाचें ॥ ५ ॥

## पद २३

बाइल पैशाची पैशाची। कधीं नव्हे पुरुषाची ॥ ध्रु० ॥
जोंवरि धनसुत जोडी। तोंवरि लावी लाडीगोडी ॥ बा० १ ॥
वेडा बहिरा पिसा। त्यासी देखुन करि कर्कशा ॥ बा० २ ॥
अमृतराय तुज सांगे। मजला प्रतीति आली आंगें ॥ बा० ३ ॥

## पद २४

मना कांहिं तुला नाहिं। पहा लाज कशी रे ॥ ध्रु० ॥
परकामिनिपरधनास। विविधविषयवासनांस।
जपसि टपसि मांजरसा। न कळुनि मी पडन फसी ॥ १ ॥
निगमविहित टाकुनि मति। वरिसी स्वहितार्थ कुमति ॥
नेतिल भट यमसदनीं। पडसि फुकट अमरवसीं ॥ २ ॥
तिळभर जरि भूतदया। बाणेना तव हृदया।
तरि मग देहीं कवण्या। श्रीहरिला आवडसी ॥ ३ ॥
धरुनि सुदृढ संतसंग। विठ्ठल नामींच रंग।
आयुर्व्यय व्यर्थ करुनि। पावसि भलतेचि कुशी ॥ ४ ॥

## पद २५

भुलल्या त्या नंदगोपतिबाळा। बाळा वेल्हाळा।
चपळा हरिलालनसकळा विमळा। त्या विकसितकमळा ॥ ध्रु० ॥
हृदईं धरिती त्या आत्मारामा। रामा सकामा।
कामाचा तात तो बरवा मा। वामांगीं श्यामा।
शामा त्या दानवदमनोद्दामा। दामा श्रीरामा।
रामानुज भजति त्यजिति कामा। कामा अति कामा ॥ १ भुलल्या त्या० ॥
येति श्रीकृष्णपदाब्ज नमाया। माया त्यजाया।
जाया गोपतिच्या कोमळकाया। काया अर्पाया।
पायांचें रज तें आलिंगाया। गाया विविधाया।
धाया नीज मनीं भेटति बाह्या। या यादवराया ॥ २ भुलल्या० ॥
ऐशा लुब्धल्या गोकुळकांता। कांतारीं कांता।
कांताभा टाकुनियां शशिकांता। परि द्रवति नितांता।
दाता आनंदसुतप्रभु शांता। रमताति अनंता ॥ ३ भुलल्या० ॥

## पद २६

चिंतावा रघुवीर । प्राण्या चिंतावा रघुवीर ॥ ध्रु० ॥
नासिक त्रिंबक रूप मनोहर । पावन गंगातीर ॥ १ ॥
पंचवटीमधें पर्णकुटी करीं । सेवुनि राहे नीर ॥ २ ॥
लौकिक लज्जा सांडुनि अवघी । पांघरे भगवें चीर ॥ ३ ॥
मधुर हरीच्या नामाविरहित । न रुचे साकरक्षीर ॥ ४ ॥
मध्वमुनीश्वर म्हणतो येथें । चित्त करावें स्थीर ॥ ५ ॥

## पद २७

दशरथनंदन बाळ सीते । याला घालीं माळ सीते ॥ ध्रु० ॥
मदनमनोहर रूप जयाचें । दानवकुळिंचा काळ सीते ॥ १ ॥
काळा डोंगर अंतरिं ओंगळ । रावण हा फटकाळ सीते ॥ २ ॥
मध्वमुनीश्वरस्वामि रमापति । करिल तुझा प्रतिपाळ सीते ॥ ३ ॥

## पद २८

उबगल्यें सासऱ्या आतां मज माहेरासि न्या हो ।
तोंडा येवढा जाच पडतें तुमच्या पायां हो ॥ ध्रु० ॥
त्रिविधताप सासरा प्रभु मज तर उभाचि गांजतो ।
भेद भयंकर भाऊ हा उगाचि जाळितो ।
क्रोध माझा दिर तो मजला भलतेंच बोलतो ।
काम माझा दादला सखे गे भलतिकडे जातो ॥ उब० १ ॥
सासू ही कल्पना मजला करिति जाच नाना ।
अविद्या ही नणंद बाइ तर उगीच राहीना ।
आशा ममता जावा यांनीं मांडियली दैना ।
कुठवर सोसूं जाच आतां कदापि राहीना ॥ उब० २ ॥

अहेवमायेचा तंतू हा तर बळेंच तोडीन ।
प्रपंचाचें लुगडें हें तर उभेंच फाडीन ।
जो मज माहेर दाविल त्याची मी सेवा करीन ।
मुकुंदराज म्हणे लाज बाई गेली उडोन ॥ उब० ३ ॥

## पद २९

देह अशाश्वत वैभव चंचळ शाश्वत मूर्खपणें ।
निष्ठुर काळ सदा तुज लक्षी द्वारिं धरी धरणें ॥ ध्रु० ॥
राम भजें भज कृष्ण हरीहर सार्थक होय जिणें ।
चुकविल दुष्कृत दुस्तर पुनरपि गर्भदरीं निजणें ॥ १ ॥
मृगजळ साच कसें परि होइल ऐक अतां श्रवणें ।
वीज लवोनि सरे सुख जाइल सर्व तुझें करणें ॥ २ ॥
वाल्मिककल्मष जाळित राघव तेंचि धरीं म्हणणें ।
फिरसी हें कीं सांकडि तनुला जन्मजरामरणें ॥ ३ ॥
दास म्हणे मन भृंगरुपें करिं सेविं द्वयचरणें ।
सावध सावध होईं जागृत उन्मनि होसि क्षणें ॥ ४ ॥

## पद ३०

बा तुझा चालता काळ । खायाला मिळती सकळ ॥ ध्रु० ॥
हे कोण बायकोचे साले । तुपावेगळा घांस न गिळे ।
तांदुळ रांधावे मोकळे । केलें बेंबीचें उखळ ॥ १ ॥
हे कोण बायकोचे मामे । घरांत वागती रीकामे ।
साकरशेलियाचे जामे । भोजनभाऊ केवळ ॥ २ ॥
साल्यामेहुण्या घरा येती । फराळाच्या पंक्ती बसती ।
नातें कोरकोरुनि काढिती । अवघा मायेचा खेळ ॥ ३ ॥
अमृतराय म्हणे रे मूर्खा । नको भुलूं मायेच्या सुखा ।
अंतीं येकटा जासी नरका । भजें सद्गुरु दयाळा ॥ ४ ॥

# उद्धवचिद्धन[1]

## दिंड्या ध्रुवाख्यानाच्या

सूर्यवंशीं उत्तानपाद राजा। रूपवंती तयास दोन भाजा।
कनिष्ठेशी अत्यंत प्रीतमाया। पट्टराणीची पडों न दे छाया ॥ १ ॥

वरिष्ठेसी जाहला एक पुत्र। भक्तराज वैकुंठपाळमित्र।
सुकूमार आकर्णपद्मनेत्र। ठाणमाण रेखिलें जेंवि चित्र ॥ २ ॥

पांच वर्षे लोटलीं ध्रुवाआंगीं। पिता ठाऊक नाहिं तयालागीं।
पुसे मातेसी भक्तराज योगी। तात कोठें तो सांग मला वेगीं ॥ ३ ॥

म्हणे माता तान्हया तोचि तूझा। धराधीश बोलती ज्यास प्रजा।
येरु म्हणे पाहीन पिता माझा। नको जाऊं मारील राजभाजा ॥ ४ ॥

पूर्वपुण्यें शुभ दिवस ऊगवला। मुलांसंगें तो राजगृहा गेला।
राजदृष्टी सन्मूख उभा ठेला। पिता पाहे तों मोह झळंबला ॥ ५ ॥

अनीवार मोहास पूर आला। ऊचलोनी मांडिये बैसवीला।
बाळशब्दें खेळवी तनूजाला। न साहे तें राणीस कोप आला ॥ ६ ॥

---

१ ध्रुवाख्यान हें काव्य चिंतामणि या नांवानें प्रथम नवनीताच्या या दुसऱ्या भागांत प्रसिद्ध झालें. पुढें तें नवनीताच्या पहिल्या भागांत अन्तर्भूत करण्यांत आलें. वास्तविक हें काव्य चिंतामणीचें नसून उद्धवचिद्धन या कवीचें आहे. उद्धवचिद्धनाच्या नांवाखालीं या काव्याचीं पुष्कळ हस्तलिखितें सांपडतात. १८७१ सालीं पुणें येथें उद्धवचिद्धनाच्या नांवाखालीं तें प्रसिद्ध झालें आहे. उद्धवचिद्धनाचीं 'शुकरंभासंवाद' व 'श्रियाळचरित्र' हीं दिंडीबद्ध काव्यें पाहिलीं म्हणजे ध्रुवाख्यानाचें कर्तृत्वही त्याचेंच आहे, हें सहज दिसून येतें. नवनीतांत मूळ शेवटची दिंडी अशी आहे:—

ध्रुवाख्यान ऐकती गाति वाचे। ध्रुवासनींही अढळवास त्यांचे।
चिंतामणी गावोनि गुण साचे। सौख्य पावोनि हरिपदीं नाचे ॥

या पुस्तकांत उद्धवचिद्धनाच्या नांवावरची शेवटची दिंडी घातली आहे. इतर पाठ बदलले नाहींत.

—संपादक

उचंबळे क्रोधाग्नि शिखा टाकी । म्हणे कोण बैसला राजअंकीं ।
राव कैसा खेळवी कवतूकीं । ध्रूव राजा होईल धरालोकीं ॥ ७ ॥
धरोनीयां सापत्नभाव चित्तीं । पदें लोटोनी पाडियला क्षीती ।
रडत गेला माउली जेथ होती । अश्रुपातें हाल्वी नेत्रपातीं ॥ ८ ॥
म्हणे माता तान्हया काय झालें । कोणें पापीयें तूज गांजियेलें ।
मज रायें मांडिये बैसवीलें । राजभाजेनें पदें लोटियेलें ॥ ९ ॥
बुझावीतां माउली काय बोले । आम्हि देवासी नाहिं पूजियेलें ।
येरु बोले तो देव कसा आहे । बसे कोठें तो सांग त्वलाहें ॥ १०
माय बोले सर्वत्र देव आहे । चराचर व्यापून विश्व राहे ।
तयालागीं धुंडिती महायोगी । पूर्वपुण्यें दर्शन तयांलागीं ॥ ११ ॥
तुझी बुद्धी काय बा वय सान । तुला कैसें देईल दरुषण ।
ध्रुव बोले त्यागीन तरी प्राण । हरी देईना जरी दरुषण ॥ १२ ॥
उभा जैसा तैसाचि निघे वेगें । रडत पाठीं लागली माय मागें ।
पुत्र गेला रायासि दूत सांगे । राय झाला घाबिरा मोहसंगें ॥ १३ ॥
सर्वसौख्याचें मूळ बाळ माझें । ध्रुव गेला घेणार राज्यओझें ।
वनीं प्राण त्यागीन लोकलाजे । काय जीणें मारिलें दुष्ट भाजे ॥ १४ ॥
त्वलाहीं लागला ध्रुवापाठी । म्हणे बाळा ऐक बा एक गोष्टी ।
बुझावीतों तुज धरुनि हनूवटी । तूजविणें दाटला प्राण कंठीं ॥ १५ ॥
फीर मागें देईन येक गांव । ध्रुव बोले देईल देवराव ।
पांच गांव दीधलें फीर आतां । ध्रुव बोले मागेन जगन्नाथा ॥ १६ ॥
राय बोले देईन येक देश । ध्रुव बोले देईल जगदीश ।
अर्धराज्य दीधलें आण तूझी । ध्रुव बोले देवासि लाज माझी ॥ १७ ॥
सर्व राज्य दीधलें फीर मागें । ध्रुव बोले देइजे रमारंगें ।
स्नेह कां रे सांडिला ध्रुवा आजी । काळतोंडा जाहलों जगामाजी ॥ १८॥
ध्रुव बोले पितयास तातदेवा । अतां येतों मी लोभ असों द्यावा ।
हरीभक्तीचा लोभ कसा देहीं । अनूतापें कोंदल्या दिशा दाही ॥ १९ ॥

सर्वभावें उभवूनि दोन बाही । म्हणे देवा भेट दे त्वलाहीं ।
निरंजनीं जावोनि उभा राहे । शोक आक्रोशें करूनियां बाहे ॥ २० ॥
दुरूनीयां अष्टाक्षसुता[1] पाहे । तया दृष्टी सायुज्यपदा लाहे ।
जवळ येऊनी पुसे बाळकासी । वय सानें तूं कोण वनवासी ॥ २१ ॥
पूर्ववृत्तांत सांगे नारदासी । आयकोनी तोषला देवऋषी ।
गुरुमंत्रावांचोनि देव कैंचा । श्रुती सर्व बोलती अशी वाचा ॥ २२ ॥
सकलमंत्रांमाझारि मुख्य साचा । मंत्रराज द्वादश अक्षरांचा ।
ध्रुवाकानीं सांगूनि मुनी गेला । जपतांची तो हृदयिं प्रगटला ॥ २३ ॥
चतुर्भूज सायूध घननीला । तया दृष्टीसन्मूख उभा ठेला ।
दिव्यरूप तें ध्रुवें देखियेलें । नमस्कारोनी मनीं पूजियेलें ॥ २४ ॥
देव बोले तूं काय इच्छितोसी । धराधीश कीं स्वर्गभोगवासी ।
ध्रुव बोले मज भक्ति सदा देईं । पद दीजे न उठवि दुजी आई ॥ २५ ॥
ध्रुवयानीं तो वाहुनियां नेला । ध्रुवस्थानीं तो अढळ बैसवीला ।
चंद्रसूर्यनक्षत्रग्रहतारा । सप्तऋषिही घालिती ज्यास फेरा ॥ २६ ॥
ध्रुवाख्यान ऐकती गाति वाचे । ध्रुवलोकींही अक्षयीं वास त्यांचे ।
औदार्यची क्षीराब्धिशयनाचें । उद्धवचिद्धन गुण गाय त्याचे ॥ २७ ॥

## प्रबंध

उद्धवा मुखाचा रांवा । साधुनि दावा गांवा गेला ॥ ध्रु० ॥
जाहलों सख्या त्यावांचुन । आम्ही वांचुन दीनवाणी ॥
सोडलें पहा संदेहा गेहा । देहा कुडता पाणी ॥
पातली अम्हांस कृपाळा । रहित कपाळा हीं रडगाणीं ॥
मारितां हका कनवाळा । ताडुनि भाळा शिणले पाणी ॥
वाकडी कशी त्या दासी । वाटुनि खाशी केली राणी ॥

---

1 आठ डोळ्यांचा चतुर्मुख ब्रह्मदेव, त्याचा सुत नारद.

धुमाळ ॥ टाकोनि अम्हांला जाउनि बसला दुरी ॥
खेळतो तिच्यासह नानारसचातुरी ॥
बैसलों हका मारित कीं गोकुळपुरीं ॥
भाउजी भल्याची रीत नव्हे कीं परी ॥
कांतिनें तयाला मोहुनि घेउन नेउन केला चेला ॥
उद्धवा सुखाचा रांवा साधुन दावा गांवा गेला ॥ १ ॥
अक्रूर कशाचा मेला उलथुन गेला काळच बाई ॥
दावोनि कळा चालीला वनमालीला केली घाई ॥
मोहून तया एकांत घेउन कांता गेला गाई ॥
या पापभरानें कैसा राहिल पैसा हो शिवराई ॥
त्या खोट्या लोट्या कोल्ह्याला जनमेल्या पडला डाई ॥
धुमाळ ॥ कडकडां रदन चावुन बोटें मोडितों ॥
त्या पोटभरूवर फार खडे फोडितों ॥
तापोन मनामधिं फार शिव्या झोडितों ॥
टाकिना कसा अद्यापि कुटिल खोडि तो ॥
दावोनि अम्हांला कावा प्राणविसांवा फितवुनि नेला ॥
उद्धवा सुखाचा रांवा साधुन दावा गांवा गेला ॥ २ ॥
दुसऱ्यास न द्यावे दोष मनामधिं रोष धरोनि कशाला ॥
काळजी न वाहे कांहीं करुणा नाहीं बाइ म्हशाला ॥
अंतरीं धरावर खोटा निर्दय मोठा दाट कुशाला ॥
वाकळा करुनियां गोळा लाज न पोळा घेइ उशाला ॥
त्या तशा पिशाला शाला उंच कशाला दीपमशाला ॥
धु० ॥ बायका कशा त्या फसवुनि गेला गडी ॥
बाटली कशी त्या कुबडी बहु फांकडी ॥
उद्धवा अम्ही तर आलों सखया रडी ॥
हें ज्ञान तुझें तर फारच अगपाखडी ॥

नरसिंहविभूच्या पाया साच पहाया जीव भुकेला ॥
उद्धवा सुखाचा रांवा साधुन दावा गांवा गेला ॥ ३ ॥

## कितीएक कवींची सुभाषित कविता

### श्लोक

गांजा ओढुं नको, सुरा पिउं नको, तूं भांग घोटूं नको ।
गोळी खाउं नको, अफू गिळुं नको, माजूम सेवूं नको ॥
कांहीं चोरुं नको, उगा फिरुं नको, वेश्याहि पाहूं नको ।
विद्याज्ञानधना सदा मिळविल्यावांचून राहूं नको ॥ १ ॥

### सवय्या

वैभव[1] शाश्वत[2] नाहिंच यास्तव कांहितरी उपकार करा ।
धर्मचि[3] हा परलोकसखा निजतारक होइल तोचि खरा ॥
दुर्जनसंगति सोडुनि दुर्मति सज्जनसंगति नित्य धरा ।
श्रीहरिचे मनिं पाय धरा निजतारणिं[4] हाच उपाय बरा ॥ १ ॥
पाहुनि दीनजनास जळाविण मीन तसा अतिदुःखित होतो ।
कष्टवुनी निज देह जना बहु तुष्टवि नित्यचि साधु अहो तो ॥
जो उपकार करी सुजनावरि अंतरिं निर्मळ भाव धरीतो ।
साधितसे परकीय हिता परि साधन आत्महितींच करी तो ॥ २ ॥
मृत्युपरीसहि निर्धनता[5] अति दारुण तेज जनांत हरी ।
जो निज कीं परकीयहि पाहुनि निर्धन[6] तो अपमान करी ॥
स्त्री सुतही अवमानि निरंतर भाषण कोणि मनीं न धरी ।
दुःखचि अंतरिं बाहिर त्यास महीवरि दुर्गति[7] हीच खरी ॥ ३ ॥
अर्थचि[8] या कलिमाजि जना परमार्थ[9] असा दुसरा न दिसे ।
अर्थ मिळेल कसा मज राहिल तो जवळी मनिं हेंचि वसे ॥

---

१ संपत्ति. २ अक्षय. ३ परोपकाररूप धर्म. ४ आपणाला तारण्यास. ५ दारिद्र्य. ६ निर्धनातें. ७ नरकवास. ८ धन, द्रव्य. ९ खरा लाभ.

अर्थ सुयोग वियोगहि केवळ दुःख अजस्रहि[1] देत असे।
अर्थ परासि[2] कळेचि न हा वरि अर्थ असोनि अनर्थ असे ॥ ४ ॥
जीस[3] गमे पद अन्यगृहीं[4] जरि ठेवियलें जणु सर्पशिरीं।
वाक्य जिचें अतिदुर्लभ ज्यापरि दुर्मिळ जें धनलोभिकरीं[5] ॥
कांतसमागम[6] तेंचि गमे सुखपर्व[7] नसे जरि वित्त[8] घरीं।
शांतमनें निजकांतमतें करि कृत्य[9] सती[10] जनि तीच खरी ॥ ५ ॥

## श्लोक

अर्ता[11] ये ऐक धूर्ता अवगुण शशिचे[12] हा सदाचा अपुर्ता।
एके रात्रीस पुर्ता तदुपरि टपतो राहु खग्रासकर्ता ॥
ऐशाला डाग वर्ता पतिविरहिणिचा शस्त्र जो प्राणहर्ता।
मासांतीं[13] शून्यवार्ता शशिमुखि वनिता सांडि हा शब्द पर्ता ॥ ६ ॥
कोणी एक वनीं विलक्षण वधू[14] मेघोदकें जन्मली।
बालत्वीं नरनाम तीस असतां स्त्रीनाम ती पावली ॥
पांचांहीं प्रणिली तयांतुनि तिहीं अत्यादरें वाहिली।
तेथें ती श्रम पावली म्हणुनियां कर्णाश्रमीं राहिली ॥ ७ ॥
कांतेला पति तोच मान्य हृदयीं जो का असे जोडका[15]।
संपत्तीविण त्यास ती गणितसे जैसा कडू दोडका ॥
जेथें कामिनिचें असे बळ बहू निर्माल्य[16] तेथें पती।
ऐसें काय जिणें सुधाम[17] असुनी जावें अरण्याप्रती ॥ ८ ॥
स्वच्छंदें[18] स्वपराक्रमें स्वकृपिचीं[19] धान्यें स्वकांताकरें।
सिद्धान्नें विविधें समर्पुनि करीं विप्रांसि अत्यादरें ॥
तच्छेष[20] प्रतिवासरीं स्वसदनीं सेवी सुरार्चा महा।
आनंदें करि भुक्तवंत[21] नर तो मी भुक्त राया न हा ॥ ९ ॥

---

१ नित्य. २ धनलोभ्यास. ३ ज्या स्त्रीस. ४ परगृहीं. ५ कृपणाच्या हातीं. ६ पतिसमागम. ७ सुखातिशय. ८ धन. ९ गृहकृत्य. १० पतिव्रता. ११. इकडे. १२ चंद्राचे. १३ अमावास्येस. १४ हा लेखणीवर संकेत. १५ धनसंपादनकर्ता. १६ निस्तेज. १७ संपन्न गृह. १८ स्वेच्छेनें. १९ घरच्या शेताचीं. २० ब्राह्मण जेवून राहिलेलें अन्न. २१ जेवलेला.

चंद्राला दिवसा प्रकाश नसणें ये कामिनीला[१] जरा[२] ।
पद्मावीण तळें निरक्षर[३] मुखें जो नेटका गोजिरा ॥
दात्याला धनमान फार असणें दारिद्र्य विद्वज्जनां ।
दुष्टांचा पगडा[४] महीपतिगृहीं[५] हीं सात शल्यें[६] मना ॥ १० ॥

येईल भानु उदयाप्रति पश्चिमेशी ।
चालेल मेरु खडकीं जनि[७] उत्पलाशीं[८] ॥
होईल तेज कधिं शीतळ[९] पावकाचें[१०] ।
होईचना उलट[११] भाषण सज्जनाचें ॥ ११ ॥

निंदोत वानोत सुनीतिवंत । असो नसो वा कमला गृहांत ॥
यो मृत्यु कीं आज घडो युगांतीं । सन्मार्ग सोडोनि भले न जाती ॥ १२ ॥
अंभोनिधीनें वडवानळाला । श्रीविष्णुनें त्या पदलांछनाला ॥
समर्थ ज्याला धरितील हातीं । त्याकारणें प्राणहि वेंचिताती ॥ १३ ॥
पति असोनि अनंत पतिव्रता[१२] । म्हणविते करिते पतिच्या हिता ॥
पति करी अपुल्या पतिच्या सुता । नवल वाटतसे मज बोलतां ॥ १४ ॥
विधीनें खळाच्या मुखीं हे भुजंगी[१३] । जिभेच्या मिषें ठेविली चंचलांगी ॥
तिणें चाटला[१४] कोण तो वांचला हो । तया कोणता मंत्रिही भेटला हो ॥ १५ ॥

## आर्या

परगुह्य[१५]-गोपनक्षम गुणमय[१६] सकलांसि फार आवडती ॥
सज्जन वस्त्रासम हे परि खळमूषक[१७] तयांस कुरतुडती ॥ १६ ॥
आकाशा रंगवितो, यत्नें तो निर्मितोचि चित्र जळीं ॥
न्हाणी वायूस जळें, करितो[१८] उपकार जो जगांत खळीं ॥ १७ ॥
विसरति अपकारातें, उपकारातेंचि साधु आठविती ॥
कीं सोशितां न सा-विति होय वपु न सोशितां न आठ-विती ॥ १८ ॥

---

१ स्त्रीला. २ वृद्धत्व. ३ विद्याशून्य. ४ चलती. ५ राजगृहीं. ६ दुःखदायक गोष्टी. ७ उत्पत्ति. ८ कमलास. ९ थंड. १० अग्नीचें. ११ अन्यथा. १२ हा पृथ्वीवर संकेत. १३ सर्पीण. १४ दंशिला. १५ गुप्तगोष्ट किंवा गुह्येंद्रिय. १६ सद्गुणी; पक्षीं तंतुविशिष्ट. १७ दुर्जन हेच उंदीर. १८ हा व्यर्थ व्यापार.

कविस रुचे घालवें विषयसुख करूनि घोर तप डावें ॥
मूर्खासि आवडे बहु जेवुनि सस्त्रीक घोरत पडावें ॥ १९ ॥

श्लोक

शास्त्रें फार अपार जीवित तुझें अत्यल्प कीं मानवा ।
तेंही विघ्नशताभिभूताचि असे नाहींच रे वानवा ॥
घेईं यास्तव सारभूताचि असे जो अंश त्यातें बुधा ।
घेतो हंस जसा पयोऽन्वित जलापासूनि एक्या दुधा ॥ २० ॥

## अन्योक्ति श्लोक

### सिंहाविषयीं

दिगंताला गेले[१] मदमलिनगंड[२] द्विपपती[३] ।
करेणू[४] कारुण्यास्पद, मृगहि[५] ते तुच्छ दिसती ॥
अतां ज्यांचीं अग्रें परमकठिणें तीव्र असती ।
नखांचें त्या शौर्य प्रकटिल कुठें हा मृगपती[६] ॥ १ ॥

गिरिगव्हरांत[७] गुरुगर्व वाहुनी । गजबालका फिरुं नकोच जाउनी ॥
जरि जाणतील हरि[८] तूजला तरी । करिणीच मात्र उरतील भूवरी ॥ २ ॥

### मेघाविषयीं

आशेतें धरिती तुझ्या करपती शेतें जयांचीं अती ।
त्यांतें सोडुनि दावितोसि अपुलें औदार्य कीं पर्वतीं ॥
स्थूळत्वास भुलोनि दीन जन ते कां टाकिले बा असे ।
वाटे कीं अविचार हा जलधरा[९] बा योग्य तूतें नसे ॥ ३ ॥

### सरोवराविषयीं

अशी ही संपत्ती[१०] असुनि सलिलाची[११] तुज जरी ।
तृषार्तांची तृष्णा न हरिशि सरा[१२] व्यर्थचि तरी ॥
निदाघीं[१३] सूर्यांशू[१४] करितिल जयीं शुष्क तुजला ।
तयीं कोणाची तूं हरिशिल तृषा सांग मजला ॥ ४ ॥

---

१ पळाले. २ मदोन्मत्त. ३ हत्ती. ४ हत्तिणी. ५ हरिण वगैरे. ६ सिंह. ७ पर्वतगुहेंत. ८ सिंह. ९ हे मेघा. १० समृद्धि. ११ उदकाची. १२ हे सरोवरा. १३ उन्हाळ्यांत. १४ रविकिरण.

### समुद्राविषयीं आर्या

रे अर्णवा[१] तुझीं हीं रत्नें विस्तीर्ण हा तुझा काय[२] ॥
व्यर्थचि, कीं तृषितांच्या वदनीं न तुझें कदापि जल जाय ॥ ५ ॥

### कल्पवृक्षाविषयीं

औदार्य[३] त्रिजगीं असे विदित तें उत्पत्ति[४] ही सागरीं ।
आहे नंदनकाननांत[५] वसती सौगंध्य[६] चित्ता हरी ॥
दात्यांचा गुरु जो असा सुरतरू[७] त्या गूण मोठे असे ।
पात्रापात्रविचारणा जरि असे त्या मोल कोठें नसे ॥ ६ ॥

### सरोवराविषयीं

आकाशमार्ग धरितीलचि हे विहंग[८] ।
जातील फुल्ल सहकारतरूसि[९] भृंग[१०] ॥
घेशी सरा[११] जरि कृशत्व[१२] असोनि मोठें ।
हें दीन[१३] मीनकुळ[१३] जाइल सांग कोठें ॥ ७ ॥

### मोराविषयीं

मयूराचीं पिच्छें म्हणति सखया[१४] त्याग न करीं ।
अम्ही आहों तों तूं दिससि बरवा गा बहुपरी ॥
परित्यक्तें[१५] आम्ही यदुपतिशिरीं[१६] कीं नृपशिरीं ।
विराजूं सन्मानें परि गति तुझी तूंच विवरीं ॥ ८ ॥

### कोकिळाविषयीं

बैसोनी सखया पिका[१७] उगिच तूं मार्गप्रतीक्षा करीं ।
जों आंबे फुलती सुगंध सुटती येई मधू[१८] तोंवरी ॥
तेव्हां सार्थकतेस पावतिल वा हीं गोड वाक्यें तुझीं ।
सध्यां ग्रीष्म असे धुळी उडतसे नेत्रांस दे दुःख जी ॥ ९ ॥

---

१ हे समुद्रा. २ देह. ३ उदारपणा. ४ जन्म. ५ इंद्राच्या बागेंत. ६ सुगंधिपणा. ७ कल्पवृक्ष. ८ पक्षी. ९ आम्रवृक्षास. १० भुंगे. ११ हे सरोवरा. १२ अल्पत्व. १३ अगतिक मासे. १४ हे मयूरा. १५ त्वां टाकिलेली. १६ विष्णूच्या मस्तकीं. १७ हे कोकिलपक्ष्या. १८ वसंतसमय.

## कोकिळाविषयीं

येथें समस्त बहिरे दिसतात लोक।
कां शब्द बा मधुर तूं करिशी अनेक।
हे मूर्ख ज्यांस किमपीहि नसे विवेक[1]॥
रंगावरूनि[2] तुजला गणितील काक[3]॥ १० ॥

## कावळ्याविषयीं

काका[4] कुशब्द करिशी करिं तूं सुखानें।
नाहींच दोष तुज काय वदूं मुखानें॥
धाताच[5] मूर्ख गमतो बहु कीं अशास।
जो दे पिकासह[6] रसाळ-नगीं[7] निवास॥ ११ ॥
कर्णाला कटु शब्द सोडुनि उगा तूं बैसशी बा जरी।
काका आम्रतरूवरी मग तुला कोकीळ मानूं तरी॥
कीं वस्तु स्थलवैभवेंकरुनियां[8] मोठेपणा पावती।
नेपाळेश्वर-भाळलग्न-चिखला कस्तूरिका मानिती॥ १२ ॥

## कुत्र्याविषयीं

बांधोनि कृत्रिम जटा[9] भरि मान सारी।
झाला जरी शुनक[10] सिंहपदाधिकारी॥
मत्तेभगंडतटभेदनपंडिताची[11]।
तो गर्जना[11] कशि करील मृगाधिपाची[11]॥ १३ ॥

## अल्पत्वाविषयीं

माळाकार[12] करी तया तरुवरी सामान्य दृष्टीपरी।
या अल्पा बकुलावरी न विपुल प्रेमा धरी अंतरीं॥

---

१ विचार. २ काळेपणावरून. ३ कावळा. ४ हे कावळ्या. ५ ब्रह्मदेव. ६ कोकिळासह ७ आम्रवृक्षावर. ८ स्थानमाहात्म्यानें. ९ आयाळ. १० कुत्रा. ११ मत्त हत्तीचीं गंडस्थळें फोडणाऱ्या सिंहाची गर्जना. १२ माळी.

पुष्पांचा भर फार यासचि पहा आला असे लौकरी ।
भृंगांच्या मधुरस्वरें परिमळें सर्वा दिशांतें भरी ॥ १४ ॥

### व्यर्थ मनोरथाविषयीं आर्या

येइल वसंत आतां, देइल चिरनष्ट[1] मधुर मज वाचा[2] ॥
ऐसें चिंती पिक तों आदळला शर उरांत लुब्धाचा[3] ॥ १५ ॥

### श्लोक

येईल भानु उदयाप्रति अल्पकाळें ।
होईल मुक्त सुटतां शतपत्र-जाळें[4] ॥
ऐसें अली[5] मुकुलबद्ध[6] मनांत चिंती ।
तों पद्मिनीस[7] उपडी मदमत्त हस्ती ॥ १६ ॥

### आर्या

ज्याची झाली स्वर्द्रुम[8]-कुसुमरसें पूर्ण कामना सारी ॥
त्या भ्रमराला पुष्पांतरसेवाही विटंबना[9] भारी ॥ १७ ॥
जिंकी सकळ परिमळा ऐशा कुसुमांत ठेवुनी पाय ॥
पुष्पांतरास जाऊं इच्छिसि मधुपा म्हणूं तुला काय ॥ १८ ॥

## प्रभाकरकविकृत लावणी

### लक्ष्मी-पार्वती-संवाद

लक्षुमि गर्वें निंदा बोलुनि झिडकारिति पार्वती ॥
अहे ठाऊक पुरुषार्थ तुझा तुज प्रीय असो पशुपती ॥ ध्रु० ॥
स्मशानवासी भुषण भयंकर पिंगट मुकुटीं जटा ॥
भाळचंद्र ज्या तीन नेत्र भस्माचा कपाळीं पटा ॥
व्याघ्रांबर गजचर्मांबर परिधान शुद्ध कानफाटा ॥
रुंडमाळ ती कंठिं कुंडलें भुजंग रुळती कटा ॥
त्रिशूलपाणी त्रिपुंड्र भाळीं लोहकंकण मणगटा ॥

---

१ बहुकाळ गेलेली. २ वाणी. ३ पारध्याचा. ४ कमळरूप जाळें. ५ भ्रमर. ६ कळ्यांत कोंडलेला. ७ देंठासुद्धां कमळास. ८ कल्पवृक्ष. ९ फजिती.

नंदि वहन सर्पाचा सदोदित करि कमरे लंगुटा ॥
कसा अवडतो शंकर गिरिजे सांग तुला मजप्रती ॥
लक्ष जन्मिंचें पातक म्हणउनि पडलिस ऐशा हतीं ॥ ल० १ ॥
भोळा माझा सांब लक्षुमी उगाच निंदूं नका ॥
अनाद्यंत ज्या अगम्य सुख तें अलभ्य ब्रह्मादिकां ॥
सोळा सहस्र शत एक मुख्य तुम्हि आठजणी नायिका ॥
कार्यवादु तो कृष्ण कसा करि पूर्ण मनोरथ सखा ॥
वक्रदंत शिशुपाल कंसही कपटें मर्दुनि बका ॥
प्रताप बहु वर्णितां कसा भाळल्यात गोरक्षका ॥
जरासंधरिपु-भयें वसवली जळांत द्वारावती ॥
तस्करास कसा श्वशूर जडला हा भीमक भूपती ॥
मच्छ कूर्म हा सूकर झाला सिंह वामन श्रीपती ॥
जन्म गेला पहा अशाखालिं म्हणे लक्ष्मीला पार्वती ॥ ल० २ ॥
भुतें पिशाचें यक्ष ब्रह्मराक्षस हे ज्याचे दुत ॥
श्वान सभोंते मिळवुनि संगें फिरे भीक मागत ॥
भुंभुं वाजवि शंख मुखानें चिताभस्म लावि नित ॥
शूर्पकर्ण षण्मूख जयाचे नवलपरीचे सुत ॥
मना गमे तिथे निद्रा करितो जिवंत पाहतां भुत ॥
हिमालयाचें थोर असें प्रारब्ध पाहुन विस्मित ॥
धन्य तुझी पार्वती अशाची राखितेस चितवृती ॥
दैवदशा भर्तार तामसी कठीण गे तव गती ॥
लक्षुमि गर्वे निंदा बोलुनि झिडकारिति पार्वती ॥
अहे ठाऊक पुरुषार्थ तुझा तुज प्रीय असो पशुपती ॥ ल० ३ ॥
अनंत घेतो जन्म तुझा पति क्षीरसमुद्रामधीं ॥
शेषावर निद्रिस्त नाभिवर चार मुखांचा विधी ॥
वहन विहंगम दिलें सुदर्शन कलुन शंकरें अधीं ॥
सुरासुरीं तुजसाठिं मंथिला पराक्रमें जळनिधी ॥

इच्छा करिती प्राणिमात्र तूं चंचल नाहिंस सुधी ॥
शंख सहोदर तुझा लक्ष्मी श्रीमंत झालिस कधीं ॥
कृपानिधी हा सांब वसे अर्धांगिं मि त्याची सती ॥
लिला तयाची विचित्र भासे विदीत सर्वांप्रती ॥
मच्छ कूर्म हा सूकर झाला सिंह वामन श्रीपती ॥
जन्म गेला पहा अशाखालिं म्हणे लक्ष्मीला पार्वती ॥ ल० ४ ॥

तपसामर्थ्येंकरुनि शिवाला भस्मासुरें जिंकिलें ॥
धरुनि तुला पार्वती त्वरेनें स्कंधावर वाहिलें ॥
लपूं लागला सांब तेव्हां मम पतीस पाचारिलें ॥
मोहिनिरूप प्रत्यक्ष धरुनि त्या राक्षसास मारिलें ॥
गजेंद्र करितां धांवा नक्रासह त्या उद्धारिलें ॥
सुधन्व्यास तैलामधीं तळतां तैल थंड जाहलें ॥
अशी घालितो उडी संकटीं बघ माझा श्रीपती ॥
कोमलांग राजीवनेत्र नव्हे शिवासारखा जती ॥
लक्ष्मि गर्वें निंदा बोलुनि झिडकारिति पार्वती ॥
अहे ठाउक पुरुषार्थ तुझा तुज प्रीय असो पशुपती ॥ ल० ५ ॥

नको सांगुं बडिवार रिकामा लक्ष्मि नानापरी ॥
नंदाचीं गोधनें चारिलीं कुंजवनाभीतरीं ॥
मुखांत घालुनि वेणु वाजवुनि मोहित करि सुंदरी ॥
गवळ्याचें उच्छिष्ट भक्षिलें नव्हे निर्मळ श्रीहरी ॥
श्यामवर्ण सर्वांग, खोंवितो मयूरपिच्छें शिरीं ॥
नवनितचोरें कसें दैत्याचें मर्दन केलें तरी ॥
लग्न लाविलें बसून रिसाशीं कुब्जा होती दुती ॥
किती येकक गुण सांगुं ऐकतां दुःखित होशिल चितीं ॥
मच्छ कूर्म हा सूकर झाला सिंह वामन श्रीपती ॥
जन्म गेला पहा अशाखालिं म्हणे लक्ष्मीला पार्वती ॥ ल० ६ ॥

अनंतकोटि ब्रह्मांडनिर्मिता जगांत जगवेगळा ॥
चार वेद सा शास्त्रें धुंडितां कुंठित झाल्या कळा ॥
निराकार निर्गूण सगुण मी पाहुनि पडलें गळां ॥
जन्मोजन्मि हा असो पती मज घनश्याम सांवळा ॥
परमसुशिल निष्कलंक वनिं उद्धरलि अहिल्या शिळा ॥
नामस्मरणें शीतळ झाला सांबदेह सागळा ॥
मुकुटमणी वैकुंठपीठ ज्या अमर सदा वंदिती ॥
प्राप्त व्हावे हे चरण म्हणुनि किति समाधिस्थ बैसती ॥
लक्षुमि गर्वें निंदा बोलुनि झिडकारिति पार्वती ॥
अहे ठाऊक पुरुषार्थ तुझा तुज प्रीय असो पशुपती ॥ ल० ७ ॥
ताडपत्र शृंगार म्हणुनि म्यां छळिलें जइं शंकरा ॥
प्रसन्न झाला महेश मज समजावी घेउनि करा ॥
शृंगाराचे पर्यंत पडले अमोल एकक हिरा ॥
कुबेराचि संपदा तुळेना अहा रे विश्वेश्वरा ॥
एकरूप शिवविष्णू लक्ष्मीगौरी एक स्मरा ॥
लय लावुनि एकाग्र भजावें मृत्युंजय श्रीधरा ॥
लक्ष्मीपार्वतिचा ऐसा संवाद गोड हा खरा ॥
भक्तिपुरस्सर जपुनि करावें प्रसन्न नित हरिहरा ॥
महादेव गुणि सांब हरीच्या चरणांबुजिं लोळती ॥
प्रभाकराच्या कवना गुणिजन हेत धरुनि धांवती ॥ ल० ८ ॥

## लावणी कालियामर्दन

पूर्णब्रह्म अवतार आठवा अघटित इच्छामात्रें करी ॥
गोपशिशूंचीं प्रेतें उठविलिं धेनुसहित कालिंदितिरीं ॥ ध्रु० ॥
गरुडभयें तो दुष्ट कालिया सर्प सदा यमुनेंत दडे ॥
स्नानपान सगळेंच राहिलें दूरुनि दर्शन मात्र घडे ॥
मीनमगर उसळोनि सोडिती प्राण तिराच्या पलीकडे ॥
पक्षि उडुनि अंतरिक्षिं जातां अकस्मात जळिं गळुनि पडे ॥

अरण्य झालें शुष्क सभोंतें यमुनाजळ गरळानें कढे ॥
अमृतघट ठेविल्यामुळें त्या कदंबास कांहीं न जडे ॥
असा भयंकर काळच केवळ विखार त्याचा कोण हरी ॥
उभयतिरीं जन वस्ति न करिती जाति निघून ग्रामांतरीं ॥ पू० १ ॥

पूर्वकथा विसरूनि गोवळे त्वरित धांवती तृषेमुळें ॥
गाइवांसरें मुलें दटावुनि कळपां पुढें घालिती बळें ॥
पाणि पितांक्षणिं पडलिं निचेष्टित वदनांतुन टाकिती जळें ॥
कोण आतां वांचवील कृष्णा अंतरली कां घरस्थळें ॥
सबाह्य अंतरसाक्षि त्रिविक्रम नको धांवण्या निमिषपळें ॥
कृपादृष्टी पाहतांच उठलीं गाइ वत्स गवळ्यांचिं मुलें ॥
कदंबतरुवर चढुनि पितांबर कसूनि बळकट खोंवि निरी ॥
उडी टाकितां पाणि उडालें गगन झांकलें मुहूर्तभरी ॥ पू० २ ॥

वृतांत यमुनातिरिं जो झाला गोप येउनि तो निवेदिती ॥
गोकुळांत जन नंदयशोदासहित सर्व आक्रंदविती ॥
केव्हां भेटशिल श्यामसुंदरा क्षेमरूप तूं अम्हांप्रती ॥
दिर्घस्वरें रडतात किती पडतात पुढें धांवती किती ॥
बळिराम म्हणे स्वस्थ असावें अजरामर तो जगत्पती ॥
गर्वरहित कालिया करुनि, वर कृष्ण येइल पहा शीघ्रगती ॥
शोक नका करुं धीर धरा हो सत्य सांगतों परोपरी ॥
यादवेंद्र वैकुंठपती हा शंकर ज्याचें पुजन करी ॥ पू० ३ ॥

कालियाहि ती मूर्ति विलोकुनि फोंफावत धांवत आला ॥
नखाशिखापर्यंत हरीला घालुनि वेढे आंवळिला ॥
शरीर फुगवुनि पराक्रमानें दडपुनि वेढा काढियला ॥
सुस्वर मुरली वाजवून तो भुजंग मोहुनि भूलविला ॥
नृत्य करुनिया फणांवरी तो करूनि मूर्छित लोळविला ॥
चुडेदान मागतात कांता प्रताप अद्भुत दाखविला ॥

मुकुंदमाधव लिलावतारी थैथै नाचे फणावरी ॥
कांहिं सुचेना भुजंगास त्या मुरगाळुनि धरि पुच्छ करीं ॥ पू० ४ ॥
आदिपुरुष वळखून काळिया मस्तक ठेवी पदांवुजीं ॥
क्षमा करीं अपराध माधवा मी आहें तव चरणरजीं ॥
कृपा करुनि भगवान म्हणे तूं सागरिं जाउनि मला भजीं ॥
खगेंद्र मुद्रा माझि विलोकुनि नाहिं गोष्ट करणार दुजी ॥
भुजंग आज्ञा वरुनि सागरीं अनंद करि येकांत गुजी ॥
उदक अमृतसम झालें जाणुनि त्रिकाळ जन यमुनेस पुजी ॥
भागवतांतिल गोड कथा शुक परीक्षितीला सांगे बरी ॥
त्याच कथेचें कवन प्रभाकर करुन सभा डोलवी खरी ॥
पूर्णब्रह्म अवतार आठवा अघटित इच्छामात्रें करी ॥
गोपशिशूंचीं प्रेतें उठविलीं धेनुसहित कालिंदितिरीं ॥ पू० ५ ॥

## चर्पटपंजर

भज गोविंदा भज गोपाला । भज विश्वेशा मूढमते ॥
त्यज धनदारादिक विषयांतें । बहु देतिल तुजला श्रम ते ॥ १ ॥
बाल तोंवरी करिती क्रीडा । तरुण तोंवरी मन्मथपीडा ॥
वृद्धपणीं चिंतेमधिं पडती । ईश्वरभजनीं कोणि न जडती ॥ २ ॥
अंग गळलें मुंडहि पिकलें । दंत भंगले वदनहि सुकलें ॥
वृद्ध फिरे घेउनियां दंडा । तरिहि न सोडी आशा पिंडा ॥ ३ ॥
नारीजघनस्तनवदनांला । पाहुनि भुलसी दुर्विषयाला ॥
मांसवसादिविकारचि बाहें । वारंवार विचारुनि पाहें ॥ ४ ॥
वय गेल्यावरि काम कशाचा । जल सुकल्यावरि डोह कशाचा ॥
वित्त संपतां परिजन तुटतो । तत्त्व समजतां प्रपंच सुटतो ॥ ५ ॥
जोंवरि वित्तोपार्जन करितो । तोंवरि निजपरिवारहि भजतो ॥
आल्यावर जर्जरता देहीं । कोणी न पुसे त्याला गेहीं ॥ ६ ॥
भज गोविंदा भज गोपाला । भज विश्वेशा मूढमते ॥
त्यज धनदारादिक विषयांतें । बहु देतिल तुजला श्रम ते ॥ ७ ॥

## ग्रंथकर्त्याची रसिकजनांस प्रार्थना

### श्लोक

अनेककाव्यामृतसागरातें । जें शोधितां सार अलें करातें ॥
तें अर्पिलें म्यां रसिकाजनांला । त्यांच्या करो इष्ट सदा मनाला ॥ १ ॥
काव्यामृताचा नवनीतभेला । हा गोड लागो तुमच्या जिभेला ॥
याची तुम्ही चाखुनि घ्याल गोडी । तेव्हा सुखाची मिळवाल जोडी ॥ २ ॥

### आर्या

हा संग्रह बहुयत्नें केला म्यां परशुरामतात्यानें ।
ज्यानें अवलोकावा पावावी शीघ्र रसिकता त्यानें ॥ ३ ॥

### श्लोक

हा ग्रंथ माघमासांत दुंदुभीनाम वत्सरीं ।
झाला प्रसिद्ध लोकांत घ्यावया जोगता करी ॥ ४ ॥

### आर्या

जरि याचा जन आदर करतिल घेतील हा पाहायास ।
तरि उत्तेजन होइल मज तिसरा भाग तो करायास ॥ ५ ॥

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....३५०२१.... वि: ....०१८४.....
क्रमांक ....१५२५.... नों. दि. १०।८।८०.
REFBK-0013489
REFBK-0013489
मराठी ग्रंथ संग्रहालय
१३४८९
मुंबई शाखा